सोलापूर तरुण भारत
आसमंत




# भारत का रहनेवाला हूँ....

लक्ष्यवेध
**रमेश पतंगे**

पाकविरोधात 'ऑपरेशन सिंदूर' दि. ७ मे रोजी यशस्वी झाले. पहलगाम येथे पाकिस्तानी धर्मांध मुस्लीम दहशतवाद्यांनी हिंदू पर्यटकांवर हल्ला करून पुरुषांना वेगळे काढून त्यांना नाव आणि धर्म विचारून ठार केले. सेक्युलर भाषेचा वापर न करता सांगायचे, तर धर्मांध मुस्लीम दहशतवाद्यांनी ते पुरुष हिंदू आहेत, म्हणून त्यांच्या नातेवाईकांसमोर अत्यंत निर्दयीपणे गोळ्या झाडल्या आणि त्यांना ठार केले. हा इस्लामी दहशतवाद नवा नाही. मोहम्मद बिन कासीमपासून मोहम्मद अली जिनांपर्यंत आणि नंतर मोपला आणि नौखली येथे झालेल्या कत्तलीत हा अनुभव हिंदू समाजाने घेतला आहे. आपले भाग्य असे की, याचा वचपा घेणारे नरेंद्र मोदी यांचे शासन केंद्रात आहे.

भारतीय सैन्याने पाकिस्तानच्या नऊ दहशतवादी केंद्रांवर दि. ७ मे रोजीच्या रात्री जबरदस्त हल्ले केले. भारतीय सैन्याला लक्ष्य निश्चित करण्याचे हल्ला करण्याची वेळ ठरविण्याचे पूर्ण स्वातंत्र्य देण्यात आले होते. भारतीय सैन्य दलाने अत्यंत कमी वेळात आपली शक्ती पाकिस्तानला, पाकिस्तानच्या विदेशी मित्रांना आणि पाकिस्तानच्या भारतीय मित्रांना दाखवून दिली. या 'ऑपरेशन सिंदूर'वर दोन दिवस दि. २८ व दि. २९ जुलै रोजी लोकसभेत चर्चा झाली.

सामान्यपणे विचार केला, तर देशशत्रू आणि हिंदूशत्रू पाकिस्तान विरुद्ध केल्या गेलेल्या यशस्वी कारवाईची चर्चा करण्याचे काही कारण नाही. चर्चाच करायची झाली, तर ती सैन्य दलाच्या सामर्थ्याविषयी, त्यांना लागणाऱ्या आधुनिक शस्त्रासंबंधी, आधुनिक तंत्रासंबंधी, गुप्तचर यंत्रणेच्या सक्षमीकरणासंबंधी होण्याची गरज होती. परंतु, काँग्रेस आणि गांधी घराणे यांना अशा विषयात रस नसतो. त्यांच्या डोळ्यात नरेंद्र मोदी आणि मोदींचे शासन, नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व सलत असते आणि म्हणूनच दोन दिवसांच्या चर्चेत राहुल गांधी, प्रियांका गांधी, मल्लिकार्जुन खर्गे इत्यादींनी आपल्या मनातील गरळ ओकून काढली.

'पाकिस्तानने आपले 'राफेल' विमान पाडले. आपल्या सैन्यतळांवर हल्ले केले. 'ऑपरेशन सिंदूर' हा तमाशा आहे. मोदी शासनात इच्छाशक्ती नाही, ट्रम्प यांच्या सांगण्यावरून युद्ध विराम केला. 'ऑपरेशन सिंदूर'मध्ये यश मिळाले नाही,' असले भन्नाट आरोप लोकसभेत करण्यात आले.

**आपण भारतात राहणारे लोक आहोत. म्हणून आपण भारताच्या हिताच्याच गोष्टी केल्या पाहिजेत. चीन, पाकिस्तान, अमेरिका यांच्या हिताच्या गोष्टी करताच कामा नयेत. घमेंडीत जगणाऱ्या गांधी परिवाराला हा संदेश समजो, अशी ईश्वराकडे प्रार्थना करूया...**

प्रत्यक्ष 'ऑपरेशन सिंदूर' चालू असताना रोजच त्याच्या तपशीलवार बातम्या येत होत्या. भारतीय हवाई दलाने 'ब्रह्मोस' क्षेपणास्त्राचा वापर करून पाकिस्तानची कशी धुळधाण केली आहे, याची चित्रेदेखील प्रकाशित होत होती. सर्व देशांनी ती पाहिली. पाकिस्तानच्या अणवस्त्र साठ्यांवर झालेल्या हल्ल्याची प्रदीर्घ चर्चा चालू होती. राहुल गांधी, प्रियांका गांधी, मल्लिकार्जुन खर्गे या तिघांनी सोडून साऱ्या जगाने ती पाहिली. चर्चेला खणखणीत उत्तर नरेंद्र मोदी यांनी आणि अमित शाह व एस. जयशंकर यांनी दिले. त्याची पुनरावृत्ती येथे करण्याचे कारण नाही. एकदा निर्लज्जपणाचे कवच अंगावर चढविले की, अशा सणसणीत उत्तराचेदेखील काही वाटत नाही. वर दिलेली काँग्रेसची मंडळी या बाबतीत स्थितप्रज्ञ आहेत. त्याला दोन अपवाद निघाले. केरळचे खासदार शशी थरूर आणि काँग्रेसचे खासदार व प्रवक्ते मनीष तिवारी. शशी थरूर हे विद्वान खासदार आहेत. वेगवेगळ्या विषयांवर त्यांची पुस्तके वाचनीय आहेत. 'ऑपरेशन सिंदूर' झाल्यानंतर मोदी शासनाने वेगवेगळी शिष्टमंडळे विदेशात पाठविली होती. शशी थरूर अमेरिकेत गेले होते. अमेरिकेत त्यांनी भारताची बाजू अत्यंत ठामपणे मांडली, मनीष तिवारीदेखील एका शिष्टमंडळात होते आणि ते अदीस अबाबा या देशात गेले होते. साहजिकच ही गोष्ट गांधी घराण्याला रुचणारी नव्हती. या घराण्याने लगेचच मनीष तिवारी आणि शशी थरूर यांच्यावर कारवाई केली नाही. 'ऑपरेशन सिंदूर' या विषयावर लोकसभेत चर्चा चालू असताना या दोन्ही वरिष्ठ नेत्यांना काँग्रेसतर्फे बोलण्याची अनुमती देण्यात आली नाही. दोघांनाही संसदेत मौन धारण करून बसावे लागले. शशी थरूर यांना याबाबतीत पत्रकारांनी विचारले, तेव्हा ते 'मौनव्रत' एवढेच म्हणाले. मनीष तिवारी हे शांत बसले नाही. त्यांनी वर आपली पोस्ट टाकली. 'पूरब और पश्चिम' या १९७० सालच्या चित्रपटात एक गाणे होते. गाण्याचे बोल असे आहेत.

हैं प्रीत जहां की रीत सदा
मैं गीत वहां के गाता हूँ
भारत का रहने वाला हूँ
भारत की बात सुनाता हूँ

मनीष तिवारी वरील गाण्याच्या चार ओळींतून काँग्रेस नेत्यांना एक संदेश देतात तो असा की, आपण भारतात राहणारे लोक आहोत. म्हणून आपण भारताच्या हिताच्याच गोष्टी केल्या पाहिजेत. चीन, पाकिस्तान, अमेरिका यांच्या हिताच्या गोष्टी करताच कामा नयेत. घमेंडीत जगणार्या गांधी परिवाराला हा संदेश समजो, अशी ईश्वराकडे प्रार्थना करूया...

शशी थरूर हे उत्तम वक्ता तसेच मुरब्बी राजकारणी आहेत. काँग्रेस नेतृत्वाच्या मोदीविरोधी आणि भारतविरोधी धोरणांच्या ते विरुद्ध आहेत. पक्ष सांगेल तेच बोलले पाहिजे, हे ते स्वीकारीत नाहीत. ते म्हणतात, माझी पहिली निष्ठा देशाप्रति आहे. पक्ष हे राष्ट्राला उत्तम बनवणारे साधनरूप आहे. माझ्या मते, तुम्ही कोणत्याही पक्षाचे सभासद असलात, तरीही पक्षाचे उद्दिष्ट आपल्या पद्धतीने उत्तम भारत घडविणे हेच असले पाहिजे. गांधी घराण्याच्या दबावाखाली काम करणार्या काँग्रेसी नेत्यांच्या तोंडी असली वाक्ये ही कारल्याच्या वेलीला गोड कारली लागण्यासारखी आहेत. यासाठी या दोन्ही वक्तव्यांचे भारतभक्त म्हणून आपण सर्वांनी स्वागतच केले पाहिजे. 'ऑपरेशन सिंदूर' हा राजकीय हाणामारीचा विषयी नाही. काँग्रेस सरकारने पूर्वी काय केले, असा त्यांचा पापाचा पारा वाचून काही उपयोगाचे नाही. इतिहास कोणाला बदलता येत नाही. म्हणून झाले गेले गंगेला मिळाले असे समजून नवीन भारत घडविण्याच्या दृष्टीने वाटचाल करायला पाहिजे. हा नवीन भारत हिंदू स्त्री-पुरुषांचे रक्षणसमर्थ असला पाहिजे.

इस्लामी आक्रमणाची फळे आपण अतिभयानक भोगली आहेत. त्या इतिहासाची पुनरावृत्ती होता कामा नये. ती होऊ द्यायची की नाही, हे भारतातील हिंदू समाजानेच ठरवायचे आहे. लोकशाहीत प्रजा सार्वभौम असते. या सार्वभौम प्रजेने देशहिताचा विचार करणाऱ्या राजकीय पक्षांनाच आणि नेत्यांनाच समर्थन दिले पाहिजे. अन्य कोणाचेही समर्थन करणे हा आत्मघातकी मार्ग आहे, हे जर आपल्याला समजले, तर पुढच्या लोकसभेत देशाविरुद्ध बोलणारे, सैन्यदलाविरुद्ध आक्षेप घेणारे राजनेते आपल्याला संसदेत दिसणार नाहीत. संसदेतील चर्चेचे हे शहाणपण आपण समजून घ्यावे, अशी विनंती!

**नुकतेच राष्ट्रीय सहकार धोरणाचे अनावरण केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते संपन्न झाले. केंद्र सरकारने 'राष्ट्रीय सहकारिता नीती, २०२५' सादर केली असून, ती केवळ एक धोरणात्मक दस्तऐवज न राहता, भारताच्या ग्रामीण पुनर्बांधणीसाठी एक व्यापक आराखडा ठरणार आहे. त्यानिमित्ताने या सहकार धोरणाचे केलेले हे आकलन...**

# नव्या सहकार युगाचा आरंभ




विशेष
**पार्थ कपोले**

भारताच्या सहकारी चळवळीचा इतिहास दीर्घ आणि सशक्त आहे. ग्रामीण भारतात सहकार हा केवळ आर्थिक सक्षमीकरणाचा मार्ग नाही, तर एक सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले जाते. 'सर्वांच्या सहभागातून सर्वांचे कल्याण' या तत्त्वावर आधारित सहकार संस्थांनी गेल्या काही दशकांत ग्रामीण जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपले ठसे उमटवले आहेत. मात्र, गेल्या काही वर्षांत सहकारी संस्थांमध्ये पारदर्शकतेचा अभाव, तांत्रिक मागासलेपणा, तरुणांचा अल्प सहभाग आणि व्यवस्थापनातील मर्यादा जाणवत होत्या.

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने 'राष्ट्रीय सहकारिता नीती २०२५' सादर केली असून, ती केवळ एक धोरणात्मक दस्तऐवज न राहता, भारताच्या ग्रामीण पुनर्बांधणीसाठी एक व्यापक आराखडा ठरण्याची क्षमता बाळगते. या धोरणाचे अनावरण नुकतेच केंद्रीय गृहमंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांच्या हस्ते नवी दिल्ली येथे करण्यात आले. अमित शाह यांनी सांगितले की, देशातील विविध सहकारी संघटनांचे प्रतिनिधी, तज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ, शासकीय अधिकारी, रिझर्व्ह बँक व नाबार्ड यांच्याशी परामर्श करून ही नीति तयार करण्यात आली आहे. समितीच्या कामकाजात ७५० हून अधिक सूचना विचारात घेण्यात आल्या, १७ बैठकांचे आयोजन झाले आणि सहकार क्षेत्रातील अनेक आव्हानांचा अभ्यास करून ही दूरदृष्टीपूर्ण नीति तयार करण्यात आली आहे. या धोरणात भारतातील सहकार चळवळीला नवसंजीवनी देण्याबरोबरच भारताच्या 'विकसित राष्ट्र' या ध्येयाशी सुसंगत रणनीती आखण्यात आली आहे. विशेषतः २०४७ सालापर्यंतचा विचार करून तयार केलेल्या या नीतीमध्ये 'सहकारातून समृद्धी' हे सूत्र केवळ घोषवाय म्हणून नाही, तर प्रत्यक्ष कार्यवाहीचा केंद्रबिंदू म्हणून मांडले गेले आहे. यात शेतकरी, महिला, आदिवासी, दलित, तरुण, अल्पभूधारक, दुर्गम भागातील नागरिक हे धोरणाचे मूळ घटक आहेत.

भारतात सध्या सुमारे ८.३ लाख सहकारी संस्था कार्यरत असून, त्यामध्ये ३० कोटींहून अधिक नागरिक सहभागी आहेत. आता हे क्षेत्र अधिक विस्तृत, पारदर्शक, तांत्रिकदृष्ट्या सक्षम आणि आर्थिकदृष्ट्या स्वायत्त बनवण्यासाठी या धोरणात स्पष्ट लक्ष्य ठरवण्यात आले आहेत. उदाहरणार्थ, २०३४ सालापर्यंत भारताच्या 'जीडीपी'मध्ये सहकार क्षेत्राचे योगदान तिपटीने वाढविणे, देशात ३० टक्के अधिक सहकारी संस्था निर्माण करणे आणि सुमारे ५० कोटी नव्या सदस्यांना या क्षेत्रात आणणे, ही महत्त्वाची उद्दिष्टे आहेत. पंचायत पातळीवर प्रत्येक गावात किमान एक सहकारी संस्था असावी, यासाठी विविध मॉडेल्स 'पॅस', 'डेअरी', 'मत्स्य संस्था', 'महिला बचतगट', 'बहुउद्देशीय सहकारी संस्था' कार्यान्वित केल्या जाणार आहेत. याव्यतिरिक्त सरकारने ८३ धोरणात्मक हस्तक्षेप बिंदू निश्चित केले आहेत. त्यापैकी ५८ पूर्ण, तीन पूर्णपणे लागू उर्वरित प्रक्रियेत आहेत. (पान ४ वर)

वेधक
**योगिता साळवी**

# 'लव्ह जिहाद'चे बळी पुरुषही!

**'लव्ह जिहाद!' गेली कित्येक वर्षे कर्करोगासारखा पसरत चाललेला हा सामाजिक आजार आता अधिकच बळावला आहे. आजवर धर्मांधांकडून लव्ह जिहादच्या शिकार महिला होत होत्या, आता पुरुषही त्याला बळी पडू लागले आहेत. भारताला इस्लाम करण्याच्या इराद्याने भारलेल्या धर्मांधांनी लव्ह जिहाद नामक विषारी खेळ अधिकच तीव्र केला आहे. आग्रामध्ये घडलेल्या घटना याची साक्ष देतात. उजेडात आलेले हे एकच प्रकरण असले, तरी देशभरात अशी अनेक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. 'लव्ह जिहाद'च्या या विस्तारत चाललेल्या वास्तवाचा घेतलेला आढावा...**



नुकत्याच उघडकीस आलेल्या आग्रा धर्मांतरणाच्या भयंकर घटनेतून सिद्ध होते की, केवळ हिंदू मुली-महिलाच नाहीत, तर हिंदू पुरुषही लव्ह आणि इतर जिहादचे बळी होत आहेत. आग्रा धर्मांतरण षडयंत्रामध्ये, शेकडो हिंदू मुलींचे धर्मांतरण झाले. धर्मांतरण करणार्यांची एक टोळीच असून, त्यांचे 'गजवा-ए-हिंद' अर्थात इस्लाममय भारताचे स्वप्न आहे. त्यांनी 'मिशन अस्मिता'च्या नावाखाली, शेकडो हिंदू मुलींचे धर्मांतरण केले. या दहा जणांच्या टोळीतले सहाजण जन्माने हिंदू आणि सध्या धर्मांतरित मुस्लीम आहेत. हे सारेच भयंकर आणि दुःखदही आहे! या लेखामध्ये या घटनेचा संक्षिप्त मागोवा घेऊया...

तुझ्याशी निकाह केला मात्र, तू धर्मांतरित मुस्लीम आहेस. मी आता खऱ्या मुस्लीम मुलाबरोबर निकाह करणार, असे म्हणून, सना बेगम ही मुस्लीम मुलगी मोहम्मद अली म्हणजे पूर्वाश्रमीचा पीयूष पवार याला सोडून गेली. पीयूष साधारण चारचौघांसारखाच दिसणारा तरुण होता. त्याला सुंदर, आकर्षक सना भेटली, तो तिच्या प्रेमामध्ये वेडा झाला. सनाने पियुषला सांगितले की, खरंच प्रेम असेल तर निकाह कर पण, निकाहसाठी तुला मुस्लीम व्हावे लागेल. प्रेमासाठी वाट्टेल करायचे असते, हे आपल्या तरुण-तरुणींच्या डोक्यात आधीच भरवलेले आहेच. त्यामुळे सनासाठी पियुषने इस्लाम स्वीकारला, सुंताही केली. पियुषचा आता मोहम्मद अली झाला. दरम्यान हे सगळे सहन न होऊन, त्याचे कुटुंब राजस्थान सोडून गेले. मोहम्मद एकटाच पडला. त्याने मुस्लीम लोकांमध्ये उठबस वाढवली, हिंदू ओळख पुसली गेली. तो कट्टर मुस्लीम झाला मात्र, याच काळात सना त्याला सोडून गेली. पुढे त्याच गोतावळ्याने, त्याचे लग्न आयशाशी करून दिले. याच मोहम्मद अलीला आग्रा धर्मांतरण गँग षडयंत्रमध्ये पोलिसांनी पकडले आहे.

ज्या गुन्ह्याच्या आरोपाखाली मोहम्मद अली आणि त्याच्या सहकार्यांना अटक झाली; ती घटना आग्रा येथे घडली. पंजाबी कुटुंबातील एका मुलीची, महाविद्यालयात एका काश्मिरी मुस्लीम मुलीशी मैत्री झाली. त्या मुलीने तिला जन्नत नसिब होण्यासाठी इस्लामचा स्वीकार करणे कसे गरजेचे आहे, हे पटवले. तसेच, इस्लाम स्वीकारला तर चांगले, सुरक्षित आयुष्यही मिळेल असेही तिला सांगितले. त्या मुलीने जन्नत आणि चांगल्या आयुष्यासाठी, इस्लाम स्वीकारला. तिची लहान बहीण शाळेत जायची. कोरोना काळात तिचे मोबाईलवर शिक्षण सुरू झाले. मात्र, ती मोबाईलवर खेळ खेळू लागली. खेळात एखाद्याला गाडी खाली चिरडणे किंवा गोळ्या घालून ठार केले की, ती खेळ जिंकायची. हा खेळ खेळता खेळता तिला वाटू लागले की, खरोखरच हातात बंदूक पाहिजे. लहान बहिणीने तिच्या मोठ्या बहिणीला इच्छा सांगितली. धर्मांतरित बहीण, धर्मांतरण गँगच्या संपर्कात होतीच. तिने लगेचच लहान बहिणीची इच्छा त्यांना सांगितली. हे ऐकून त्या लोकांनी सल्ला दिला, माशाअल्ला! छोट्या बहिणीला इस्लाम शिकवत राहा, ती १८ वर्षांची झाली की तिच्यासोबत पळून ये. त्या मुलीने छोट्या बहिणीला इस्लामविषयी आकर्षित केले. छोटी बहीण १८ वर्षांची झाली, तेव्हा तिला सोबत घेतले आणि ती धर्मांतरण गँगच्या मदतीने कोलकात्याला आली. सख्ख्या बहिणी हरवल्या म्हणून, कुटुंबाने पोलिसात तक्रार केली.

तपासात या दोन बहिणी कोलकात्यामध्ये सापडल्या. त्या दोघीही मुस्लीम झाल्या होत्या. छोट्या बहिणीने तर बंदूक हातात घेऊन, फोटोही काढला होता. या दोघींसोबत एक मुलगी बंधक होती, तिलाही पोलिसांनी सोडवले. पोलिसांच्या सखोल चौकशीत आढळले की, धर्मांतरण करणार्या टोळीने देशातील सात राज्यांमध्ये, धर्मांतराचे जाळे तयार केले आहे. काही वर्षांतच त्यांनी शेकडो मुलींना फसवून गळाला लावले. या गँगमध्ये वरकरणी दहाजण आहेत. आरोपीमध्ये आयशा पूर्वाश्रमीची एसबी कृष्णा, अली हसन पूर्वीचा शेखर राय, अबुर रहमान पूर्वीचा रुपेंद्र सिंह, मोहम्मद इब्राहिम पूर्वीचा ऋतिक बनिक, मुस्तफा पूर्वीचा मनोज, मोहम्मद अली पूर्वीचा पीयूष पवार हे धर्मांतरित मुस्लीम, तर ओसामा, रहमान कुरैशी, अब्बू तालिब जुनैद कुरैशी हे जन्माने मुस्लीमच होते. त्यांचे 'पीएफआय' आणि इतर पाकिस्तानी दहशतवादी संघटनांशी संबंध आहेत, असे पोलिसांचे म्हणणे आहे.

आग्रा धर्मांतरण कांडमधील गुन्हेगार असलेल्या धर्मांतरित पुरुषांचा विचार करताना, मुरबाडची घटना आठवते. मुरबाडला 'लव्ह जिहाद'विरोधी सभा घेत होते, त्यावेळी एक तरुण म्हणाला होता ताई, आईशपथ सांगतो खरी घटना आहे. हिंदू मुलांची जिंदगी पण नरक बनवली जाते. त्याने सांगितले, बाजूला पर्यटनस्थळ असलेल्या तालुक्यात (त्याने नाव सांगितले; पण उगाच त्या तालुक्याची बदनामी नको) गावची पोरटोर शिक्षणासाठी, नोकरीसाठी जात होती. पण, काही वर्षांत लक्षात आले की, त्यातली काही पोरं आजारी पडू लागली,
त्यांना एडसची लागण झाली. चांगल्या घरची शिकलेली कष्टाळू मुलं, सुपारीच्या खांडाचेही व्यसन नव्हते. मग हे का झालं? गावातल्या पोरांना काय झाले, म्हणून मी घटनेचा मागोवा घेतला. तर कळले की, त्या तालुक्यात शिकायला, नोकरी करणाऱ्या तरुणांना तिथले काही तरुण सांगायचे, कष्ट करून जवानी वाया घालवताय. हेच वय ऐश करण्याचे आहे. २०० रुपयात २० वर्षांच्या आतल्या मुली मिळतील, महिन्यातून एकदा मजा करायला पाहिजे. त्या तरुणांचे नियंत्रण सुटले. ते देहविक्री करणाऱ्या मुलींकडे जाऊ लागले. त्या तरुणी रिक्षाने मुंब्रा वगैरे भागातून तिथे यायच्या. प्रत्येक तरुणाला एक एक प्रेयसी मिळाली पण, दोन वर्षांतच ते तरुण आजारी पडू लागले. त्या मुलींना हे कळताच, त्यांनी तिथे येणेच सोडले. तरुण गावी परतले. त्या मुली पूर्वी हिंदूच होत्या पण, त्या 'लव्ह जिहाद'ला बळी पडल्या होत्या. फसवणारे संघटित होते, त्यांनी मुलींना ड्रग्सचे व्यसन लावले. (पान ४ वर)

विश्वसंचार

मल्हार कृष्ण गोखले

# लबाड जोडिती इमले माड्या, कुळवंतांना मात्र झोपड्या!

दिनांक ११ जानेवारी २००६ या दिवशी संध्याकाळी मुंबई शहर पुन्हा एकदा बॉम्बस्फोटांनी हादरले. यावेळचा हल्ला मुंबईकरांची जीवनवाहिनी असणाऱ्या लोकल रेल्वे गाड्यांवर झाला. संध्याकाळी ऐन गर्दीच्या वेळी खच्चून भरलेल्या लोकल गाड्यांमध्ये, विविध ठिकाणी एकंदर ७ स्फोट झाले. साधारण १३ मिनिटांच्या अवकाशात लागोपाठ बॉम्बस् फुटत गेले. मरण किंकाळ्या, रक्ताचा सडा, तुटलेल्या अवयवांचा खच यांनी रेल्वे स्थानके आणि रुळवाटा सुन्न झाल्या. सुमारे २०० लोक ठार आणि ८०० लोक जखमी झालेल्या या बॉम्बस्फोट मालिकेतले वैशिष्ट्य म्हणजे कटवाल्यांनी बॉम्बस् प्रेशर कुकरमध्ये लपवून त्यांची स्फोटकता वाढवली. ३० सप्टेंबर २०१५ रोजी मकोका न्यायालयाने ५ आरोपींना फाशी आणि ७ आरोपींना जन्मठेप ठोठावली. या २००६ च्या स्फोटांचा तसेच नोव्हेंबर २००८ (२६/११) मधल्या मुंबईवरच्या अतिरेकी हल्ल्यांचा मुख्य सूत्रधार आझम चिमा हा मात्र कधीच कोणाच्या हाती लागला नाही. २८ फेब्रुवारी २०२४ या दिवशी तो पाकिस्तानातच हृदयविकाराच्या झटक्याने मरण पावला, असे जाहीर करण्यात आले. दरम्यान, २१ जुलै २०२५ रोजी मुंबई उच्च न्यायालयाने मकोका न्यायालयाचा निर्णय रद्द ठरवत सर्वच्या सर्व १२ आरोपींना निर्दोष म्हणून मुक्त केले. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने २४ जुलै २०२५ रोजी स्थगिती दिली आहे. या दरम्यान सर्व आरोपींना तुरुंगातून मुक्त करण्यात आले होते. मात्र, ते पुन्हा तुरुंगात जाणार नाहीत, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले.

आता दृश्य कसे दिसते पहा. २००६ मध्ये बॉम्बस्फोट होतात. किमान २०० लोक ठार आणि ८०० लोक जखमी होतात. हा हल्ला भारताच्या भूमीवर झाल्यामुळे मनुष्यबळाशिवाय रेल्वे आणि इतर साधनसंपत्तीची हानी किती कोटी रुपयांची झाली, याची मोजदाद लागणे अशक्य. भारत हा हिंदुबहुल देश असल्यामुळे ठार आणि जखमी जवळजवळ सगळे हिंदूच. मालमत्तेचे नुकसान भारताचे आणि आरोपी सगळे मुसलमान. मुख्य



आरोपी पाकिस्तानात फरार. २००६ च्या प्रकरणाचा खटला उभा रदहायला २०२५ उजाडते. निकाल झटपट लागतो. पण त्या निकालाला दिलेल्या आव्हानाची सुनावणी १० वर्षे रेंगाळते आणि शेवटी निर्णय काय, तर २०० ठार आणि ८०० जखमींच्या खटल्यातले सगळे निर्दोष! सत्यमेव जयते!!

आता इंग्लंडमधली कथा पहा. हामित कोस्कन नावाचा ५० वर्षे वयाचा इसम इंग्लंडमध्ये राहतो. तो जन्माने तुर्कस्तानचा नागरिक आहे. पण वंशाने अर्धा कुर्द आणि अर्धा आर्गेनियन आहे. कुर्द लोक खूप मोठ्या संख्येने तुर्कस्तानात आणि तुर्कस्तान सीमेलगतच्या इराण, इराक, सीरिया, आर्मेनिया आणि अझरबैजान या देशांमध्ये राहतात. कुर्द लोक मुख्यतः सुन्नी आणि अल्प प्रमाणात शिया आहेत. कुर्द हे अरब नाहीत म्हणून इराक आणि सीरिया या अरबी देशांना ते नको आहोत. इराकच्या सद्दाम हुसेनने तर हिटलरप्रमाणे विषारी वायूचा उपयोग करून कुर्द लोकांची वांशिक कत्तल उडवली होती. सध्या तुर्कस्तानचे रसीप एर्दोगान कुर्दांना भरडून काढत आहेत. तर, हा हामित कोस्कन नावाचा इसम लंडनच्या तुर्कस्तानी वकिलातीसमोर गेला. त्याच्या एका हातात कुराण होते. ते त्याने पेटवून वर धरले आणि 'इस्लाम हा दहशतवादी धर्म आहे' अशा घोषणा दिल्या.

आपल्या जर लक्षात असेल तर २०२३ मध्ये सलवान मोमिका नावाच्या इराकी निर्वासिताने स्वीडनमध्ये असेच कुराण जाळले होते. त्याची चित्रफीत समाजमाध्यमांवर खूप फिरली होती. या सलवान मोमिकाला २९ जानेवारी २०२५ रोजी गोळ्या घालण्यात आल्या होत्या. या पृष्ठभूमीवर हामित कोस्कन याने फेब्रुवारी २०२५ मध्ये लंडनमध्ये केलेले हे कृत्य लक्षवेधी ठरले. 'ब्लासफेमी' म्हणजे ईशनिंदा विरोधी कायदा इंग्लंडने २००८ साली रद्द केलेला आहे. म्हणजेच धर्म, धर्मग्रंथ, देव, धर्मसंस्था याविषयी कोणीही मुक्तपणे आपला अभिप्राय व्यक्त करू शकतो. इंग्लंडच्या या मुक्त मत स्वातंत्र्याचीही मोठी परंपरा आहे.

पोप महाशयांचे असे म्हणणे होते की, सर्व ख्रिश्चन देशांचा जसा मी धार्मिक नेता आहे तसाच राजकीय नेताही आहे. पोपच्या या अधिसत्तेला १६ व्या शतकात इंग्लंडचा राजा हेन्री आठवा याने आवाहन दिले. त्याने पोपला इंग्लंडच्या धर्मकारण आणि राजकारण दोन्हीमधून हद्दपारच करून टाकले. पण तो धर्माला मानत होता. म्हणून त्याने इंग्लंडसाठी प्रोटेस्टंट अँग्लिकन चर्च ही स्वतंत्र धर्मसंस्था निर्माण केली. तिचा धर्म प्रमुख तो स्वतः बनला. मात्र, राजाला राजकारण आणि धर्मकारण एकाच वेळी सांभाळणे शक्य नाही.

तेव्हा राजाचा प्रतिनिधी म्हणून कॅंटरबरीचा आर्य बिशप अँग्लिकन चर्चचा कार्यकारी प्रमुख असेल, अशी व्यवस्था त्याने निर्माण केली. परंतु पुढच्या काळात एकंदर चर्च संस्था, देव, धर्म या सर्वांनाच आवाहन देणारे लोक इंग्लंडमध्ये निघाले. देव, धर्म, धार्मिक विचारांची सार्वजनिक जीवनात, विशेषतः राजकारणात अजिबात लुटबूड नको. देव-धर्म ज्यांना करायचा असेल, त्यांनी तो चर्चमध्ये किंवा वैयक्तिक जीवनात पाळावा. राजसत्ता आणि राजनेते धार्मिक प्रभावापासून पूर्ण अलिप्त-निधर्मी असले पाहिजेत या अर्थाने 'सेक्यूलर' हा शब्द १८५१ साली जॉर्ज होलिओक या इंग्रज पत्रकार, संपादकाने सर्वप्रथम वापरला. त्याच्यापासून प्रेरणा घेऊन चार्ल्स ब्रँडलॉ याने १८६६ साली इंग्लंडमध्ये 'नॅशनल सेक्युलर सोसायटी' स्थापन केली. ब्रँडलॉ हा नास्तिक विचारवंत आणि राजकीय नेता होता. प्रसिद्ध महिला विचारवंत ॲनी बेझंट या देखील काही काळ ब्रँडलॉच्या सहकारी होत्या.

धार्मिक संस्था म्हणजे ख्रिश्चन चर्चचे विविध पंथ, संप्रदाय, धर्माच्या नावाखाली लोकांना मुक्तपणे विचार करायला नि ते विचार जाहीरपणे व्यक्त करायला मज्जाव करतात, या विरुद्ध त्यांचा हा लढा होता. तरीही प्रत्यक्षात 'ईशनिंदा कायदा' रद्द होण्यासाठी २०८८ साल उजाडले. हा कायदा रद्द करून लोकांना देव-धर्म याबाबत त्यांचे मत मांडायला. त्याप्रमाणे वागायला पूर्ण मोकळीक देताना कायदेमंडळासमोर अर्थातच चर्च आणि बायबल होते. आता हे २०२५ आहे. हामित कोस्कन वरीलप्रमाणे कृती करत असताना जवळून जाणाऱ्या एका 'डिलिव्हरी बॉय'ने त्याला लाथ मारली तर दुसऱ्या एकाने एक मोठा सुरा काढला आणि 'ठारच मारतो बघ तुला' असे म्हणत तो त्याच्या अंगावर धावून गेला. प्रकरणाने गंभीर वळण घेण्यापूर्वी पोलिस आले. त्यांनी हामित कोस्कनला न्यायालयासमोर उभे केले. आता ईशनिंदा कायदा रद्द झाल्यामुळे सार्वजनिक जागी, इस्लाम हा दहशतवादी धर्म आहे, असे म्हणणे किंवा कुराण जाळणे हा गुन्हा नाही. मग पोलिसांनी त्याच्यावर आरोप ठेवला की, धार्मिक हेतूने प्रेरित होऊन याने सार्वजनिक ठिकाणची व्यवस्था बिघडवण्याचा प्रयत्न केला.

हामित कोस्कनने न्यायाधीशांसमोर असा युक्तिवाद केला की, 'माझा वाद कुणा व्यक्ती किंवा संस्थेशी नसून इस्लामशी आहे.' त्यावर न्यायमूर्ती जॉन मॅक्गरवा यांनी म्हटले की, काही प्रमाणात तरी तुझी कृती मुसलमान व्यक्तींच्या द्वेषातून निर्माण झाली होती. त्याला २४० पौंड दंड ठोठावताना न्यायालयाने असा शेरा मारला की, आरोपीची गैरवागणूक ही एखाद्या माणसाला धोकादायक, त्रासदायक आणि वेदनादायक वाटू शकेल, अशी होती. त्याच्या वागणुकीमुळे दोन वेगवेगळ्या व्यक्तींना आपला अवमान झाल्यासारखे वाटले.

'ख्रिश्चन कन्सर्न' ही एक धार्मिक संस्था आहे. तिचा प्रवक्ता टीम दिळय हा या निकालाबाबत बोलताना म्हणाला, 'म्हणजे तुम्ही बळी पडलेल्या माणसालाच दोषी ठरवताय. काही मुसलमानांना त्यांच्या धर्माचा अपमान झाल्यासारखे वाटले आणि आता कदाचित ते हिंसक बनतील म्हणून तुम्ही त्यांनाच संरक्षण दिल्यासारखे आहे हे.' वर उल्लेख केलेल्या 'नॅशनल सेक्युलर सोसायटी'चा प्रवक्ता स्टिफन इव्हान्स म्हणतो, 'या निकालाने ईशनिंदा कायदाच पुन्हा येऊ घातला आहे, असे दिसते.' हामित कोस्कन नॅशनल सेक्युलर सोसायटीच्या मदतीने वरिष्ठ न्यायालयात दाद मागणारच आहे. पण त्याने विचारलेल्या एका प्रश्नाला कुणाकडेही उत्तर नाही. 'समजा, मी असेच वेस्टमिन्स्टर ॲबेसमोर उभे राहून बायबल जाळले असते, तर तुम्ही त्याला गुन्हा समजला असता का?' लै भारी पाईंटाचा मुद्दा आहे! (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

पुस्तक परिक्षण

घनश्याम पाटील
भ्र. ७०५७२९२०९२

# श्रमिक पत्रकाराची गौरवगाथा

'वृत्तपत्र व्यवसाय हा धंदा आहे आणि पत्रकारिता हा धर्म! एकवेळ धंद्याचा धर्म झाला तरी चालेल पण धर्माचा कधीही धंदा होऊ देऊ नका,' असं आचार्य अत्रे नेहमी सांगायचे. त्यांचा हा विचार आचरणात आणणारे राष्ट्रीय विचाराचे एक महत्त्वपूर्ण वृत्तपत्र म्हणजे दै. 'तरूण भारत'. या वृत्तपत्रात वार्ताहर पदापासून कारकिर्द सुरू करून इथेच संपादक होण्याचे भाग्य लाभलेले पत्रकार म्हणजे प्रशांत माने. पत्रकारितेचा हा वसा स्वीकारल्यानंतर त्या पदपथावरून चालताना जे खाचखळगे आले, जे संचित वाट्याला आले त्याचा आविष्कार म्हणजे प्रशांतजींचे 'लोकाभिमुख पत्रकारिता' हे पुस्तक.




खरं सांगायचं तर स्वातंत्र्यासाठी धारधार शस्त्राप्रमाणे उपयुक्त ठरलेली टिळक- आगरकरांची, गांधी- आंबेडकरांची पत्रकारिता आपण बघितली. पुढे संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यातील आचार्य अत्रे यांचा झंजावात आपण बघितला. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली त्यावेळी किमान देशभक्तीने भारावलेली, स्वातंत्र्याचे संस्कार झालेली पिढी संपादकीय मंडळात, व्यवस्थापनात होती. पुढे १९९१ नंतर खाजगीकरण, जागतिकीकरण, उदारीकरण याचा परिणाम आणि दृकश्राव्य माध्यमांचे वाढत गेलेले वर्चस्व यात पत्रकारितेचा चेहराच हरवला. २००२ नंतर वाढलेल्या वृत्तवाहिन्या आणि २०१० नंतर आलेली समाजमाध्यमे यामुळे तर प्रसारमाध्यमांची उरलीसुरली अब्रुही वेशीला टांगली गेली. अशा परिस्थितीत आपल्या ध्येयावर ठाम राहून लोकाभिमुख पत्रकारिता करण्याचे आव्हान मोठे होते. प्रशांत माने यांच्यासारख्या हरहुन्नरी पत्रकारांनी हा वारसा जपला म्हणून त्यांचे वेगळेपण ठळकपणे अधोरेखित होते.

सध्याचा जमाना क्षेत्र पत्रकारितेचा (बिट रिपोर्टिंग) आहे. मंत्रालय, महानगरपालिका, जिल्हा परिषद, गुन्हेगारी अशा क्षेत्राबरोबरच शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, साहित्य, कृषी, क्रीडा अशा क्षेत्राचे स्वतंत्र वार्तांकन करणारे पत्रकार आहेत. भाजी मंडई हे सुद्धा पत्रकारितेचे महत्त्वाचे बिट होऊ शकते हेही काळाच्या ओघात सिद्ध झाले आहे. आता तर प्रत्येक राजकीय पक्षासाठी एक स्वतंत्र वार्ताहर नेमण्याचे दिवस आलेत. एखाद्या मोठ्या हॉटेलमधील स्वयंपाकघरात गेल्यावर तिथे प्रत्येक काम करण्यासाठी स्वतंत्र माणूस असतो. उदाहरणार्थ एक जण फक्त भाजी निवडत असतो, दुसरा ती भाजी धुऊन घेतो, तिसरा ती चिरून-कापून घेतो, चौथा फक्त ती भाजी पातेल्यात टाकल्यावर हलवण्याचे काम करतो, पाचवा त्यात आवश्यकतेनुसार मसाला टाकतो... वर्षानुवर्षे ही मंडळी हेच काम करत असतात. त्यामुळे एखाद्या दिवशी एखाद्या आचाऱ्याला संपूर्ण भाजी तयार करायला सांगितली तर त्याच्यासाठी ते अशक्यप्राय ठरते. काही अपवाद वगळता पत्रकारितेचेही असेच झाले आहे. अशा परिस्थितीत प्रशांत माने यांच्यासारखे अनुभवी पत्रकार स्वतःला सिद्ध करतात, प्रत्येक क्षेत्राचे वार्तांकन धाडसाने, जबाबदारीने आणि नैतिकता साधत करतात आणि त्यात यश मिळवून या क्षेत्रात सर्वोच्च असलेल्या संपादक पदापर्यंत पोहोचतात, हे म्हणूनच कौतुकास्पद आहे.

लोकाभिमुख पत्रकारिता हे प्रशांत माने यांचे पुस्तक म्हणजे एका धडपड्या पत्रकाराच्या वाटचालीचा ट्रेलर आहे. हे वाचल्यानंतर वाटते यात त्यांनी त्यांच्या बातमीदारीचे अनुभव दिले आहे. काळाच्या ओघात संपादक म्हणून त्यांनी जे निर्णय घेतले, जे पत्रकार घडवले, विविध क्षेत्रातील मान्यवरांशी जे स्नेहबंध निर्माण केले त्यावर आणखी उपयुक्त पुस्तक होऊ शकते. अर्थात 'हा सूर्य, हा जयद्रथ' याप्रमाणे त्यांनी त्यांच्या आजवरच्या प्रमुख बातम्यांची प्रातिनिधिक कात्रणे या पुस्तकात दिली आहेत.

अनेक मान्यवरांनी त्यांना शुभसंदेश दिले आहेत. राज्यपालापासून ते मुख्यमंत्र्यापर्यंत सर्वांचा या शुभेच्छा संदेशात सहभाग आहे. त्यांच्या आयुष्यातील काही निवडक छायाचित्रांमुळे त्याची उंची आणखी वाढली आहे. ज्येष्ठ निरूपणकार श्रद्धेय विवेककाका घळसासी यांच्यापासून राजा माने यांच्यापर्यंत सर्वांनी त्यांच्याविषयीचा स्नेहभाव शब्दांकित केला आहे. त्यामुळे या पुस्तकाला प्रशांत माने यांच्या गौरवग्रंथाचे स्वरूप आले आहे. भविष्यात त्यांनी फक्त पत्रकारिता, त्यातील अनुभव, संपादनाचे अनुभव, आजवरच्या वाटचालीतील संघर्ष असे स्वतंत्र लेखन केले तर मराठी पत्रकारांच्या आत्मकथनाच्या परंपरेतील तो एक अनमोल अक्षर ऐवज ठरेल. आत्मचरित्र लेखनाचे हे काम त्यांनी हाती घ्यावे, असा त्यांचा स्नेही आणि मराठीतील एक प्रकाशक म्हणून त्यांना अवश्य सूचवावेसे वाटते.

प्रस्तुत पुस्तकात त्यांनी बातमीदार ते मुख्य संपादक या प्रवासाविषयी लिहिले आहे. ए. आय. सारख्या आधुनिक माध्यमाचे पत्रकारितेसमोर कोणते आणि कसे आव्हान आहे हे विषद केले आहे. समाजमाध्यमांचा उहापोह केला आहे. पत्रकारिता दिखावा किंवा आकर्षण नव्हे हे सांगतानाच पत्रकारिता खरोखरच चौथा स्तंभ आहे का? असा प्रश्नही उपस्थित केला आहे. महापालिकेच्या वाहतूक विभागाचा मदने पॅटर्न, निराधारांचे अनुदान, विमानसेवा, आश्रमशाळा, वाळू उपसा आणि पर्यावरण, स्वच्छतेचा जागर, भूसंपादन, रेशनिंग सुधारणा असे महत्त्वपूर्ण विषय साधार मांडत त्यांनी पत्रकारांसाठी काही कानमंत्रही दिले आहेत. मुख्य म्हणजे पत्रकारांसाठी गृहप्रकल्प आणि सोलापूर पत्रकार संघाचे अध्यक्षपद ही प्रकरणेही वाचनीय आणि त्यांच्या कर्तबगारीची साक्ष पटवून देणारी आहेत. मलपृष्ठावर विजय गायकवाड यांची 'काय असतो पत्रकार!' ही कविता कविता घेऊन त्यांनी त्यांच्या संवेदनशील मनाचा कोपराही रिता केला आहे.

पत्रकारिता क्षेत्रातील अनेक बदल अनुभवणाऱ्या एका पत्रकाराने त्याचे समृद्ध जीवनानुभव या ग्रंथात मोकळेपणाने मांडले आहेत. पत्रकारितेची विद्यार्थी आणि सामान्य वाचक यांच्यासाठी ही अनुभवाची शिदोरी उपयुक्त ठरणारी आहे. एका अपघाताला सामोरे जाऊनही त्यांनी दृढ संकल्पाने या क्षेत्रात जे योगदान पेरले आहे ते काळाच्या प्रवाहात दखलपात्र ठरेल. एका श्रमिक पत्रकाराची ही गौरवगाथा नव्या पिढीसाठी दिशादर्शक, प्रेरणादायी ठरेल, हे मात्र नक्की. त्यांच्या भावी लेखन प्रवासास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा! (लेखक चपराक प्रकाशन, पुणेचे प्रकाशक आहेत.)

**पुस्तकाचे नाव-** लोकाभिमुख पत्रकारिता
**लेखक** - प्रशांत माने
**प्रकाशक** - जागृती पब्लिकेशन, सोलापूर
**पाने** - १९६, मूल्य - ३०० रूपये

---


संस्कारांच्या देशा

रमा गोळवलकर

# सद्भावना गुणक-१

माणूस नावाचा प्राणी हा इतर प्राण्यांपासून वेगळा आहे. कारण त्याला एक बुद्धिमान मेंदू आहे, हे आपण घोकून पाठ केलेलं वाक्य आहे. औद्योगिकीकरणानंतर धंद्याची आर्थिक गणितं बसवताना संसाधनं म्हणजे रिसोर्सेजच्या किमती काढण्याला सुरुवात झाली. जमीन- पाणी यासारखी नैसर्गिक संसाधनं, यांत्रिकीकरणाला लागणारी अवजड यंत्रसामग्रीसारखी मानवनिर्मित संसाधनं त्यात घालून प्रक्रिया करण्यासाठी लागणारा कच्चा माल आणि ती यंत्र चालवण्यासाठी लागणारी प्रचंड ऊर्जा हा सगळा ताळमेळ जुळवावा लागू लागला. यंत्रांना स्वत:ची बुद्धिमत्ता नसण्याच्या त्या जमान्यात स्वत:च्या बुद्धीचा वापर करून काम काढणाऱ्या माणसांना नोकरीवर ठेवण्यात येऊ लागलं. अशी विविध प्रकारची यंत्रं चालवू शकणारी माणसं म्हणजे एक संसाधनच आहे, हा विचार तत्काळ रुजला. 'ह्युमन रिसोर्स' या नावानं त्यांना संबोधलं जाऊ लागलं.

ऋग्वेदात ज्या सद्भावना गुणकाचा उगम झाला त्या ऋचेचं पहिलं पद




कष्ट करण्याच्या त्यांच्या शारीरिक क्षमतेसोबतच त्यांच्या मेंदूच्या क्षमतेचं मोजमाप करून त्यानुसार त्यांच्याकडून काम करवून घेण्यासाठी एक नवा एकक लावण्यात आला इंटेलिजन्स कोशंट म्हणजेच बुद्ध्यांक. फ्रान्सिस गॉल्टन नावाच्या ब्रिटिश संख्या शास्त्रज्ञानं (स्टॅटेस्टिशियन) इ. स. १८८२ मध्ये बुद्धिमत्ता चाचणी करणारी संस्था स्थापन केली.

पुढे सन १९०५ मध्ये फ्रेंच मानसशास्त्रज्ञ आल्फ्रेड बिनेट आणि मानसोपचारतज्ज्ञ थिओडोर सिमोन या दोघांनी मिळून बुद्धिमत्ता मोजण्याची एक नवी मोजपट्टी सिद्ध केली आणि त्या आधारे बुद्ध्यांक मोजण्यात येऊ लागला. मग आईनस्टाईनपासून तर पहिली-दुसरीत शिकणाऱ्या विद्यार्थ्यापर्यंत सगळ्यांचाच बुद्ध्यांक म्हणजे उपजत बुद्धिमत्ता मोजली जाऊ लागली. माणसांना यंत्रसामग्रीपैकीच एक समजणाऱ्या यांत्रिकीकरणाचा सर्वसामान्य कामगारावर होणारा परिणाम दाखवणारा चार्ली चॅप्लीनचा 'मॉडर्न टाईम्स' नावाचा अतिशय सुंदर चित्रपट रसिकांनी अवश्य बघावा.

अखेर पन्नासेक वर्षांनी या आयक्यूचा फुगा फुटला. याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे अडॉल्फ हिटलर आणि त्याच्या अत्याचारात हिरिरीने भाग घेणारे सगळे अधिकारी अतिशय उच्च बुद्ध्यांक असलेले होते. न्युरनबर्ग खटल्यात सापडलेल्या सगळ्यांची बुद्धिमत्ता चाचणी करण्यात आली होती. या सगळ्या नाझी अधिकाऱ्यांचा सरासरी बुद्ध्यांक १३० होता. त्यातल्या याल्मार शाख्त या हिटलरच्या सहकाऱ्याचा आयक्यू तर १४३ होता. हिटलरचा आयक्यू १४३ हून अधिकच असावा. त्यामुळे केवळ अफाट बुद्धिमत्ता असून उपयोगाची नाही. इ. स. १९६४ मध्ये डॅनियल गोलमन नावाच्या मानसशास्त्रज्ञ, विज्ञान पत्रकारानं भावनिक बुद्धिमत्ता (इमोशनल इंटेलिजन्स) या संज्ञेसह आपली मतं मांडणारे लेख लिहिण्यास सुरुवात केली. इ. स. १९९५ मध्ये याच नावानं त्याचं सर्वाधिक खपाचं पुस्तक प्रकाशित झालं.

'इमोशनल इंटेलिजन्स' म्हणजे आपल्या भावना समजून घेत त्यांचं योग्य प्रकारे व्यवस्थापन करण्याची क्षमता. माणूस कितीही बुद्धिमान असला, तरी त्याला आपल्या भावनांवर योग्य ते नियंत्रण ठेवता येतंच असं नाही. अमेरिकेसारख्या समृद्ध देशात शाळकरी मुलांनी आपल्या शाळेत केलेले गोळीबार, लहानसहान घटनांमुळे चिडून जात पाडले जाणारे खून, विशिष्ट प्रकारच्या स्त्रियांच्यापुरुषांच्या अपहरण-खुनांची मालिका इत्यादी गुन्हे वाढतच आहेत.

सामाजिक असुरक्षितता ही या प्रगत म्हणवल्या जाणाऱ्या आर्थिक सत्तेची मुख्य समस्या आहे. त्यामुळे भावनांचं व्यवस्थापन करता येणं हे एक स्वतंत्र कौशल्य असून ते आत्मसात केल्याशिवाय समाजात वावरण्यासाठी आपण लायक ठरणार नाही, हे गोलमननं पटवून दिलं. त्यामुळे गोलमनची ही संकल्पना लगेचच लोकप्रिय झाली.

या सगळ्या पृष्ठभूमीवर प्राचीन भारतीय विद्वानांनी सद्भावनांचं पोषण करणाऱ्या वृत्ती जोपासण्यावर, संवर्धनावर भर दिला आहे. आजच्या भाषेत त्याला सद्भावना गुणक (गुडविल कोशंट) म्हणता येईल. अगदी आरंभापासून विचार केला, तर ऋग्वेद संहिता १.८९ आणि वाजसेनीय संहितेनुसार २५.१४ मध्ये असलेल्या एका महत्त्वाच्या सूक्ताचे द्रष्टा आहेत ऋषी गौतम आणि देवता आहे विश्वदेव. या सूक्ताला शांतिपाठ सूक्त अथवा स्वस्तिमंत्र म्हणतात. स्वस्ती म्हणजे लोकांच्या कल्याणार्थ दिलेलं आशीर्वचन. शांती नांदावी आणि कल्याण व्हावं या हेतूनं नकारात्मक आणि विध्वंसक शक्तींचं शमन करण्यासाठी या मंत्रांचा घोष करण्यात येतो. त्यातली पहिलीच ऋचा आहे -

**'आ नो भद्राः क्रतवो यन्तु**
**विश्वतोऽदब्धासो अपरीतास उद्भिदः।**
**देवा नोयथा सदमिद् वृधे**
**असन्नप्रायुवो रक्षितारो दिवेदिवे ॥'**

**अर्थ-** विश्वाच्या चहू बाजूंनी आमच्याकडे असे कल्याणकारी विचार येत राहोत ज्याचे कोणी दमन करू शकणार, जे कुठूनही बाधित होऊ शकणार नाहीत आणि जे अज्ञात विषयांना प्रकट करणारे असतील. प्रगतीला अखंडित ठेवणारे (अवरोध निर्माण न करणारे) आणि रक्षण करण्यास सदैव सज्ज असलेले देवता प्रतिदिन आमच्या वृद्धीसाठी तत्पर राहो. या ऋचेचा अर्थ पाहिला तर कल्याणकारी विचार; मग ते कुठूनही येवोत, कसेही येवोत आमच्यापर्यंत पोहोचावेत हीच इच्छा, अपेक्षा व्यक्त केलेली आहे. ते दुर्दम्य असावेत आणि त्यांच्या मार्गात कोणत्याही प्रकारची बाधा उत्पन्न होऊ नये म्हणजे अनिरुद्ध असावेत यासाठी आमच्यावर प्रसन्न होऊन देवतांनी आमच्या उन्नतीकरिता सहाय्य करावं, अशी ही प्रार्थना आहे. सगळ्यांचं मंगल, शुभ, उत्तम करण्याचे विचार आमच्या मेंदूत, मनात, आचरणात रुजावे म्हणूनच ना ही प्रार्थना म्हटली आहे.

जगाच्या पाठीवर अशी एकमेव संस्कृती आहे जी सगळ्या विश्वाच्या मांगल्याची आणि कल्याणाची कामना करते. सगळ्या कार्याच्या मुळाशी सगळ्यांचं भलं व्हावं हाच एकमेव हेतू असावा, ही अपेक्षा व्यक्त करते. नव्हे 'भवतु सर्व मंगलम्' हीच एक वृत्ती अंगी बाणवण्याचा प्रयत्न आहे. हीच ती शुभामती आणि हाच तो सद्भावना गुणक. या विषयी अधिक जाणून घेऊ या पुढच्या लेखात.


तोवर आपल्या पूर्वजांनी आपल्याकडे सोपवलेला हा सद्भावना गुणक या संस्काराला आपल्या बुद्धी आणि मनात जपून ठेवण्यास विसरू नका.

# सापळा कंटेंटचा, सायबर-एआयचा!

यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८


'तुझ्या फोनवरून आज पहाटे साडेचार वाजता पिंटूने आपल्या मित्राला व्हॉटसअॅपवर मेसेज पाठवलाय!'' वडील मुलाच्या आईला चिडून म्हणाले. आई म्हणाली, ''हे कसं काय? तो तर माझ्या समोरच रात्री ११ वाजता झोपला.'' वडील अधिकच चिडले. ''तुला अनेकदा सांगितलंय की, तुझा मोबाईल पिंटूला देऊ नकोस!'' मग माझ्याकडे वळून त्याचे वडील म्हणाले, ''गेल्यावर्षी याचे मार्क्स ७० टक्के होते, पण यावर्षी तो ५० च्या आसपासच असतो.

शाळेत 'पॅरेण्ट टीचर मिटिंग'ला आम्ही दोघेही गेलो तेव्हा त्याच्या मॅडमने तक्रार केली की, हा वर्गात झोपतो.'' आई म्हणाली, ''मी तरी काय करू? हा मोबाईल नाही दिला तर आदळआपट करतो. सगळे झोपल्यावरसुद्धा तो पांघरुणाखाली लपून सारखा मोबाईल पाहतो.'' सापळा 'कंटेंटचा', सायबर-एआयचा!



**सायबर गुन्हे का घडतात?**

मी मुलाला, 'चल आपण एक गेम खेळू' असे म्हणून वेगळ्या खोलीत घेऊन गेलो.



तेथे एक सोपा यांत्रिक खेळ त्याला शिकवला. त्याला तो गेम आवडला. विश्वासात घेऊन त्याला विचारले की, ''एवढ्या पहाटे तू मित्राला मेसेज का पाठवला?'' त्यावर त्याने दिलेले उत्तर धक्कादायक होते. पिंटू म्हणाला, ''सर्वात उशिरा कोण झोपतं अशी आमची बेट लागली होती. त्यात मी जिंकलो!'' म्हणजे सकाळी शाळेची बस पकडायची असूनही तो रात्रभर जागा राहून चॅटिंग करत होता. ते सगळेच मित्र थोड्याथोड्या वेळाने चॅट चेक करीत होते. पण सगळ्यात शेवटी पिंटूचा मेसेज असल्यामुळे तो जिंकला होता.

मी त्याला विचारले, ''तुझी शाळेची बस कितीला येते?'' तो म्हणाला, ''साडेसातला.'' ''रोजची उठायची वेळ कोणती?'' ''साडेसहा!'' त्याची रोज झोप होत नव्हती म्हणून तो वर्गात झोपत होता. त्याचा ब्रेन कसा काम करतोय ते बघायला मी काही टेस्ट घेतल्यात तर खालील गोष्टी स्पष्टपणे लक्षात आल्या...

१) त्याच्या पाचही इंद्रियांचे सेन्सरी इनपुट व कोग्निटिव्ह डिक्लाईन म्हणजे मेंदूच्या संज्ञानात्मक जाणीव क्षमतेत घट झाली होती.

२) झोपेची गुणवत्ता कमी झाली होती; मुळात आवश्यक प्रमाणात झोपच होत नव्हती.

३) मेंदू अति उत्तेजित अवस्थेत जास्त वेळ राहिल्यामुळे मेंदूवर अधिक ताण आला होता.

४) भावनांवर नियंत्रण नव्हते. त्यामुळे राग, भीती व दुःख या भावना आवरता येत नव्हत्या.

५) समस्या निराकरण व निर्णय क्षमता कमजोर झाली होती.

६) न्यूरल ट्रान्समिशन कमजोर झाले होते.एकूणच ब्रेन रिजन स्पेशलायझेशन, सिग्नल प्रोसेसिंग, मेमरी तयार करणे आणि न्यूरोप्लास्टिसीटी या सगळ्यांवर वाईट परिणाम झाला होता.

७) मोबाईल व्यसनामुळे सामाजिक संवाद खुंटला व एकलकोंडेपणा वाढला. त्यामुळे विचारांचे प्रकटीकरण नीट करता येत नव्हते.

साध्या शब्दात सांगायचे तर त्याच्या वाईट सवयींचा मेंदूवर परिणाम होऊन त्याची बौद्धिक क्षमता कमी झाली होती. चेहरासुद्धा निस्तेज दिसत होता. खरे तर निसर्गाने जे आपल्या शरीराचे डिझाईन तयार केले आहे त्यात अशाप्रकारे आपल्या डोळ्यांना, मानेला, मेंदूला किंवा झोप, आहार या सगळ्याच बाबतीत शरीराचा तणाव सहन करण्याची शक्ती नाही. या ताणांचा अतिशय अज्ञान, उत्सुकता, लोभ, ईर्षा, राग, भीती, स्पर्धा, भिन्नलंगी आकर्षण या सात प्रकारच्या भावनांमुळे लोक सायबर गुन्ह्यांना बळी पडतात.

वाईट परिणाम मन आणि शरीर दोन्हीवर होतो. त्यावर या सगळ्या कृत्रिम साधनांचा कमीत कमी वापर करणे हाच सगळ्यात उत्तम उपाय आहे. या कृत्रिम साधनांचा वापर वाढल्यामुळे शारीरिक व्यायाम तर कमी झालाच; शिवाय झोपण्याच्या वेळा व प्रमाणात बदल झाल्यामुळे खाण्याच्या वेळा बदलल्या. अजून एक वाईट गोष्ट म्हणजे भारतीय वातावरणाला योग्य अशा पोषक पदार्थांना दूर सारून पिझ्झा, बर्गर, केक, पेस्ट्री, मोमो, नुडल्स, चीज व अनेक विदेशी पदार्थ मुलांना व मोठ्यांनाही आवडायला लागलेत. जास्त नफा कमावण्यासाठी हे पदार्थ व पनीरचे पदार्थ यात सर्रास अन्नच नसलेल्या रासायनिक विषाची भेसळ सुरू झाली. या सगळ्यांचा वाईट परिणाम सगळ्यांनाच भोगावा लागतोय.

**विदेशी 'कंटेंट-सापळा':** लहान मुले टीव्हीवर पाहतात त्या अॅनिमेटेड कार्टून फिल्म्समधील गोष्टीचा कंटेंट अतिशय घातक पद्धतीने जाणूनबुजून बदलण्यात आला आहे. त्यातील गोष्टींमध्ये नकारात्मक किंवा गुन्हेगारी करणाऱ्या पात्रांचे उदात्तीकरण केले जाते आहे. गुन्हेगार असलेल्या हिरोने कशी बुद्धी वापरली, हे पाहताना त्याला पोलिसांनी पकडू नये, तो पळून जाण्यात यशस्वी व्हावा अशी मानसिकता मुलांची वाढते आहे.म्हणजे गुन्हेगार हा हिरो व पोलिस हे व्हिलन अशी मानसिकता त्या गेम्समुळे बदलते आहे. तसेच कॉम्प्युटरच्या गेम्समध्ये अमुक अमुक पद्धतीने स्वत:ला घातक व जिवाला धोका होईल अशा प्रकारचे कंटेंट दाखवण्यात येते. शिवाय ते गेम्स अशा पद्धतीने तयार केलेले असतात की, मुलांना त्याचे व्यसनच लागते. भारतीय संस्कृतीनुसार कपाळाला गंध लावणाऱ्या, पीतांबर किंवा धोतर घालणाऱ्या ब्राह्मणांना वाईट दाखवणे, अगदी १९७० पासूनच भारतीय चित्रपटांनी हिंदू संस्कृतीचे हनन सुरू केले ते आजही सुरूच आहे.



'दिवार' चित्रपटात देवळात जायला, प्रसाद खायला नाही म्हणणारा अमिताभ दंडावर मात्र ७८६ नंबरचा बिल्ला बांधतो म्हणून संकटातून वाचतो, असे दाखविण्यात आले. जे जे मूळ सोज्वळ सनातनी, सात्त्विक भारतीयत्वाचे गुण आहेत, त्याचे पालन करणारे लोक हास्यास्पद किंवा मूर्ख आहेत, असे दाखवणारे कंटेंट मुलांच्या मनात पेरले जात आहे. त्याचवेळी परधर्मीय संस्कृती, विदेशी वस्तू व चालीरीती आहेत, त्या कशा आदर्श व विकसित जगाचा भाग आहेत, असे खोटे आदर्श अगदी लहान मुलांच्या फिल्म्स व गेम्समध्ये पेरले जात आहेत तसेच भिन्नलिंगी आकर्षण व भावना भडकवणारे व्हिडीओ व्हायरल होत आहेत.

थोडक्यात जे वाईट आहे ते अनुकरणीय दाखवून, जे चांगले आहे ते निरुपयोगी आणि बॅकवर्ड आहे, असे बालमनांवर बिंबविले जाते आहे. या उन्मादात मुले-मुली उदात्तीकरण **करणाऱ्या फोटो-** व्हिडीओची देवाणघेवाण करतात. त्यांना वाटतं की, हे फक्त आपल्या मित्र किंवा मैत्रिणीपुरतेच मर्यादित आहे. पण हे त्यांना माहितीच नसते की, कुणीही काढलेला फोटो हा लगेच डार्क वेब म्हणजे गुन्हेगारी जगतात उपलब्ध होतो. एवढेच नव्हे, तर सेल्फी कॅमेरा सतत तुमचे लाईव्ह चित्रीकरण करतच असतो. कुठलाही व्हिडीओ बघताना तुमचे हावभाव आणि तो कोणता व्हिडीओ हे सगळे तुमच्या सेल्फी कॅमेरामुळे सगळ्या जगाला उपलब्ध असते. याच पद्धतीने सेक्सटॉर्शनचे गुन्हे घडतात.

मी स्वतः नागपूर पोलिसांच्या सायबर सेलसोबत सायबर सायकॉलॉजिस्टच्या भूमिकेतून लोकांना जागृत करायला अनेक कार्यक्रम केले आहेत. यातून संरक्षण करण्यासाठी गरज नसेल तेव्हा सेल्फी कॅमेऱ्यावर व लॅपटॉपच्या कॅमेऱ्यावर कपाळावर लावतात तशी टिकली चिटकवून ठेवावी. 'एआय'चे आव्हान एआय तंत्रज्ञानामुळे प्रचंड ज्ञान कॉम्प्युटर व मोबाईलच्या आवाक्यात आले आहे तसेच इंटरनेटचा वेग वाढल्यामुळे मानवी मेंदू व मनाच्या पेक्षा जास्त वेगात मोबाईल व कॉम्प्युटर वापरणाऱ्याचे निरीक्षण करून त्याची माहिती व फीडबॅक सर्व्हरला पाठवतो. त्यामुळे माणूस या यंत्रांना वापरण्याऐवजी डार्क वेबद्वारे अतिस्वार्थी लोक आपले विचारसुद्धा आपल्या नकळत वेगात नियंत्रित करीत आहेत. त्यामुळे आवश्यकता नसलेल्या वस्तू विकत घेणे, चुकीच्या शेअर्समध्ये पैसे गुंतवणे किंवा सायबर गुन्ह्यात बळी पडणे, धर्मांतर करून जीवनाची दिशा बदलणे किंवा जीवच गमावणे अशा घटना घडत आहेत.

तसेच मेटा-एआय, चॅट-जीपीटीमुळे मेंदूचाच वापर कमी झाल्यामुळे वैचारिक व बौद्धिक पंगुत्व आले आहे. तात्पर्य समस्या निराकरण, निर्णय क्षमता व सद्बुद्धी कायम ठेवण्यासाठी एआयचा मर्यादित वापर जागरूकतेने व कौशल्याने व्हावा. कारण तंत्रज्ञान जरी महत्त्वाचे असले, तरी तारतम्य पाळावेच लागेल.

मानसिक, शारीरिक, आर्थिक व सामाजिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी सनातन संस्कृतीचे पालन करताना; स्वदेशी, नागरिक कर्तव्य, पर्यावरण, कुटुंबप्रबोधन व सामाजिक समरसता या पंचसूत्रींना प्राधान्य द्यावे लागेल. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## भवसिंधु हा तो । पार करा ।।

माझा देव उभा । पाहा विटेवरी ।।
भक्तास हा तारी । सर्वकाळ ।।१।।

समतेची विट । मोक्षाचे ते द्वार ।।
प्रेमभाव स्थिर । त्याचे ठायी ।।२।।

सावळ्याचे अंगी । शोभे पितांबर ।।
आत्मा निरंतर । चरणाशी ।।३।।

कंठी रूळे माळ । तुळशीची भक्ती ।।
नको जीवा सक्ती । संसाराची ।।४।।

कटेवरी हात । ठेऊनी सांगतो ।।
भवसिंधु हा तो । पार करा ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## बहरला हा पारिजात!

परच्या अंगणात, अलगद निखळून,
भूमीवरी चांदण्यांचा, सडा पडे विखरून!
पहाटेचा मंद वारा, झोंबतो येता जाता,
अमृताच्या मोत्यासम, गंधाळलेला पारिजात!
सुगंधित सुमनांचा, गालिचा अंगणात,
शोभा येई वृंदावनी, वैभवात उभा पारिजात!
पदरात वेचलेला, हृदयात मी ठेवलेला,
स्वर्गातून पाठविलेला, रुक्मिणीचा पारिजात!
केसरी दांडा फुलांचा, पाकळी उमलत जाता,
श्वास सुगंधित होतो, शुभ्र सुमन पारिजात!
पारिजात कौतुकाचे, ओंजळीच्या सुगंधाचे,
मन मोहरून जाते, चैतन्याचे हे पारिजात!

अमोल तपासे

## कुणाला माहिती नाही

जे चालले आहे ते का चालले आहे
तिलाही माहिती नाही मलाही माहिती नाही
मला सांगायचे आहे तुला सांगायचे नाही
सत्य मी सांगेन याचा तुला विश्वासही नाही
हवी आहेत काही उत्तरे दोघासही
प्रश्न गुंतागुंतीचे मांडणे सोपेही नाही
भेटण्या आधी कसे हे मोकळे आभाळ होते
हे ढगांचे आवाज आले कोठुनी माहीत नाही
ज्या नदीच्या वाळवंटी भेटलो होतो कधी
तो किनारा थंड वारा ओळखी पत्ताच नाही
हे करू अन् ते करू स्वप्नातले मजले किती
धाराशयी निष्प्राण झाले शेवटी खांदा ही नाही!

विजय पांढरीपांडे

# महाभारताचे मातृहृदय

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

भारतीय संस्कृती म्हणजे असंख्य अलवार नात्यांनी घट्ट विणलेला तलम शेला आहे. आपल्या प्राचीन संस्कृतीला गणगोताचे वैभवशाली कोंदण आहे. मातृत्वाची ऊब आहे. त्यामुळेच आपले बहुतांशी सण मातृत्वाचे कौतुक सोहळेच आहेत. अगदी महाभारताच्या प्राचीन काळापासूनचे मातृत्वाचे अनोखे रेशीमबंध बघून आपण हरखून जातो. महाभारतात पुत्र जन्माचा आणि पुत्र संगोपनाचाही सगळा भार स्त्रियांनीच पेललेला आहे.

अतिशय कठीण परिस्थितीत या स्त्रियांनी मुलांना जन्माला घातले आणि सजगपणे स्वतःच्या महत्त्वाकांक्षेने मुलांना वाढवून त्यांची व्यक्तिमत्त्वे घडविली. महाभारतातील मातृ हृदयाचा विचार करताना पहिल्यांदा आठवते ती माता सत्यवती. यमुनेतील द्वीपावर सत्यवतीने कौमार्यावस्थेत व्यासांना जन्म दिल्यानंतर त्यांचा लगेच त्याग केला. माता-पुत्राने एकमेकांपासून अलिप्त राहून जगणे स्वीकारले होते. पण कुरुवंश अखंड ठेवण्यासाठी सत्यवतीला व्यासांची आठवण झाली आणि मायलेकांचे मिलन एका अतिशय नाजूक वळणावर झाले. अनेक वर्षांनी आपला पुत्र व्यासाला बघून सत्यवतीने त्याला घट्ट पोटाशी धरले आणि खूप रडली. वंश विस्तारासाठी दोन तरुण सुनांसह व्यासांच्या मदतीने सत्यवतीने जो संघर्ष केलेला आहे, त्या संघर्षाची अद्भुत कहाणी म्हणजे महाभारत.

सत्यवती दीर्घायुष्याचा शाप घेऊन जन्मली होती. तिच्या हयातीतच महायुद्धाची बीजे आकाशाला भिडली. पांडूला राज्याभिषेक झाला आणि युवराज धृतराष्ट्र द्वेषाने पेटला. ती अतिवृद्ध असताना हस्तिनापूरच्या राजमहालात कारस्थाने रचली गेली. अशावेळी आपल्या वृद्ध आईला पुन्हा एकदा व्यासपुत्राने दर्शन दिले. ते म्हणाले, ''आई, ही वृद्ध धरती आता जास्त काळ जगणार नाही. तू येथून निघून जा.''

सत्यवतीने कुरू परिवाराचा निरोप घेतला आणि ती तपोवनाकडे निघाली. अतिशय एकाकी परिस्थितीत तिने उरलेले दिवस काढले. अनेक पुत्रांची माता असूनही अखेरच्या दिवसात तिचे मातृत्व एकाकी राहिले. महारथी भीष्म हा गंगेचा पुत्र. आयुष्याच्या कठीण वळणांवर माता गंगेने नेहमीच त्याच्याशी हितगूज केले. गंगेचे पृथ्वीवर अवतरण वसूंची माता होण्यासाठी आणि त्यांना शापमुक्त करण्यासाठी झाले होते. एकामागून एक मुलाचा जन्म होत होता आणि प्रत्येक मुलाला जन्मताक्षणीच गंगा प्रवाहात सोडून देत होती. माता गंगेचे ते एक कठोर कर्तव्य होते. आठव्या वसूला मात्र दीर्घायुष्य होते आणि राजा शंतनूने अडवल्यावर तो गंगेबरोबर स्वगृही गेला.

भीष्म म्हणजे शापित द्यू वसू होता. त्याची आजीवन ब्रह्मचर्याची प्रतिज्ञा म्हणजे त्याच्या शापाची परिपूर्ती होती. त्याने ब्रह्मचर्य पाळले नसते तर त्याच्या वंशाला मनुष्य जन्मच घ्यावा लागला असता. भीष्म गंगामातेप्रमाणेच त्यागमूर्ती होता. गंगा स्वतःचे बलिदान देऊनच वसूंची माता होण्यासाठीच पृथ्वीवर मानवी रूपात अवतरली होती. तिच्या बलिदानाप्रमाणेच तिच्या मुलाने देवव्रताने आयुष्यात असीम त्याग केला, असे म्हणावे लागेल. एकदा भीष्म आणि परशुरामाचे अनेक दिवस तुंबळ युद्ध सुरू होते. परशुरामाच्या घातक अग्निबाणांनी भीष्म बेशुद्ध होऊन जमिनीवर कोसळणार तेवढ्यात त्याला अष्ट देवमहर्षींनी उचलून घेतले. शुद्धीवर आल्यावर त्याने डोळे उघडले तेव्हा दिसले की, त्याची गंगामाई घोड्यांचा लगाम खेचून त्याचा रथ चालवते आहे. जेव्हा गंगेला कळतं की, अंबा उग्र तपाने भीष्माचा नाश करायला निघाली आहे तेव्हा तिचं हृदय कळवळतं.





ती म्हणते, ''अंबे, तू दुष्ट नदी होशील. तुझ्या कुशीत अक्राळविक्राळ मगरी, सुसरी विसावतील. तुझ्या अंगाखांद्यावरील तीर्थे निर्मनुष्य असतील.'' ५८ व्या दिवशी प्राणत्याग करताना भीष्म एकामागून एक अंगातील बाण मस्तकात खेचून घेतात. अंतिम संस्काराच्या वेळी कुरुपुत्र तर्पण करत असताना गंगा न राहवून बाहेर येते आणि एखाद्या सामान्य स्त्रीसारखा आक्रोश करते. आक्रोश करणाऱ्या मातृत्वात हृदयद्रावक कारुण्य असतं.

कुंतीच्या शब्दाखातर द्रौपदी पाच पांडवांची पत्नी झाली. आईचा शब्द पांडवांनी कधीच मोडला नाही. युधिष्ठिर स्पष्टपणे सांगतो की, गुरूचा शब्द ओलांडायचा नसतो आणि माता ही सर्वात श्रेष्ठ गुरू असते. वारणावताहून आगीच्या कल्लोळातून बाहेर पडल्यावर कुंतीला कष्ट नकोत म्हणून भीम तिला खांद्यावर उचलून नेतो. पण कुंतीचे मातृसौंदर्य महाभारताच्या अंतिम टप्प्यावर खऱ्या अर्थाने उन्मलून आले आहे. कौरवांचा नाश झाल्यावर उर्वरित आयुष्य अरण्यवासात जगण्याचा निर्णय धृतराष्ट्राने घेतला. गांधारीही त्याच्या मागोमाग निघाली. गांधारीचे जाणे अपेक्षितच होते. पण त्या क्षणी कुंती जे म्हणते त्यात मातृत्वाची सुकुमार ऋजुता दिसून येते. कुंती म्हणते की, ''दीर-भावजयीची सेवा करण्याची संधी मला यापूर्वी मिळाली नाही. आता अरण्यात मी त्यांचा सांभाळ करीन.'' कुंतीच्या या निर्णयाने पांडव प्रचंड अस्वस्थ झाले. ते आक्रोश करू लागले... ''माते, आम्हाला सोडून तू जाऊ नकोस.

विदुलेच्या पुत्रांची कथा सांगून तूच तर आम्हाला युद्धासाठी प्रेरित केले होते. जर तुला राजमाता व्हायचे नव्हते तर तू हे युद्ध कशाला होऊ दिलेस?'' उत्तरादाखल कुंतीने जे वक्तव्य केलेले आहे, त्यात मातृहृदयाचे मर्म दडले आहे. ती म्हणते, ''मुलांनो, ते सर्व मी स्वतःसाठी केले नव्हते. मी राजमाता व्हावी यासाठी तुम्हाला युद्धाला प्रवृत्त केले नव्हते. पण हे सर्व मी तुमच्यासाठी केले. तुमचे हक्काचे सिंहासन तुम्हाला परत मिळाले तर तुमची आणि तुमच्या पित्याची कीर्ती जपली गेली असती आणि म्हणूनच मी तुम्हाला युद्धाला प्रवृत्त केले.''

अशाप्रकारे धृतराष्ट्र, गांधारी आणि कुंती हस्तिनापूर सोडून अरण्यात जातात. अरण्यात लागलेल्या आगीपासून तिघेही वाचू शकत नाही. धृतराष्ट्र आंधळा आहे. गांधारीने डोळ्यांवर पट्टी बांधली आहे. त्यामुळे या दोघांची वाचण्याची शक्यता नाही. कुंती मात्र त्यांना सोडून जाऊ शकली असती. पण ती त्यांच्याच बरोबर राहिली आणि आगीत होरपळून भस्म झाली. धृतराष्ट्राने तिच्या पुत्रांचा कायम द्वेष केला तरी त्याच्या अंत:काळात मृत्यूला न डगमगता तिने धृतराष्ट्राला साथ दिली. दीर-भावजयेची ती माता झाली आणि हे मातृत्व अतिशय अद्भुत आईपण आहे.

कुंतीला पुत्र झाल्याच्या बातमीने गर्भवती गांधारी कमालीची अस्वस्थ झाली होती. आपल्या पोटी जन्माला येणाऱ्या पुत्राचाच राज्याभिषेक व्हावा या विचाराने ती सैरभैर झाली होती. पण यानंतरचा तिचा मातृत्वाचा प्रवास काळानुरूप प्रगल्भ होत जातो. धृतराष्ट्र पुत्रप्रेमाने आजन्म आंधळा आहे. पण गांधारीच्या पुत्रप्रेमात विवेक जपला गेला आहे. युद्धाअगोदर आशीर्वाद घेण्यासाठी तिचा ज्येष्ठ पुत्र दुर्योधन जेव्हा गांधारीकडे येतो तेव्हा युद्धाचे भवितव्य तिला पक्के ठाऊक आहे.

'विजयी भव' असा स्पष्ट आशीर्वाद ती देत नाही. 'तुझा पराजय होवो' असंही म्हणत नाही. अतिशय संयमाने ती म्हणते, ''पुत्रा, ज्या पक्षात धर्म असेल त्याचा विजय होवो.''गांधारीच्या प्रगल्भ मातृत्वाचे वेळोवेळी दर्शन घडते. जेव्हा युद्धाच्या पराभवाची बातमी घेऊन पांडव गांधारीला भेटण्यासाठी येतात तेव्हा ती बोलते, ''तुम्ही माझे शंभर पुत्र मारून टाकलेत. एखादा जरी जिवंत असता तरी आयुष्याच्या उत्तरावस्थेत एवढे दुःख भोगावे नसते लागले. हे अश्रू त्यामुळेच वाहत आहेत.'' त्यानंतर दुसऱ्याच क्षणी जवळ बसून रडणाऱ्या द्रौपदीला ती शांत करत म्हणते, ''मुली, शांत हो. आपल्या दोघींची व्यथा सारखीच आहे. आपण दोघीही आता पुत्रहीन झालो आहोत.''

द्रौपदी म्हणजे धगधगती यज्ञज्वाला. चैतन्याने ओतप्रोत भरलेली अग्नीसारखीच तेजस्विनी बुद्धिमती. द्रौपदीने सर्व काही सहन केलं. वनवासातली सर्व दुःखे पिऊन टाकली. अज्ञातवासातले अपमान गिळले. पण हीच द्रौपदी तिच्या मुलांच्या शिरकाणानंतर पूर्णपणे कोसळली. मुलांच्या अपमृत्यूमुळे तिच्या जिवाचा थरकाप झाला. याप्रसंगी तिने साक्षात कृष्णालाही अनेक बोल लावले. अश्वत्थाम्याला पकडण्यासाठी भीम त्याच्यामागे धावतो तेव्हा ब्रह्मास्त्रासारखे अमोघ अस्त्र अश्वत्थाम्याजवळ असल्याने भीमाचा मृत्यू ओढवेल, हे कृष्णाला चांगले ठाऊक होते. त्याने भीमाला परतण्याविषयी सांगितले. पण शोकाकुल द्रौपदीने कृष्णावरच संशय घ्यायला सुरुवात केली. पुत्रशोकामुळे ती कोलमडून गेली होती. महाभारतातील सुभद्रेची व्यक्तिरेखा म्हणजे मंदिर परिसरात छाया देणाऱ्या अनेक डेरेदार पिंपळ वटवृक्षाच्या सावलीत उगवलेले नाजूक पारिजातकाचे झाड आहे. सुभद्रा म्हणजे कृष्णाची धाकटी बहीण आणि अर्जुनाची बायको. द्रोणांनी रचलेल्या चक्रव्यूहात लढता लढता सुभद्रापुत्र अभिमन्यू मृत्युमुखी पडला. अभिमन्यूच्या मृत्यूच्या वेळेस सुभद्रा आक्रोश करते. नंतर युद्ध समाप्त झाले. युधिष्ठिराला राज्याभिषेक झाला. सुभद्रा कृष्णासोबत द्वारकेस गेली. वृद्ध पिता वसुदेवांनी कृष्णाला युद्धाची हकीगत विचारली तेव्हा अभिमन्यूची शोकांतिका ऐकल्यावर सुभद्रा जागीच कोसळून मूर्च्छित होते. अभिमन्यू पत्नी उत्तरेचा मेलेला गर्भ जिवंत करण्यासाठी सुभद्रेचा शोक कारणीभूत होता. नंतर परीक्षिताचा जन्म झाल्यावर सुभद्रा हस्तिनापुरात राहिली आणि तिने मातृत्व भावाने कुंती, गांधारी, धृतराष्ट्र आणि सर्व पांडवांची सेवा केली. अभिमन्यू नव्हता त्यामुळे त्याच्यावर तर ती प्रेमाची पखरण करू शकत नव्हती. पण सेवाभाव मनात ठेवून तिने सर्व ज्येष्ठांची मनापासून सेवा केली आणि आपल्या मनीचा मातृभाव सदैव तेवत ठेवला. अर्जुनाचा पाताळनगरीत राहणाऱ्या नागराज कौरव्याची नागकन्या उलुपी हिच्याशीदेखील विवाह झाला होता. हिनेदेखील युद्धानंतर हस्तिनापूरला येऊन सर्वांची मनोभावे सेवा केली. पांडव द्रौपदीसह स्वर्गारोहणाला निघाल्यावर उलुपीने गंगेच्या प्रवाहात शिरून आत्मसमर्पण केले. हिडिंबा पुत्र घटोत्कचाने पांडवांच्या विजयाचा पाया रचला. हिडिंबा, उलुपी, चित्रांगदा अर्जुनाच्या या सर्व बायकांचे मातृत्व विशालहृदयी होते. त्यांनी स्वतःच्या मुलांना मृत्यूची भीती न बाळगता पांडवाच्या बाजूने युद्ध करण्यास रणभूमीवर पाठविले.

**'कालः सृजति भूतानि कालः संहरते प्रजाः ।'**



# ऋतू हिरवा ऋतू बरवा....
# एक झिम्माड अलवार श्रावणधून

**श्रावण हा ऋतू संपूर्ण सृष्टीचा मनभावन असा असून तो पृथ्वीचा प्रिय साजन आहे अशा अल्लड, अवखळ आणि तितक्याच निरागस प्रणय धुंदतेतून श्रावणाची सजीवता, सृजनोत्सव आपल्या मनपटालावर एखाद्या अलवार शिडकाव्याप्रमाणे उडवून तना मनामध्ये श्रावणधून भिनवणारी कविता म्हणजे शांता शेळके यांची ऋतू हिरवा ही कविता होय. शांता शेळके यांच्या निसर्ग दत्त स्वाभाविक लेखणीमधून आकारास आलेले आणि महाराष्ट्राच्या मनातील ओल्याचिम्ब तरल भावनांचे पडसाद अधोरेखित करणारे गीत म्हणजे ऋतू हिरवा ऋतू बरवा हे होय. आषाढाच्या घनघोर मुसळधार पावसातून, पूर भरल्या नदीतून थोडासा दिलासा देत ऋतू जेव्हा ऊन पावसाच्या खेळ खेळू लागतो तेव्हा जीवनातील रम्यता आणि अद्भुतता यातून जन्मास येणारा श्रावण प्रत्येक माणसासाठी मनभावन श्रावण असतो हे वेगळे सांगण्याची गरज नाही.**

ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

आषाढ पेरणी आता स्वतःचे अस्तित्व सांगावे इतक्या सृजन प्रेरणेने अंगावर श्रावणाचे तुषार झेलून घेत असते आणि श्रावण थेंबांना आपल्या अंगा खांद्यावर झेलून घेत उगवणाऱ्या सूर्याच्या किरणांनी हिऱ्या समान चमकणाऱ्या थेंबांची उधळण म्हणजे श्रावण होय, श्रावणातल्या या प्रसन्न हिरवळीला उद्देशून शांताबाई या ऋतूला ऋतु हिरवा ऋतु बरवा, असे म्हणून संबोधतात, खरे म्हणजे बरवा हा शब्द प्राकृत मराठी मधला, मी कुणी विठ्ठल बरवा कुणी माधव बरवा यामध्ये बरवा हा शब्द ऐकलेला आहे, बरवा म्हणजे छान, बरवा म्हणजे सुंदर, सौंदर्याची आरास करणारा, या अनुषंगाने विचार केला असता शांता शेळके यांनी बरवा हा शब्द किती चपखलपणे आपल्या कवितेमध्ये वापरला आहे हे आपल्या लक्षात येते.

याच श्रावणामध्ये रुजून आणि फुलून आलेल्या पिकाला बाजूची उपमा देत शांताबाईची कविता पुढे सरकते, पाचूचा वनि रुजवा, युग विरही हृदयांवर सरसरतो मधु शिरवा...श्रावणामध्ये प्रेमीयुगुलाच्या प्रणयाला सुद्धा बहर आलेला असतो हे या सृजनशील ऋतूचे आणखी एक वैशिष्ट्य आणि म्हणूनच या काळात एकमेकांचा विरह जितका जीवघेणा असतो तितकाच लाघवी आणि विलोभनीय आणि अवीट गोडव्यासह शब्दांकित करता येतो याचे उदाहरण म्हणजे हृदयावर सरसरतो मधु शिरवा ह्या ओळी कानावर पडतात त्याची हृदयापर्यंत पोहचणारी ओली साद होय. आपल्या एखाद्या निवांत क्षणी आशा भोसले यांच्या आवाजात आपण जेव्हा हे गाणे ऐकत असतो तेव्हा हृदयावर सरसरतो मधु शिरवा ही ओळ अंगावर जिवंत असा सरसरून येणारा काटा उभा करते अशी अनुभूती आल्याशिवाय राहत नाही हे शांताबाईंच्या शब्दांचे सामर्थ्य की आशा भोसले यांच्या स्वरांचा महिमा याचा निर्णय आपण घेऊ शकत नाही.

श्रावणामध्ये ऊन पावसाचा खेळ सतत सुरू असतो, कधी कधी तर उन्हामध्ये पावसाचे चमकणारे थेंब आणि कोवळ्या उन्हाला तुषारच्या रूपाने नक्षत्रात देणं यांचा एकत्रित मेळ आपल्याला दिसतो. पावसामध्ये भिजणारे ऊन, त्या उन्हामुळे पावसाच्या थेंबा मधून चमकणाऱ्या मोत्यांची सर कोसळावी आणि चमचमत्या थेंबात गुंतलेले अनेक क्षण दिसावे काही भावनांच्या कल्लोळातील काही क्षण लपवून ठेवावे अशी काहीशी भावनिक अवस्था भरलेल्या आकाशाखाली सरसर थेंबांमुळे निर्माण होत असताना स्वच्छ उन्हात निळ्या आकाशाखाली वाहणारी तरल हवा मधाच्या गोड वेल्हाळ सुगंध आसमंती पसरवत झुळझुळत राहावी इतकी मनोहारी निसर्ग चित्रण करणारी शब्दकळा फक्त आणि फक्त एखादी निसर्गकन्याच प्रसवू शकते शकते यात शंका नाही. आणि म्हणूनच शांताबाई शेळके यांच्या पुढील ओळी अगदी नैसर्गिक आणि स्वाभाविरित्या आपल्या मनाचा ठाव घेतात, त्या अशा भिजुनी उन्हे चमचमती, क्षण दिप क्षण लपतीनितळ निळ्या अवकाशी मधुगंधी तरल हवाअसा हा श्रावण मनभावन असतो, मनास भावणारा ऋतू म्हणजे श्रावण, हा श्रावण कधी कधी वसंत ऋतूपेक्षाही मला आपलासा वाटतो, कारण वसंतामध्ये अल्हाददायक क्षणांसोबत रणरणत्या उन्हातील नकोनकोसे अनेक क्षण थैमान घालत असतात, मात्र श्रावण हा मनभावन असतो आणि सर्वांनाच प्रिय असा तो ठरतो, हा श्रावण नेमके काय करतो? तर तो कधी तोंतन भिजवतो तर कधी मन भिजवतो, अशावेळी हा सृजनवेल्हाळ ऋतू प्रणयाचा नवा संकेत थरथरत्या अधरावर कधी देऊन जातो ते या श्रावणात भिजणार्या चिंब वेड्या जिवांना कळत नाही मात्र शांता शेळके सारख्या मनस्वी कवयित्री,

**मनभावन हा श्रावण, प्रियसाजण हा श्रावण,**
**भिजवी तन, भिजवी मन हा श्रावण,**
**थरथरत्या अधरांवर प्रणयी संकेत नवा..**

अशा शब्दातून या सर्व भावना अलगदपणे टिपून, एखाद्या कुशल चित्रकाराप्रमाणे चित्रात रंग ओतावे तसे शब्दात जीव ओतून संपूर्ण श्रावणाचे जिवंत चलचित्र उभ्या करतात.

ऊन पावसाच्या एकत्रित आगमनातून नभामध्ये उमटणारे इंद्रधनुष्य हा निव्वळ सात रंगाचा एक पट्टा नसतो, अनेक भावभावनांचा तो समायोजित असा साकार रूप घेऊन अवतरलेला अलौकिक चमत्कार असतो ही जाणीव मनात रुंजी घालण्यासाठी मनामध्ये ओल असावी लागते, चातकाची तहान असावी लागते, कोकिळेचा कंठा असावा लागतो आणि गवताच्या पूर्णांकुरावर विश्व व्यापले जाते या भावनेतून पाहण्याची नजर असावी लागते ही असली की नभातील इंद्रधनु म्हणजे श्रावणाच्या पाऊस थेंबामध्ये मदनाच्या आकर्षक सौंदर्यमय चापातून सुटणारे तीर दिसू शकतात अर्थात इंद्रधनुष्य चापातून सुटणारे पावसाचे हे थेंबकमठे अनेकांना व्याकुळ आणि प्रणय विव्हळ करत असले तरी पूर्णपणे निरागस असून जगाच्या पाठीवर कोणाचेही नुकसान करण्यासाठी ते इंद्रधनुष्यातून सुटत नसतात. ते फक्त आकाशाच्या आणि धरतीच्या मिलनाचा दुवा म्हणून कार्य करत असतात शांताबाईंच्या शब्दात सांगायचे तर, नभी उमटे इंद्रधनू, मदनाचे चाप जणू, गगनाशी धरणीचा जुळवितसे सहज दुवा, मग श्रावणातल्या निवांत क्षणी एकदा तरी ऐकून तर पहा.....

ऋतु हिरवा ऋतु बरवा, पाचूचा वनि रुजवा, युग विरही हृदयांवर सरसरतो मधु शिरवा, भिजुनी उन्हे चमचमती, क्षण दिपती क्षण लपती, नितळ निळ्या अवकाशी मधुगंधी तरल हवा, मनभावन हा श्रावण, प्रियसाजण हा श्रावण, भिजवी तन, भिजवी मन हा श्रावण, थरथरत्या अधरांवर प्रणयी संकेत नवा, नभी उमटे इंद्रधनू, मदनाचे चाप जणू, गगनाशी धरणीचा जुळवितसे सहज दुवा (शांता शेळके).

पान १ वरून

# नव्या सहकार युगाचा आरंभ

जनऔषधी केंद्रे, पेट्रोल पंप, एलपीजी वितरण, सौरऊर्जा, जलयोजना, सोलर गृहनिर्माण, सहकारी टॅक्सी आदींनी रोजगार आणि सेवा पोहोचवण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. हा संपूर्ण धोरण आराखडा जागतिक पातळीवर सहकार चळवळीच्या नव्या प्रक्रियेशी जुळणारा आहे. 'आंतरराष्ट्रीय सहकार संघटना (आयसीए)' आणि संयुक्त राष्ट्रांच्या मान्यतेनुसार, सहकार चळवळ ही सामाजिक न्याय, आर्थिक समता आणि लोकशाहीसाठी एक पर्यायी आर्थिक मॉडेल म्हणून ओळखली जाते. युरोपातील स्वित्झर्लंड, डेन्मार्क, फिनलंडसारख्या देशांमध्ये शेतकरी, ग्राहक व मजूर सहकारी संस्थांनी त्यांच्या लोककल्याणकारी धोरणांचा कणा मजबूत केला आहे. केनियामध्ये 'सेव्हिंग ॲण्ड क्रेडिट को-ऑपरेटिव्ह' हे ग्रामीण वित्तीय समावेशनाचे प्रभावी साधन ठरल्या आहेत. ब्राझीलमधील सहकारी कॉफी उत्पादन संस्था किंवा अर्जेंटिनातील 'सामूहिक शेतकी संघटना' हे यशस्वी उदाहरणे मानले जातात.

भारताच्या सहकार धोरणाने आता प्रथमच या क्षेत्राच्या जागतिक पातळीवरील स्पर्धेसाठी धोरणात्मक पूर्वतयारी केली आहे. अमित शाह यांनी जाहीर केले की, सहकार क्षेत्रासाठी 'राष्ट्रीय निर्यात सहकारी संस्था' स्थापन केली आहे. यामुळे स्थानिक उत्पादनांचे आंतरराष्ट्रीय ब्रॅण्डिंग आणि बाजारपेठेत साखळी निर्माण होईल. याशिवाय बीज उत्पादन, जैविक कृषी उत्पादन, दुग्धोत्पादन इत्यादी क्षेत्रांत बहुराज्यीय सहकारी संस्था उभ्या राहतील. यातून 'भारत' ब्रॅण्ड निर्माण करून जागतिक सहकाराच्या केंद्रस्थानी भारताची उपस्थिती भक्कम केली जाणार आहे. तांत्रिक आधारित सहकार व्यवस्थापनाला चालना देण्यासाठी सर्व सहकारी संस्था डिजिटल रूपात काम करतील, व्यवस्थापन प्रक्रियेत पारदर्शकता येईल, कार्यक्षमतेत वाढ होईल आणि स्पर्धात्मकतेला चालना मिळेल. 'लस्टर मॉडेल' आणि स्वतंत्र मॉनिटरिंग यंत्रणा यांच्या आधारे प्रत्येक तहसीलमध्ये 'मॉडेल सहकारी गाव' तयार होईल. 'श्वेतक्रांती २.०'च्या माध्यमातून महिलांचा अधिक सहभाग वाढवून ग्रामीण अर्थव्यवस्थेला नवी ऊर्जा मिळेल. या धोरणाची यशस्वी अंमलबजावणी ही केंद्र व राज्य सरकार, सहकारी संस्था, नागरिक आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये संपूर्ण समन्वयावर अवलंबून असेल. सहकारी संस्था जर पारदर्शकतेने, लोकाभिमुखतेने आणि व्यावसायिक दृष्टिकोनातून कार्यरत राहिल्या, तर भारतातील सहकार चळवळीचे रूपांतर जागतिक सहकार चळवळीच्या केंद्रस्थानी होऊ शकते. 'आयसीए' आणि 'युएन'सुद्धा २०३० सालापर्यंतच्या शाश्वत विकास लक्ष्यांत सहकार क्षेत्राला महत्त्वाचे साधन मानतात आणि भारताच्या धोरणात याच दृष्टिकोनाचा परिपूर्ण समावेश आहे.

आज जेव्हा भारत 'विकसित राष्ट्र' होण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे, तेव्हा केवळ 'जीडीपी' वाढविणे हा उद्देश पुरेसा नाही, तर प्रत्येक नागरिकाला आत्मसन्मान, स्थिरता, सहभाग आणि विकासाच्या प्रवाहात स्थान मिळणे गरजेचे आहे. 'राष्ट्रीय सहकारिता नीती २०२५' हा दस्तावेज केवळ योजना किंवा घोषणा नाही, तर भारतीय लोकशाहीतील आर्थिक सहभागाचे नवे संविधान ठरू शकतो. भारताच्या सामाजिक-आर्थिक इतिहासात सहकाराला दिले गेलेले हे धोरणात्मक बळ केवळ देशांतर्गत नव्हे, तर जागतिक स्तरावरही भारताच्या विकास मॉडेलचा एक मानदंड ठरू शकेल.

# 'लव्ह जिहाद'चे बळी पुरुषही!



गुलामच झाल्या. फसवणार्यांनी काही महिने त्यांचे लैंगिक शोषण केले. नंतर या मुलींना वेश्या व्यवसायातही ढकलले. दोन-तीन वर्षांतच या मुलींना एडस झाला, तेव्हा त्या पुरुषांनी या मुलींना एक विशेष काम दिले. नाममात्र पैसे घेऊन, हिंदू पुरुषांशी लैंगिक संबंध ठेवायचे. या मुलींना त्या पर्यटनस्थळावर उभे करण्यात आले, दुसरीकडे पर्यटनस्थळी त्यांचे हस्तक होतेच. त्यांनी गावातून शहरात आलेल्या त्या मुलांना बरोबर हेरले. त्यांना या तरुणींकडे जाण्यास प्रवृत्त केले. या मुलींमुळे हे तरुण एडसबाधित झाले. उज्ज्वल आयुष्याची स्वप्न पाहणारे तरुण मृत्यूशय्येवर पोहोचले. तो तरुण बोलत होता. त्याचे म्हणणे ऐकून संताप आणि दुःख एकत्रच दाटून आले.

असो! आग्रा धर्मांतरण घटना उघडकीस आल्यावर हिंदू पुरुषांचेही धर्मांतरण होते, तेही 'लव्ह जिहाद'चे बळी होतात, हे समाजासमोर आले आहे. या परिक्षेपात आठवतात ते छत्रपती संभाजी महाराज! औरंग्याने छत्रपती संभाजी महाराजांना आमिष दिले होते की, मुसलमान बनलास तर माझ्या मुलीशी निकाह लावून देईन. बादशहा बनून सुखात राहशील. छत्रपतींनी हालहाल होऊन मृत्यू स्वीकारला; पण इस्लाम स्वीकारला नाही. त्यांचे शौर्य आठवताना त्यांचा जाज्वल्य धर्माभिमान आठवताना वाटते की, घरातल्या वंशाच्या दिव्याने हिंदू धर्मसंस्कृतीची नीतिमत्ता, वैभव शिकवणे गरजेचे आहे. तसेच, त्यांना जगभरात मानतवेला काळिमा फासणारा जिहाद समजावणेही तितकेच गरजेचे आहे, जितके घरातल्या लेकींना!

## आठवणींचं गुपित..!

हृदयाच्या एका सुंदर कोपऱ्यात
साठवल्यात साऱ्या आठवणी
काही सुखद तर काही दुःखद
केली मी आता हृदयाचीच
लेखणी..!
दुःखद म्हणाली मी इथेच बरी
अश्रू ढाळण्या माझी आहे
मनाई
सुखद लिही मनास येईल
उभारी
दुःखास सुखाची झालर हवी
किनई..?
आठवणींचा कल्लोळ हृदयी
मावेना
साऱ्यांची चढाओढ लेखणीस
कळेना
जिंकली आई ती तर दुधा-
वरची साय ना
लिहिण्यास दिला वात्सल्याचा
पदरच ना..!
हा ईश्वरी ठेवा आहे तुझी
आठवण आई
देहाविना तुझे अस्तित्व हृदयी
कोरलेले
आई झाल्यावरच कळली तुझी
पुण्याई
ममत्वास ममत्व मिळाले डोळे
ओलावले..!
आठवणींचे चलचित्र समोर
दिसू लागले
आई बाबा मग शाळाकॉलेज
काही बाही
शाळेतले स्वयंशासन सारे
काही आठवले
शाळेत गुरूंनी संस्कार दिलेत
सही सही..!
आठवणींचा बांध आताअसा
काही फुटला
काही अनिष्ट आठवणी पुरात
वाहून गेल्या
काहींना आली भरती त्या
उचंबळून आल्या
लेखणीचा वेग मात्र आता
कमी पडू लागला..!
सुखदुःखाच्या आठवणींनो व्हा
थोडं संयमित
हृदयी वसा तुम्ही तिथेच
असाल ना सुरक्षित
टप्प्या टप्प्याने तुमचा न्याय
करेन मी निश्चित
जीवनाच्या या लढाईत
ठेवावंच लागतं गुपित..!

सुषमा गलगलीकर

कथा
अलका मोकाशी

# अंधश्रद्धा

'अगं तृप्ती उठ ना... किती वाजले बघ घड्याळात जरा. साडेसहा वाजलेत. तुझ्या मॅडमनी बोलावलं आहे ना आपल्याला भेटायला? डान्स करायचा आहे की नाही तुला?''

''आई उठते ना...पाच-दहा मिनिटं थांब.. प्लीज आई. आज थोडं उशिरा जायचं आहे तर झोपू दे ना.'' असं म्हणून तृप्ती परत झोपी गेली. उठली तर साडेसात वाजले होते. आठ वाजता निघायचं होतं. वृषालीची चिडचिड सुरू झाली.

''कितीही सांगितलं तरीही ही आपल्या मनाचंच करते. आता एवढ्या उशिरा उठली. अंघोळ, वेणी, दूध. पिरीएड्स तरी काढले आहेस का की तेही भरायचे आहे बॅगमध्ये?'' बोलता बोलता वृषालीचा आवाज रडवेला झाला होता. तिची चिडचिड ऐकून सासूबाई शेवटी बोलल्या, ''नको वृषाली एवढी काळजी करू. सगळं होईल व्यवस्थित. आहेच केवढी ती? जेमतेम आठवीत.'' तेवढ्यात स्वयंपाकघरात दाणकन काहीतरी पडल्याचा आवाज आला. धावत दोघीजणी किचनमध्ये गेल्या. बघते तर काय, काचेचा ग्लास दुधाने भरलेला तृप्तीच्या हातून पडला होता.

''अरे देवा! झालं तुझ्या मनासारखं...'' बडबड करत वृषाली काचा उचलायला लागली. ''वृषाली, अगं राहू दे हे सगळं. मी आवरते. तू ये जाऊन.'' बाहेर जायच्या वेळी नेमकी काच फुटलेली पाहून वृषालीचं मन अजूनच खट्टू झालं. ''जाऊ दे; आज आपण काही जाऊ नाही. तुझ्या मॅडमला फोन करून सांगून देऊ.''

''आई असं काय करते. आज सिलेक्शन आहे. मग मला घेणार नाही ना डान्समध्ये.''

''मग उशीर कुणी केला.. मी?'' वृषाली बेडरूममध्ये रागारागाने जाऊन बसली. तृप्ती आजोबांजवळ जाऊन रडायला लागली. ''सूनबाई, अगं असं नको करू. झालीय नं ती तयार.. घेऊन जा तिला. मीच गेलो असतो, पण माझा पाय खूप दुखतोय गं.'' ''बाबा... माझं मन होत नाहीये. नेमकी काच फुटली बाहेर जाताना. काही बरं-वाईट झालं तर!''

''असं काही होणार नाहीये. तू या जगातली नं. मन पक्कं असलं की काही होत नाही. उगाच कशाला तिच्या मनात असल्या गोष्टी भरवतेस? जा बाळ..सोडून ये तिला.'' डोळे पुसत वृषालीने गाडीची चावी घेतली.

गॅलरीतनं पाहात असलेल्या आजी- आजोबांना तृप्तीने टाटा केला. ऑफिस टाईम असल्यामुळे रस्त्यावर खूप गर्दी होती. प्रत्येक सिग्नलवर थांबण्यात खूप वेळ जात होता. म्हणून वृषालीने एका आतल्या रस्त्याने गाडी काढली. तिथे बिलकूल गर्दी नव्हती. आजूबाजूला भरपूर झाडं होती. पिवळ्या बहाव्याचा मस्त सडा पडला होता. पक्ष्यांचा चिवचिवाट ऐकू येत होता. दोघींचंही मन प्रसन्न झालं. तितक्यात तृप्ती डोक्याला हात लावून ओरडली,

''आई गं!'' वृषालीने गाडी थांबवली.

''काय झालं गं?''

''अगं, पक्ष्याने जोरात चोच मारली डोक्यावर!''

''काय? कोणता पक्षी होता?''

''ते नाही बघितलं मी.''

''असं कसं नाही बघितलं. काळा होता का? कावळा तर नव्हता ना?''

''आई नाही दिसला मला. बघायच्या आत उडून गेला.'' वृषालीचे डोळे पाण्याने डबडबले. क्षणात तिचं बहाव्याने फुललेलं मन भूतकाळात गेलं. तुषारला शूगर निघाली म्हणून डॉक्टरांनी रोज फिरायला सांगितलं होतं. शिवाय वजनही वाढलं होतं. तुषारबरोबर वृषालीही जवळच्याच पार्कमध्ये रोज सकाळी फिरायला जायची. खूप सुंदर पार्क होता. मोठमोठी झाडं आपल्या लांब लांब फांद्या घेऊन पसरली होती. खूप वेगवेगळे पक्षी यायचे तिकडे. एकदा फिरताना ते दोघे गप्पांमध्ये रमले होते. अचानक एका पक्ष्याने तुषारच्या डोक्यावर झडप घातली आणि उडून गेला. कळलंच नाही कुठला पक्षी ते. असंच परत दोनदा झालं. तिसऱ्यांदा जेव्हा झालं तेव्हा तिला काळ्या रंगाचा पक्षी दिसला. त्यावरून तिने अनुमान बांधला की कावळाच असला पाहिजे. तोपर्यंत तिच्या मनात कुठल्याही अंधश्रद्धेने घर केलं नव्हतं. तिथून काही महिन्यांनी तुषारची तब्येत बिघडली. डॉक्टरांनी जेव्हा निदान केलं की, त्याच्या दोन्ही किडन्या खराब झाल्या आहेत. त्यानंतर त्याची तब्येत खालावत गेली आणि तो गेला. ती सारखा विचार करत होती, 'असं का झालं असेल? आत्तापर्यंत तर ठीक होता. आपल्याला कसं कळलं नाही तुषारच्या तब्येतीचं?' ती विचारात गढलेली असताना तिला एकदम क्लिक झालं, 'अरे हो, आपल्याला संकेत मिळाले होते. कावळ्याने झडप घातली होती तुषारच्या डोक्यावर...'

तिला ती गोष्ट खूप लागून गेली. तेव्हापासून तिच्या मनात भीतीच भरली होती. तिच्या डोक्यातून ती गोष्ट जाईना. आणि, नेमकं आजही तेच घडलं होतं. तिचं शरीर थरथरायला लागलं. तिने तृप्तीला गाडीवर बसवलं आणि गाडी घराकडे वळवली. बेल वाजली म्हणून सासूबाईंनी दार उघडलं...

''काय गं? आता काय झालं? इतक्यात कशा परत आल्या? आणि तुझी शाळा?'' वृषाली काहीच बोलली नाही. तिने चावी खिळ्याला अडकवली आणि तरातरा बेडरूम निघून गेली. मांडीत डोकं खुपसून रडायला लागली. तिच्या सासू-सासऱ्यांना काही कळेचना काय झालं? ''काय गं, तू काही केलंस का?''

''नाही गं आज्जी. पक्ष्याने माझ्या डोक्यावर जोरात चोच मारली, तर आई सरळ गाडी घरीच घेऊन आली.''

''पक्षी काय म्हणते..कावळ्याने चोच मारली. कावळाचं असेल तो.'' वृषाली तावातावाने बोलत होती. सासू-सासऱ्यांना माहिती होतं की, हा मामला आता गंभीर होणार आहे. त्यांनी हळूच फोन करून तिच्या आई-बाबांना बोलावून घेतलं.

''अगं वृषाली, काय झालं बेटा?''

''आई तृप्तीच्या डोक्यावर कावळ्याने चोच मारली.''

''अगं, मग काय झालं? आभाळ कोसळल्यासारखी काय करतेस?'' ''काय झालं? तुषार त्यानेच गेला ना? तीन वेळा कावळ्याने चोच मारली होती त्याच्या डोक्यावर. त्यानंतर तो गेला.'' वृषाली हुंदके देऊन रडायला लागली.

''अगं काही काय बोलते? तुषार कशामुळे गेला तुला ठाऊक नाही का? त्याच्या किडन्या फेल झाल्या होत्या. आता काय, मग तृप्तीला घरीच बसवून ठेवणारेस का?'' ती काही ऐकण्याच्या मूडमध्ये नव्हती. ''तरी मी म्हणत होती जाताना काच फुटली तर जात नाही म्हणून.

बघा आता काय झालं?'' दुसऱ्या दिवशी तिने तृप्तीला शाळेत जाण्यासाठी ऑटो बोलावला. ती स्वतः तिच्याबरोबर ऑटोत बसली. शाळेत बाहेर उतरल्यावर डोक्यावर छत्री पकडून ती तिला वर्गात सोडून आली. असं ती रोज करायला लागली. दोन-तीन महिने ती रोज असंच वागत होती.

तिलाही खरं म्हणजे खूप त्रास होत होता. सासू-सासऱ्यांनाही वाईट वाटत होतं. मुलगा गेल्याचं दुःख वेगळं. काय उपाय करावा त्यांना कळेना. शेवटी त्यांनी त्यांचे फॅमिली डॉक्टर मोहोडना घरीच बोलवायचं ठरवलं. त्यांना सगळी घरची परिस्थिती माहिती होती. ते आले, त्यानंतर वृषाली तृप्तीला शाळेतून घेऊन आली. डॉक्टरांना पाहून तिला आश्चर्य वाटलं.

''अरे डॉक्टर काका तुम्ही!''

''हो, कशी आहेस?''

''मी ठीक आहे.''

''आणि तृप्ती?''

''ती पण ठीक आहे.''

''असं का विचारताय काका?''

''अगं, तू तिला शाळेत सोडून येतेस छत्री घेऊन आणि आणायला जातेस. मग मधल्या सुट्टीत ती जेव्हा ग्राऊंडवर खेळते तेव्हा तू कुठे असतेस? शिवाय तिच्या जन्माच्या वर्षी तू सूर्यग्रहणात चुकून खूप उकडतंय म्हणून कैरी किसली होतीस पन्हं करायला. तेव्हा काही झालं नाही ना तिला. सुखरूप जन्म दिलास ना तू तिला?''

''हो!'' तिच्या डोळ्यात अश्रू जमा झाले...''मला तृप्तीला गमवायचं नाही. तुषार सोडून गेला. आता मला फक्त तृप्तीच आहे...'' ''आणि या दोन म्हाताऱ्यांना तुम्ही दोघी! तू जर अशी वागली तर त्यांनी कुणाकडे पहायचं. तृप्तीची अशाने प्रगती होणार का? प्रगती नाही झाली तिची तर तुझ्यावर रडायची वेळ नक्की येईल. कावळ्याने चोच मारल्याने नाही.'' डॉक्टर जरा रागवण्याच्या सुरातच बोलत होते.

(पान ६ वर)

प्रबंधांची बीजे
श्रीरंग हिर्लेकर

# 'शुद्ध सुमनांची शेज । भक्तिभावे आता नीज ।।'

संतांच्या मनातील करुणा हा त्यांचा स्थायीभाव असतो. आई ज्याप्रमाणे आपल्या बाळावर निरतिशय प्रेम करते तसेच प्रेम संतांचे, प्रत्यक्ष परमेश्वरावर आणि सामान्यजनांवरही असते. या प्रेमापोटी प्रत्यक्ष परमेश्वराला अनेकांनी बाळलेणी चढविलेली आहेत. आपल्या मनातील नवविधा भक्तीचे अलंकार परमेश्वराला घालून त्याचे रुपडे अधिकच गोजिरवाणे केले आहे. संतांचे अंतःचक्षू आत्म ज्ञानाच्या पाण्याने स्वच्छ धुतलेले असतात. त्यांच्या डोळ्यांमध्ये गुरुकृपेचे अंजन असते. त्यामुळे परमेश्वराच्या रूपाचे ध्यान केले की, त्यांच्या सृजनाला नवनवोन्मेषी धुमारे फुटतात. त्यांची सृजनशक्ती पल्लवित होते. त्यांची प्रतिभा आकाशगामी होते.

संत कवयित्रींनी तर भक्ती आणि काव्यप्रतिभा यांचा मेळ घालून संतसाहित्यात बहार आणलेली आहे. या संत कवयित्रींमध्ये विविध जाती-धर्माच्या, समाजातील सर्वच स्तरातील स्त्रिया होत्या. त्यात कुणी प्रपंचाचा अनुभव असलेल्या, कुणी नसलेल्या, कुणी परित्यक्ता, कुणी विधवा अशाही स्त्रिया होत्या. त्यांच्या रचनां धून स्त्रीत्व आणि स्त्रीभाव प्रकट झालेला आहे. या सर्वांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी आपल्यातील मातृभाव जोपासला. या मातृभावाच्या मायेची पाखर सर्व भक्त संप्रदायावर घातली. भागवत धर्माच्या परंपरेला या संत कवयित्रींनी एक वेगळेच बळ प्रदान केले. कारण त्याच्या पाठीमागे होता तो त्यांच्यातील मातृभाव! या सर्वांत जनाबाईचे आश्चर्य वाटते. जनाबाई ही संत नामदेवांच्या परिवारात राहिली. नामदेवांचे कुटुंब चांगले ऐसपैस म्हणजे चौदा जणांचे होते. या 'नामयाच्या जनीचे' कष्टाळू जीवन, भावविव्हळ मन, तिच्या अंतरीची तगमग, समर्पणशीलता इतकेच नव्हे, तर तिचा सात्त्विक संतापही तिच्या अभंगामधून व्यक्त होतो.

'**दळू कांडू खेळू। सर्व ताप हरू**' अशी तिची साधना होती. 'स्त्री जन्म म्हणोनि न व्हावे उदास' म्हणून तिने सर्व स्त्रीजातीला एक आत्मविश्वास दिला. '**दळिता कांडिता तुज गाईन अनंता**' म्हणत तिने आपला सर्व व्यवहार विठ्ठलरूप केला. '**घार हिंडते आकाशी चित्त तिचे पिलांपाशी। तैसे झाले माझ्या जीवा कधी भेटसी केशवा ।।**' अशी आर्त आळवणी करणाऱ्या जनाबाईने एका रचनेत विठोबाला दूषणेही दिली आहेत.

'**अरे अरे विठ्या मूळ मायेच्या कारट्या। तुझी रांड रंडकी झाली जन्मसावित्री चुडा ल्याली । तुझे गेले मढे तुला पाहुनी काळ रडे । उभी राहुनी अंगणी शिव्या देते दासी जनी।**' असे असूनही जनाबाईच्या मनात पांडुरंगाविषयी मातृभावच दिसून येतो, असे तिच्या रचनां धून दिसते. असा मातृभाव आपल्या मनीमानसी बाळगणाऱ्या जनाईला, लौकिकार्थाने प्रपंचाचा कुठलाही अनुभव नव्हता. तत्कालीन अंत्यज समाजात जन्माला आलेल्या जनाईच्या मनात पंढरपूरची जबर ओढ होती. पांडुरंग हा जसा तिचा सखा होता तसाच, तो तिचा बाळही होता. जनाबाईचे सर्व आयुष्य संत नामदेवांच्या घरी कष्ट उपसण्यात गेले. भगवंताचे नामस्मरण हाच तिचा श्रमपरिहार होता. श्रीकृष्ण हा तिचा सखा होता. परंतु त्याच्याबद्दलचे अपत्यप्रेम ही तिच्या मनात काठोकाठ भरलेले होते. तिचा हा अभंग वाचा....

'**माझे अचडे बचडे छकुडे गे राधे रुपडे। पांघरू घालिती कुंचडे। हरी माझा गे सावळा। पायी पैंजण वाजे खुळखुळा।। याने भुलविल्या गोपबाळा। जनी म्हणे तू चक्रपाणी ।खेळ खेळतो वृन्दावनी। लुब्ध झाल्या गौळणी।**'



तिची एक रचना देण्याचा मोह टाळता येत नाही. प्रत्येक स्त्रीच्या मनात उपजतच 'आई'पण असते. अपार भक्तीने या आईपणाला वात्सल्याची किनार लाभली. जनाबाईची ही रचना मातृप्रेमाचे प्रतीकच नव्हे काय?

**'सावळा गोविंद सावळे हे लेणे।**
**सावळ्याने मन वेडे केले।।**
**सावळ्याच्या कानी सावळी कुंडले।**
**सावळी पाऊले आलिंगिली।।**
**सावळी कस्तुरी सावळी हे शोभा।**
**सावळा का उभा पाहियेला।।**
**सावळा तो वेळू सावळी ते गाय।**
**सावळी रखु ई पाहियेली।।**
**जनी म्हणे आता सावळा भेटून।**
**जावे लिंबलोण केले आजी।।**
**मज सावळ्याने घातियेली मिठी।**
**आता माझ्या पोटी नारायणा।।**
**देह माझा देव सावळा गोविंद।**
**उभा रे गोविंद नारायणा।।**
**अंगावरी लोट पूर दाट आला।**
**संत हे लावला नारायणा।।**
**जनी नामयाची मूर्ती गोविंदाची।**
**उभी आनंदाची पंढरीत।।'**

कधी कधी मनात विचार येतो, जनाबाईला जे दिसले; ते आपल्याला का दिसत नाही? कारण एकच, आपण रात्रंदिवस जे कष्ट करतो ते देहासाठी. तेवढेच कष्ट मनासाठी केले तर आपल्याला देव बालस्वरूपातच काय; कोणत्याही स्वरूपात भेटल्याशिवाय राहणार नाही. त्यासाठी मनात हवी ती निस्सीम भक्ती, अपार माया आणि असीम करुणा!

जनाबाईचे मातृहृदय तिच्या अजून एका रचनेतून दृगोचर होते. संत ज्ञानदेव हे नाथसंप्रदायाचे असल्याचा तिला अभिमान आहे. तिला या पंथातील सर्व नाथांची जाणीव आहे. आदिनाथ भगवान शंकराने माता पार्वतीला सांगितलेले बोध रहस्य भगवान श्रीविष्णूंनी मत्स्याच्या रूपात ऐकले. तेथून ते गोरक्षनाथांना प्राप्त झाले.

परंपरेने ते ज्ञान ज्ञाननाथांपर्यंत आले. ते जनाबाईलाही मिळाले असावे. जनाबाईने गोरक्षनाथांचा पाळणा लिहिलेला आहे. गोरक्षनाथांसारख्या अवधूत वृत्तीच्या आणि नाथसंप्रदायातील मनीषीला, आपले बाळ समजून तिने बोधामृताचे आदिबीज सांगणारा पाळणा लिहिला. आपल्या शब्दांच्या पाळण्यात ती मातृभावनेची पवित्र फुले घालते आणि गोरक्षनाथांना भावभक्तीची नीज देते. जनाबाई ही ज्ञानेश्वरांना समकालीन होती. संजीवन समाधीच्या वेळी ती तिथे होती. ती संजीवन समाधी, ती नीज हा पाळणा जेव्हा लिहिला तेव्हा जनाईने डोळ्यासमोर ठेवली असावी. हा पाळणा गातांना जानाई ही गोरक्षनाथांची आई होते. तिचे भाव उन्मनी होतात.. तिला स्वतःलाच आत्मलोपी निद्रा लागते. तिचे लौकिकपण मावळून जाते. ती अद्वैताचा अनुभव घेते. वाचताना आपणही त्यात असेच बुडून जातो.

**'जो जो जो जो रे गोरक्षा ।**
**जगदोद्धारा जगदीशा ।।**
**शुद्ध सुमनांची शेज ।**
**भक्तिभावे आता नीज ।।**
**माता उन्मनी केवळ ।**
**निजी निजले गोपाळ ।।**
**मागे घालुनी आनंदा ।**
**सुखे निजे बा गोविंदा ।।**
**अद्वय नाम गीती गाता ।**
**दासी जनी कैची आता ।।'**

जनाबाईच्या रचनांवर नामदेवांची काहीशी छाया दिसून येते. जनाबाईच्या मनातील आई केवळ गोरक्षनाथांपुरतीच मर्यादित राहिली नाही. ज्ञानदेवांबद्दलही तिच्या ठायी अपार भक्ती होती. तिने एके ठिकाणी ज्ञानदेवांनाही बाळ मानलेले आहे. तिला ज्ञानदेवांचा अधिकार ठाऊक होता. तिचे ज्ञानदेवांविषयीचे भक्तिप्रे , तिच्या खालील रचनेतून दिसून येते. पहिल्या ओळीत ती ज्ञानदेवांना सखा म्हणते. दुसऱ्या ओळीत बाळ मानते. तिसऱ्या ओळीत भाऊ मानते. नाते कोणतेही असो तिच्या मनातील मातृप्रे यात दिसून येते.. तिची साक्षात्कारी इच्छा दिसते. ती म्हणते...

'**ज्ञानाचा सागर। सखा माझा ज्ञानेश्वर। मरोनिया जावे। बा, माझ्या पोटी यावे। ऐसे करी, माझ्या भावा। सख्या माझ्या ज्ञानदेवा। जावे ओवाळुनी। जन्मोजन्मी दासी जनी।**'


संत मुक्ताबाई म्हणजे तर सर्व संतमंडळाची आईच होती. निवृत्तिनाथ, ज्ञानदेव, सोपानदेव यांची ती बहीण होती असे म्हणण्यापेक्षा, ते तिचे भाऊ होते, असे म्हटले तर? तिचे हे आईपण तिच्या भावंडांच्या बाबतीत वेळोवेळी दिसून आले आहे. केवळ १७ वर्षे काही महिन्यांचे आयुष्य लाभलेल्या मुक्ताईचा अनुभव आणि अधिकार मोठा होता. १७ व्या वर्षापर्यंत कसे जगावे हेच आजच्या तरुण मुलामुलींना समजत नाही; त्या वयात ती या भावांची आई झाली. तिचे हे आईपण ताटीच्या अभंगात प्रकर्षाने जाणवते. योगिराज चांगदेव आणि ही चारही भावंडे यांच्या भेटीचा प्रसंग आपणास ठाऊक आहे.

१४०० वर्षांचे योगिराज चांगदेव हे प्रकांड पंडित आणि योगी असूनही त्यांच्या या गुणांना अहंकाराचे ग्रहण लागलेले होते, हे मुक्ताईने जाणले. तिने चांगदेवांना उपदेश केला. १४ वर्षांची मुक्ताई ही १४०० वर्षांच्या चांगदेवांची गुरू झाली. तिने चांगदेवांना बाळ समजून त्यांचा पाळणा लिहिलेला आहे.

आपल्यापेक्षा वयाने आणि ज्ञानाने मोठ्या असलेल्या योगिश्वरांचे पाळणे मुक्ताई आणि जनाई यांनी लिहावे, यातच त्यांच्या आईपणाचे रहस्य सामावलेले आहे. जीवनवृक्षाला अनेक फांद्या-डहाळ्या आहेत. परंतु मुक्ताबाई ने की निर्गुणाच्या डहाळीवर चांगदेवांचा पाळणा बांधते. त्यात चांगदेवांना निजविते. आईच्या अंगाई गाण्याच्या आवर्तनात बाळाच्याही हुंकारांचे आवर्तन मिसळते. दोन्ही नाद एकत्र येऊन एक वेगळीच अनुभूती येते. बाळाला निजविण्यासाठी आई टाळ्या वाजवते. इथे मुक्ताईची टाळी ही अनाहत नादाची आहे. त्यामुळे बाळ जागृती आणि निद्रा यांच्याही पलीकडे पोहोचले आहे. (पान ६ वर)

# भाजपाचे माधव पॅटर्न वर्तुळ झाले पूर्ण

## संघ स्वयंसेवक अण्णा डांगे नसल्याची उणीव होती




नोंद
विजयकुमार पिसे
भ्र. ८८८८८४७२५६



१९९५ मध्ये स्व.बाळासाहेब ठाकरे, प्रमोद महाजन आणि गोपीनाथ मुंडे या महान त्रिमूर्तींनी महाराष्ट्रात इतिहास घडवला. कॉंग्रेस व शरद पवार कॉंग्रेस यांची सत्ता उलथवून छत्रपती शिवरायांचा भगवा फडकवला. भाजपा/शिवसेना युतीचे शिवशाही सरकार स्थापन झाले. यामध्येही एक कडी होती अण्णासाहेब डांगे. जे भाजपाचे (माधव पॅटर्न) म्हणून प्रसिध्द आहे. युती सरकारचे पहिले ग्रामविकासमंत्री म्हणून त्यांनी काम पाहिले, टँकरमुक्त महराष्ट्र ही संकल्पना त्यांनी आणली. गेल्या काही वर्षांपासून ते भाजपापासून दूर होते. भाजपाच्या माधव पॅटर्नमध्ये ही उणीव होती. आता ती भरून निघाली आहे. संघ स्वयंसेवक अण्णा डांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत भाजपात प्रवेश केला आहे.

भाजपाचे तत्कालिन संघटनमंत्री वसंतराव भागवत यांनी महाराष्ट्रात कॉंग्रेस प्रस्थापितांचे दैन्य संपवण्यासाठी आणि भाजपाला ग्रामीण भागात प्रस्थापित करण्यासाठी माधव पॅटर्नचा प्रयोग केला. आणि तो यशस्वी झाला. बहुजन समाजाला नेतृत्वाची संधी या प्रयोगाने सफल ठरली. आजही भाजपात बहुजन समाजाचा प्रभाव टिकून आहे. माधव (मा.ध.व. अर्थात माळी, धनगर,वंजारी) पॅटर्नमध्ये नाशिकचे प्रा. ना. स. फरांदे, सांगलीचे अण्णा डांगे आणि बीडचे गोपीनाथ मुंडे या तीन प्रमुख नेत्यांचा समावेश होता.

या तीन नेत्यांच्या माध्यमातून ग्रामीण भागात भाजपा संघटनेचे जाळे विणले आणि फरांदे सर, डांगे अणि मुंडे यांना निर्णायक संधी मिळाली. आणि पुढे फरांदे विधान परिषदेचे अध्यक्ष झाले, अण्णा डांगे ग्रामविकास मंत्री आणि गोपीनाथजी मुंडे राज्याचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री. या तिघांनी संघटनेत, पक्षाच्या माध्यमातून ग्रामीण भागात आणि सत्ताधारी म्हणून राज्य कारभारात आपल्या कामाचा ठसा उमटवला. भाजपाचा बहुजन चेहरा मजबूत झाला. तसेच त्यानंतरच्या काळात भाजपाचा राजकीय आलेख चढता राहिला.

अण्णा डांगे सत्तेत येण्यापूर्वी महाराष्ट्र विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते (भाजपा) देखील होते. आज अण्णासाहेब डांगे नव्वदीपर्यंत पोहोचले आहेत. सांगली जिल्ह्यातील इस्लामपूर (नवीन नामकरण इश्वरपूर)चे अण्णा डांगे संघाच्या मुशीत वाढलेले. ग्रामीण भागात धनगर समाजाचे धुरिण म्हणून आपली प्रतिमा उभी करण्याची संधी भाजपाने दिली. तसेच त्यांनी आपले जीवनचरित्र संघ जीवनगाथा या पुस्तकातून साकारले असून संघ कामातील अनेक अनुभव मांडले आहेत.

सोलापूर दौऱ्यावर अण्णा डांगे यमगरवाडी (तुळजापूरजवळ) प्रकल्पस्थळी भेट देण्यासाठी आले होते. त्यांच्या सोबत जाण्याची मला संधी मिळाली. तेव्हा त्यांनी धोतराचा कासरा बांधला, डोक्यावर दप्तर ठेवले आणि पायी चालत प्रकल्पावर पोहोचले. त्या काळी यमगरवाडी प्रकल्प नुकताच सुरू झाला होता, तिथे जाण्यासाठी रस्ता देखील नव्हता. युती सरकारच्या काळात प्रारंभी मनोहर जोशी नंतर नारायण राणे यांच्या मंत्रिमंडळात मंत्री म्हणूनही काम केले आहे. भाजपात असते तर अण्णा डांगे आज केंद्रातून एका राज्याचे राज्यपाल म्हणून भूमिकेत दिसले असते.

दरम्यान अण्णा डांगे यांना पक्षसंघटनेत डावलले जात असल्याचा अनुभव येत राहिला, त्यामुळे यथावकाश २००२ मध्ये भाजपातून बाहेर पडले. २००६ मध्ये लोकराज्य पक्ष स्थापन केला. नंतर शरद पवारांसोबत जाण्याचा निर्णय घेतला. नंतरच्या काळात अण्णा डांगे पंढरपूर विठ्ठल रुक्मिणी मंदिरे देवस्थान समितीचे अध्यक्ष म्हणूनही कार्यरत होते. आज अण्णा नव्वदीच्या घरात पोहोचले असून आता उत्तरार्धात पुन्हा भाजपात येऊन वर्तुळ पूर्ण केले आहे. त्यांच्या भाजपा प्रवेशामुळे माधव पॅटर्नची उणीव देखील भरून निघणार आहे. आज भाजपात धनगर समाजाचे अनेक दिग्गज नेते आहेतच, पण जेव्हा वसंतराव भागवत यांनी ज्या भूमिकेतून संघटन वाढीसाठी जे योगदान दिले, त्यासाठी अण्णा डांगे यांची निवड फरांदे आणि मुंडे यांच्यासोबतीने केली होती, आज फरांदे आणि मुंडे हयात नाहीत, पण त्यांची पिढी कार्यरत आहे. त्यामुळे माधव पॅटर्नचे वर्तुळ पूर्ण होईल असे मानले जाते.

साडेतीन जिल्ह्यातील पक्ष अधिक कमजोर होणार...

शरद पवारांचा पक्ष साडेतीन जिल्ह्यातील असे नेहमी त्यांचे विरोधक म्हणतात. पुणे, सातारा, कोल्हापूर आणि अर्धेमुर्दे सांगली, सोलापूर. या जिल्ह्यांमधून पवारांची ताकद कमी होत आहे. कॉंग्रेसी, राष्ट्रवादीमधील अनेक प्रस्थापित घराणी महायुतीच्या वळचणीला आलेली आहेत.

सर्वात महत्वाचे सांगलीचेच जयंत पाटील (वाळवा) यांनीही नुकतीच प्रदेशाध्यक्षपदाची धुरा सोडली असून त्यामुळे अण्णा डांगे यांचीही जयंत पाटलांसाठीची असलेली नाळ तुटली आहे. त्यांच्याच पक्षातील प्रमुख नेते अजीतदादा गटात गेले आहेत. काही शिंदे सेनेत जात आहेत. त्यामुळे भविष्यात सांगली जिल्हा देखील श. प. मुक्त होईल असे दिसते. या साऱ्या पार्श्वभूमीवर माधव पॅटर्नचे घटक अण्णा डांगे यांनी अलीकडेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत केलेली घरवापसी भाजपला ताकद देणारी ठरेल. ('संघ जीवनगाथा'मधून अण्णांच्या चरित्राची मांडणी)

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य (भाग ५७)

# देखणा देहान्त तो...



थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

गुरुदेवांचे संपूर्ण जीवन म्हणजे कर्मयोगाचा अखंड वाहणारा निर्मळ झरा. हे निर्मल जल अखेरपर्यंत प्रवाहित होते. ते कुठे थांबले नाही. पाणी एका ठिकाणी साचून राहिले की त्याचे डबके तयार होते. असे पाणी मग वापरण्यायोग्य राहत नाही. साचलेल्या पाण्यात जीवजंतू तयार होतात. वाहते पाणी आरोग्यदायी असते. आपल्या आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत हा महामानव कार्यरत राहिला. सतत नवनवीन कल्पना, प्रयोग त्यांच्या मनात आकार घेत होते. नियतीने जणू चिरंतन प्रतिभाशक्तीचे वरदान त्यांना बहाल केले होते.

७ मे १८६१ रोजी त्यांचा जन्म आणि ७ ऑगस्ट १९४१ या दिवशी त्यांनी जगाचा निरोप घेतला. जन्म आणि मृत्यू दोन्ही सात तारखेला. जणू सप्तपदी! विवाहप्रसंगी सप्तपदीला केलेला निश्चय आयुष्यभर पाळायचा असतो, तसा त्यांनी आपल्या आयुष्याशी जणू एक अलिखित करार केला होता. 'अखेरच्या श्वासापर्यंत माझी साहित्याशी, माझ्या देशाशी, माझ्या शिक्षणविषयक विचारांशी आणि माझ्या नवनिर्मितीच्या मंगल, उदात्त कल्पनांशी माझी बांधिलकी कायमराहील. 'हाच जणू त्यांचा निर्धार होता आणि तो त्यांनी अखेरच्या क्षणापर्यंत कसोशीने पाळला. या दृष्टीने ते कर्मयोगी होते.

**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन। मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते सङ्गो स्त्वकर्मणि।।** तुला फक्त कर्म करण्याचा अधिकार आहे, पण त्याच्या फळावर तुझा अधिकार नाही. म्हणून तू कर्मफळाची इच्छा करू नकोस. हा कर्मयोगाचा महत्त्वपूर्ण संदेश त्यांनी निष्कामकर्म करून आचरणात आणला.

८० वर्षांचे दीर्घायुष्य त्यांना लाभले होते. वयाची पंच्याहत्तरी उलटली तरी त्यांच्या लेखनात खंड पडला नव्हता. तुकाराममहाराज म्हणतात तसा त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक दिवस म्हणजे 'नित्य नवा दिस जागृतीचा' होता. नजरेत लहान मुलाचे कुतूहल होते आणि अंतरात नवनवीन गोष्टी जाणून घेण्याची जिज्ञासा! नियतीने त्यांच्या पदरात जे दान टाकले ते त्यांनी आयुष्यभर इतरांना भरभरून वाटले. इतरांना सतत आनंद देत राहणारी त्यांची ओंजळ कधीच रीती झाली नाही.

आपल्या लेखनाच्या कारकिर्दीतील सुरुवातीच्या काळात लिहिलेली अनेक नाटके त्यांनी आपल्या आयुष्याच्या उत्तरार्धात पुन्हा सुधारून नव्याने लिहिली. असे करणारा साहित्यिक अभावानेच आढळेल. केवळ चार- पाच तासांची निद्रा घेऊन ते ताजेतवाने होत असत आणि त्यांच्या लेखणीला पुन्हा बहर येत असे. कधी कधी सलग १८/१८ तास देखील ते लेखन करीत असत. असे म्हणतात की त्यांनी केलेल्या या परिश्रमांमुळे त्यांच्या अखेरच्या दिवसात त्यांना मूर्च्छाही येत असे. पण थांबून राहणे जणू त्यांच्या स्वभावातच नव्हते.



त्यांच्या बहुमुखी प्रतिभेचे वर्णन करताना आपल्या वंगचित्रे या पुस्तकात पु. लं. देशपांडे म्हणतात, त्यांच्या प्रतिभेची उंची आणि व्याप्ती बंगाली भाषेशी परिचय झाल्याखेरीज लक्षात येत नाही. शिवाय त्यांचे ते भव्य आणि सुंदर दर्शन, गायन-नृत्य- नाटक यांच्याशी असलेले साहचर्य यामुळे या माणसाच्या आयुष्यात त्याला विपरीत परिस्थितीशी झगडावे लागले असेल, बंडे करावी लागली असती याची कल्पनाही पुष्कळांना येत नाही. परकीय आणि स्वकीय दोघांच्याही विरोधाला तोंड देत त्यांनी मार्ग काढला आहे.

आपल्या लहानपणापासून सुरू झालेली त्यांची शब्द आणि साहित्याची आराधना आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत अविरत सुरू होती. १९३७ ते १९४१ या आपल्या आयुष्यातील अखेरच्या वर्षांमध्ये सुद्धा त्यांची प्रतिभा चिरतरुण आणि नवनिर्मिती करणारी होती. या काळात देखील त्यांची दहा ते अकरा पुस्तके प्रसिद्ध झाली. १९१२ ते १९३४ पर्यंत त्यांनी आपल्या



कार्याच्या प्रसारासाठी अविरत प्रवास केला १९३४ मध्ये दिलेली श्रीलंकेला भेट हा त्यांचा शेवटचा भारताबाहेरील प्रवास होता. प्रवासाची आवड असली तरी प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यानंतर ते प्रवासाला जाऊ शकले नाहीत.

१९३८ नंतर त्यांना विश्रांती घ्यावीशी वाटू लागली. त्यासाठी त्यांनी एक निसर्गरम्य ठिकाण निवडले. पश्चिमबंगालमध्ये कालिपांग हे एक सुंदर हिल स्टेशन आहे. येथून जवळच मंगपू या छोट्या गावात मैत्रेयी सेन या या नावाची गुरुदेवांच्या मित्राची मुलगी राहत होती. मैत्रेयी ही एक विदुषी आणि उत्तमलेखिका होती. गुरुदेवांच्या साहित्याचा तिचा अभ्यास होता. तिच्याकडेच ते राहिले. तिने त्यांची सर्वतोपरी काळजी घेतली. त्यांच्या सहवासात आल्यामुळे त्यांच्या सहवासातील त्यांच्या सुंदर आठवणींचे पुस्तक 'टागोर बाय फायर साईड' हे तिने लिहिले. हे अतिशय सुंदर पुस्तक आहे. या पुस्तकाबद्दल बोलताना कविवर्य बा भ बोरकर असे म्हणतात रवींद्रनाथांबद्दल अक्षरशः असंख्य पुस्तके आहेत. पण मला रवींद्रनाथांवरील फक्त एक आणि एकच पुस्तक वाचायचे आहे असे मला कोणी म्हटले तर मी निशंकपणे या पुस्तकाची शिफारस करीन. गुरुदेवांच्या शेवटच्या दिवसांबद्दल बोलायचे झाल्यास, ते त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने खूप कठीण होते. त्यांना वारंवार वेदना होत आणि प्रकृती खालावत गेली. १९४० नंतर तर त्यांची प्रकृती अधिकच बिघडली. १९४१ मध्ये त्यांच्यावर एक शस्त्रक्रिया झाली. परंतु, त्यातूनही फारसा आराममिळाला नाही. ७ ऑगस्ट १९४१ रोजी, वयाच्या ८०व्या वर्षी, कोलकाता येथील जोरासांको वाड्यातील त्यांच्या घरात त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गुरुदेवांनी आपल्या आयुष्याच्या अखेरच्या काळात केलेले लेखन त्यांच्या आयुष्याचा गाभा सांगणारे होते. त्यांनी त्यांच्या शेवटच्या कवितांमध्ये मृत्यू आणि मानवी अस्तित्व यावर चिंतन केले. त्यांच्या शेवटच्या काळात त्यांनी काही ओळी लिहिल्या होत्या, त्या अशा आहेत... **तिमिरबिंदू पडिला लोचनी, दिनकर रे! न देखिल तुहू मज.** आमार जन्मसंपिल तिमिर माजी। (तिमिरबिंदू म्हणजे माझ्या डोळ्यासमोर आता अंधार दाटून आला आहे. (पान ६ वर)

# ग्रहसंकेत

**(रविवार, ३ ऑगस्ट ते शनिवार, ९ ऑगस्ट २०२५)**

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ३ ऑगस्ट-** फ्रेंडशिप डे, आदित्य पूजन, सदाशिव महाराज पुण्यतिथी अर्जुनवाड ता. शिरोळ, ब्रह्मेंद्रस्वामी पुण्यतिथी धावडशी (जि.सातारा), सद्गुरु सिद्धरामेश्वर महाराज जयंती पाथरी (सोला-पूर) ✻ **सोमवार, ४ ऑगस्ट -** श्रावणी सोमवार, शिवपूजन, शिवामूठ तीळ कलश दशमी, गिरलिंग यात्रा कुकटोळी ता. कवठेमहांकाळ , शंभू महादेव यात्रा शामगाव (ता. कराड), गुरुलिंग यात्रा कुकटोळी, श्री पद्मनाभतीर्थ पुण्यतिथी गुरुमठ बाड कारवार ✻ **मंगळवार, ५ ऑगस्ट-** पुत्रदा एकादशी, ओंकारनाथ महाराज पुण्यतिथी उत्सव प्रारंभ सावर्डे (ता. राधानगरी), मंगलागौरी पूजन ✻ **बुधवार, ६ ऑगस्ट-** प्रदोष, विष्णू पवित्रारोपण, बुध पूजन शंकरबाबा पुण्यतिथी कोल्हापूर, शाकदान, दधिव्रत ✻ **गुरुवार, ७ ऑगस्ट-** बृहस्पती पूजन, भगवान श्री जिव्हेश्वर जयंती, संत नरहरी सोनार जयंती, शिवयोगीस्वामी पुण्यतिथी अथणी, कानिफनाथ महाराज पालखी प्रस्थान मोशी (ता. हवेली ), जिव्हाजी महाराज पुण्यतिथी निफाणी ✻ **शुक्रवार, ८ ऑगस्ट-** नारळी पौर्णिमा, जरा जिवंतिका पूजन, कुलधर्म, श्रवणाकर्म, वरदलक्ष्मी व्रत, बंजारा तीज उत्सव प्रारंभबाबा महाराज आर्वीकर जयंती माचणूर (ता. मंगळवेढा) ✻ **शनिवार, ९ ऑगस्ट-** रक्षाबंधन, पौर्णिमा दु.१.२४ पर्यंत संतनाथ यात्रा वैराग (ता. बार्शी) हयग्रीवोत्पत्ती, शामकाग्रयण, जागतिक आदिवासी दिन, ऑगस्ट क्रांतिदिन, अगस्ती दर्शन, अन्वाधान, अश्वस्त मारुती पूजन

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** ३, ७ (१४ नंतर), ८ (१४ पर्यंत), ९ ऑगस्ट ✻ **डोहाळ जेवण-** ३, ६ (१३ पर्यंत ) ऑगस्ट ✻ **बारसे-** ३ (१० नंतर) ऑगस्ट ✻ **गृहप्रवेश-** ३ (१० नंतर), ६, (१३ पर्यंत), ९ ऑगस्ट

### मेष :- अपेक्षित संधी लाभतील

अहंकार भ्रम टाळला तर माणुसकी लोकप्रिय व्हायला वेळ लागत नाही. राशी स्वामी मंगळाचा व्ययातील शनीशी प्रतियोग होत आहे. शारीरिक तक्रारींची दखल घ्यावी. उपजत कलागुणांचा विकास होत जाईल. सरकारी कामे मनासारखी होतील. भावंडाबाबत शुभ घटना घडतील. अपेक्षित संधी लाभतील. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. शुभ ता. ६, ७

### वृषभः- मनासारख्या घटना

दुसऱ्यावर हसणे फार सोपे असते, पण दुसऱ्यासाठी रडणे फार कठीण असते. धनस्थ गुरु शुक्रामुळे आर्थिक स्थिती समाधानकारक राहील. उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या विचाराने रहावे. अपेक्षित प्रगती साधता येईल. ठाम विचाराने रहावे धरसोडपणा टाळावा. गृहनिर्माण, विधी अशा क्षेत्रात विशेष अनुकूलता राहील. मनासारख्या घटना. शुभ ता. ६, ७

### मिथुनः- प्रवास टाळावेत

कोणत्याही नात्याला बंधनात ठेवू नका. खरे नाते सोडून कुठेही जाणार नाही. सुखस्त मंगळाचा कर्मस्थ शनीशी प्रतियोग होत आहे. त्यामुळे कौटुंबिक जीवनात, कार्यक्षेत्रात विचाराने सामाजिकतेने रहावे. सरकारी कामे होतील. प्रतिकूलतेतही सुख लाभेल. कलेत प्रगती होईल. दूरचे प्रवास टाळावेत. दगदग संभावते. चिकाटीने रहावे. प्रगती होईल. शुभ ता.६, ७

### कर्कः- अपेक्षित संधी लाभतील

भेट होत नसली तरी चालेल, पण स्नेहमय गोड संवाद कायम असला पाहिजे. राशीतील रवी बुधामुळे आत्मविश्वास वाढविणाऱ्या घटना घडतील. मंगळ शनि प्रतियोग विलंबाने भागोदयकारक घटना घडतील. प्रकृतीच्या तक्रारी कमी होतील. अपेक्षित संधी लाभतील. धार्मिक, सामाजिक कार्य घडतील. अनावश्यक खर्च टाळावेत. अडचणी कमी होतील. शुभ ता. ७

### सिंहः- चिंता करू नका

सवडीने नव्हे आवडीने बोलणारा माणूस फार खास असतो. धनस्थ मंगळाचा अष्टमातील शनीशी प्रतियोग होत आहे. त्यामुळे प्रकृतीच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करू नका. औषध पाण्यासाठी खर्च करावा लागेल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. फार चिंता करू नका. अपेक्षित संधी लाभतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अनुकूलता वाढेल. शुभ ता.३, ६

### कन्याः- प्रशासन सेवेत अनुकूलता

खरे बोलल्याने नेहमी मनःस्ताप होतो. राशीतील मंगळाचा सप्तमातील शनीशी प्रतियोग होत आहे. त्यामुळे कोणतेही निर्णय घाईने घेऊ नयेत. कर्मस्थ गुरु शुक्रामुळे कार्यक्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. प्रशासन सेवेत अनुकूलता राहील. अपेक्षित संधी लाभणार आहेत. शुभ ता. ६

### तुलाः- चिंता नको

सत्कर्म केल्याने मन नेहमी साप राहते. व्ययातील मंगळाशी प्रतियोग करीत आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीत विचाराने रहावे. नोकरीत अधिकार वाढतील. उपजत कलागुणांचा विकास होईल. नव्या संधी विचाराने स्वीकाराव्यात. अडचणीची चिंता नको. प्रतिकूलतेतून मार्ग निघत जाईल. संसर्गजन्य आजारापासून सावध रहावे. शुभ ता. ३, ७

### वृश्चिकः- नव्या संधी लाभतील

आयुष्य किती उरले, याची काळजी करण्यापेक्षा जगायला मिळाले याचा आनंद मानावा. अष्टमात गुरु शुक्र असल्याने आर्थिक कामे मनासारखी होतील. नव्या योजना मार्गी लावता येतील. नव्या संधी लाभतील. लाभ उठवावा. अडचणीतून मार्ग निघत जाईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. महत्त्वाची कामे लवकर हाता वेगळी करावीत. शुभ ता. ३, ६

### धनुः- समस्या दूर होत जातील

आपण निस्वार्थपणे केलेले कुठलेही सत्कार्य कधीच वाया जात नाही. सुखस्त शनीचा कर्मस्थ मंगळाशी प्रतियोग होत आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात विचाराने रहावे. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. दैनंदिन कामात अधिक लक्ष घालावे. समस्या दूर होत जातील. शुभ ता. ३, ७

### मकरः- कामे मार्गी लागतील

मन हलकं झालं की, आयुष्य थोडं जास्त सुंदर वाटतं. राशी समोरच रवी बुध आ-हेत, त्यामुळे आत्मविश्वासाने कोणत्याही परिस्थितीला सामोरे जाऊ शकाल. महत्त्वाची कामे मार्गी लागतील. नव्या विचारांना चालना मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. कलेत प्रगती होईल. अनुकूलता वाढेल. नव्या कामांना गती मिळेल. शुभ ता. ३

### कुंभः- कार्यसिद्धी होत जाईल

आयुष्य जुन्या डायरीसारखे असते. प्रत्येक पानावर वेगळी गोष्ट, वेगळी भावना असते. कधी अपयश, कधी विजय. धनस्थ शनीचा अष्टमातील मंगळाशी प्रतियोग होत आहे. आर्थिक बाबतीत विचाराने रहावे. विलंबाने पण कार्यसिद्धी होत जाईल. अनुकूलता वाढेल. गुंतवणूक विचाराने करावी. संतती संबंधातून शुभ घटना घडतील. शुभ ता. ७

### मीनः- चिंता नको

ज्यांच्या आयुष्यात निंदा नाही, दुःख नाही, याचना नाही त्यांनी रस्ता बदलावा कारण हा रस्ता चुकीचा आहे. राशीतील शनीचा सप्तमातील मंगळाशी प्रतियोग होत आहे. समस्या वाटल्या तरी चिंता नको. मार्ग निघत जाईल. सुखस्त गुरु शुक्रामुळे स्थ-ावर बाबतीत अनुकूलता वाढेल. नवे विचार विचाराने स्वीकारावेत. सरकारी कामे होतील. शुभ ता. ३, ७

!! शुभ भवतु !!

पान ४ वरून

## अंधश्रध्दा

''कोरोना जवळपास सगळ्यांनाच झाला. काहींचा लक्ष्यात आला, काहींचा नाही. म्हणून सगळेच गेलेत का? हे सगळं नशिबावर असतं. जे घडायचं ते घडतंच. असं वागून कुणी कुणाचं नशीब बदलवू शकत नाही.'' सासूबाईंना दया आली. वृषाली त्यांच्या गळ्यात पडून हुंदके देऊन रडली. दुसऱ्या दिवशी तृप्ती शाळेसाठी तयार झाली तरी आई तयार नव्हती. ऑटो पण आला नव्हता. वृषालीने तिचा टिफीन भरला. तिला दिला आणि त्याच्याबरोबर सायकलची चाबी तिच्या हातावर ठेवली. तृप्तीला खूप आनंद झाला. ''येते आई...' म्हणून ती धाव्वतच खाली गेली. दप्तर कॅरिअरला लावलं. गॅलरीत उभ्या असलेल्या आज्जी-आजोबा आणि आईलाही टाटा केला आणि हसत भुरकन् निघून गेली. सासू-सासऱ्यांच्या डोळ्यात पाणी आलं. वृषालीने हसून त्यांच्याकडे पाहिलं. सासऱ्यांनी तिच्या खांद्यावर हात ठेवला आणि आत आले.

पान ५ वरून

## 'शुद्ध सुमनांची शेज।

मुक्ताईच्या या पाळण्यात, अध्यात्मातील रहस्य शब्दाशब्दातून व्यक्त होते.

**'निर्गुणाचे डहाळी पाळणा लाविला।**
**तेथे सुत पहुडला मुक्ताईचा।**
**निज निज बाळा करी न पै आळी।**
**अनुहात टाळी वाजविते।**
**तेथे निद्रा ना जागृती भोगी पै उन्मनी।**
**लक्ष तो भेदूनि निजला तो।**
**निभ्रांत पाळी पाळणा विणवुनी।**
**मन हे बांधोनि पवनदोरा।**

पाळण्याच्या रूपकातून मुक्ताईचा अधिकार स्पष्टपणे दिसून येतो. साक्षात्काराची ओवी साडेतीन चरणाची लिहावी की, चार चरणांची असे प्रत्यक्ष ज्ञानदेव तिला विचारतात. ज्ञानदेवांनी संजीवन समाधी घेतल्यानंतर प्रत्यक्ष पांडुरंगाने आणि निवृत्तीनाथांनी समाधीवर शिळा ठेवली हाती. मुक्ताईचा अधिकार एवढा मोठा होता की, समाधीनंतरच्या १४ व्या दिवशी त्या शिळेवर चंदनाचा लेप देण्याचा मान मुक्ताईला मिळाला होता. **'आईच्या हातून चंदनाचा लेप।** आईचा हात आधीच आशीर्वादांनी युक्त, त्यात त्याला चंदनाचा गंध.' या आईच्या मायेचा आणि चंदनाच्या शीतलतेचा अनुभव ज्ञानदेवांना समाधी अवस्थेतही नक्कीच आला असेल. सर्व संत कवयित्री मग त्यात वेणास्वामी, सोयराबाई, कान्होपात्रा, बहिणाई, महदंबा या सगळ्या समाजाची आई म्हणूनच जगल्या. त्याच्या मनीमानसी असलेले हे आईपण आणि वात्सल्य आपल्याही मनात आणि व्यवहारात शतांशाने का होईना उतरले पाहिजे, जागृत झाले पाहिजे.

दुर्ग जिज्ञासा

प्राची पालकर

# साल्हेर

श्री परशुराम यांची तपोभूमी म्हणून प्रसिद्ध असलेला साल्हेर किल्ला नाशिक जिल्ह्यात, सह्याद्रीतील डोलबारी डोंगररांगेत विराजमान आहे. किल्ल्याची उंची ५४४१ फुट आहे, महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखराचा मान कळसूबाईचा व गडकिल्ल्यात सर्वात उंच किल्ल्याचा मान साल्हेरचा आहे. नुकताच जागतिक वारसा स्थळात ज्या १२ किल्ल्यांचा समावेश झाला, त्यात साल्हेर समाविष्ट आहे. १४ व्या शतकापासून ते १७ व्या शतकाच्या मध्यापर्यंत येथे बागुल घराणे, दिल्लीचे सुलतान, मोगल यांचे राज्य होते. सुरत लुटीच्या वेळी शिवाजी महाराज साल्हेर मार्गानेच गेले आणि बागलाण मोहिमेत किल्ला स्वराज्यात सामील झाला.

किल्ल्यावर जायचे असल्यास नाशिक हे जवळचे रेल्वेस्थानक आहे. गडाचा घेरा सुमारे ११ कि. मी. चा आहे व ६०० हेक्टर भूमी गडाने व्यापलेली आहे. गडाच्या पायथ्याशी जाण्यासाठी दोन प्रचलित मार्ग आहेत. पहिला वाघांबे मार्गे व दुसरा साल्हेरवाडी मार्गे. तिसरा मार्ग माळदर मार्गे जातो, पण तो फारसा प्रचलित नाही. प्रथम नाशिक-सटाणा रस्त्यावरील ताहराबाद गाठावे. तेथून मुल्हेरमार्गे वाघांबेपर्यंत जावे. वाघांबे गावातून साल्हेर-सालोटा यांच्या मधील खिंडीतून गडावर जायला वाट आहे. साधारण चार तासात गडमाथा गाठता येतो. या वाटेने गडावर जाताना चार दरवाजे पार करावे लागतात. चौथ्या दरवाजाच्या जवळ कड्यात गुहा खोदलेल्या आढळतात आणि दरवाजाच्या कमानीवर शिलालेख कोरला आहे.

गडावर जाण्याचा दुसरा मार्ग साल्हेरवाडी मार्गे आहे. वाट मळलेली आहे त्यामुळे चुकण्याची शक्यता कमी आहे. येथूनही साधारण चार तासात गडमाथा गाठता येतो. गावातून चालायला सुरुवात केली की, आपण एका अजस्त्र कातळाजवळ पोहोचतो. याच कातळात कोरलेल्या पायऱ्या आपल्याला पहिल्या दरवाजापर्यंत घेऊन जातात. तेथून थोडं पुढे दुसरा दरवाजा असून त्याच्या बाजूला पाण्याचे टाके आहेत. त्यानंतर तिसऱ्या दरवाजाच्या उजव्या खांबावर शिलालेख आहे. थोडं पुढे जाऊन तटालगतची वाट सोडावी व वर चढणारी वाट पकडावी, तिथे खडकात कोरलेल्या पायऱ्या आहेत. येथून आत जाताना तीन दरवाजे आहेत. तिसऱ्या दरवाजातून आत गेल्यावर लांबलचक पसरलेले गादी पठार दृष्टीस पडते. येथेही दोन टाके आहेत. उजवीकडे बालेकिल्ल्याची टेकडी दिसते. गडाच्या सर्वोच्च शिखरावर असलेले परशुराम मंदिर येथून नजरेच्या टप्यात येते. वाघांबे मार्गे गडावर आल्यास उजवीकडे व साल्हेरवाडीतून गडावर आल्यास डावीकडे भग्न मंदिराचे अवशेष आढळतात. पुढे गंगासागर तलाव आहे. या तलावाच्या मध्यभागी एक स्तंभ आहे. तलावाच्या बाजूला रेणुका मातेचे व गणेशाचे मंदिर आहे. मंदिराच्या पुढे गेल्यावर एक यज्ञवेदी आहे. मंदिरापासून वर चढत जाणारी वाट तीन गुहांपाशी जाते. गुहांच्या समोर मारुतीचे मंदिर आहे. गडावर राहायचे असल्यास गुहेत मुक्काम करता येतो. गुहेच्या बाजूने वर चढणारी वाट गडाच्या सर्वात उंच शिखरावर घेऊन जाते. या शिखरावर श्री परशुरामांचे मंदिर आहे. मंदिरात श्री परशुरामांची मूर्ती व पादुका आहेत. येथून संपूर्ण परिसराचे विहंगम दृश्य नजरेस पडते. पूर्वेकडे मांगीतुंगी, तांबोळ्या, न्हावीगड, हनुमान टेकडी, मुल्हेरगड, मोरागड, हरगड, सालोटा नजरेस पडतात. हरणबारीच्या धरणाच्या विस्तीर्ण जलप्रदेशाचे दृश्य साल्हेर किल्ल्यावरून मनोहारी दिसते.

साल्हेर किल्ला श्री परशुरामांची तपोभूमी म्हणून विख्यात आहे. परशुरामांनी जिंकलेल्या भूमीचे दान केले व स्वतःसाठी भूमी मिळविण्यासाठी सागराला मागे ढकलायला येथूनच बाण सोडला अशी आख्यायिका आहे. साल्हेरगडाला श्री परशुराम यांच्या वास्तव्यामुळे पौराणिक महत्त्व प्राप्त झाले आहे. शिवकालीन इतिहासात, स्वराज्य स्थापनेच्या कार्यात या किल्ल्यांना अनन्यसाधारण महत्त्व होते. शिवरायांनी १६७१ मध्ये बागलाण मोहीम सुरू केली. साल्हेरला मराठ्यांचा वेढा पडला. पहिल्याच दिवशी गडाचा मोगल किल्लेदार मारला गेला. त्यानंतर त्याच्या मेहुण्याशी वाटाघाटी करून महाराजांनी ५ जानेवारी १६७१ मध्ये साल्हेर स्वराज्यात सामील करून घेतला. त्यावेळी दाऊदखान गड वाचविण्यासाठी आला, पण गड काबीज झाला होता, त्याला माघारी जावे लागले. औरंगजेबाने गुजरातेत असलेल्या बहादूरखानास दक्षिणेत जाण्याचा हुकूम केला. बऱ्हाणपूरला महाबतखान होता. त्यालाही दक्षिणेस बोलावून घेतले. त्यावेळी मोगलांनी स्वराज्यात सामील असलेले अहिवंतगड, मार्कंडा, जवळा, अंचलगिरी हे किल्ले जिंकले. पुढे पावसाळ्यात मोहिमा शिथिल झाल्या. बहादूरखान व दिलेरखान सुरतेपाशी तळ देऊन होते. ऑक्टोबर १६७१ ला ते दोघे बागलाणात घुसले. इखलासखान व बहोलोलखान यांनी प्रचंड फौज व युद्ध साहित्य घेऊन साल्हेरला वेढा घातला. एरढा प्रचंड वेढा आजवर कधीच पडला नव्हता. शिवाजी महाराज त्यावेळी खेड शिवापुरास होते. सरनौबत प्रतापराव यांना राजांनी निरोप धाडला की, तुम्ही एका बाजूने साल्हेरला या व दुसऱ्या बाजूने कोकणातून मोरोपंत पेशव्यांना बोलावून घेतले. मोगलांची फौज मोठी होती, त्यावेळी प्रतापराव व मोरोपंतांची फौजही ४० हजारांच्या आसपास असावी. दोघेही दोहो बाजूंनी मोगलांच्या फौजेवर तुटून पडले. मोठे युद्ध झाले. सभासद बखरीत या युद्धाचा उल्लेख आढळतो. त्यात लिहिले आहे की, हे युद्ध चार प्रहर चालले. मोगल, पठाण, राजपूत हे आपल्या तोफा, घोडे, उंट, हत्तीसह सामील झाले. या घनघोर युद्धात प्रचंड जीवित हानी झाली, पण शेवटी विजय शिवरायांचा झाला.

साल्हेरच्या युद्धात मावळ्यांनी पराक्रमाची शर्थ करून विजयश्री खेचून आणली. सहा हजार घोडे व उंट, सव्वाशे हत्ती, खजिना, जडजवाहीर, कापड अशी अफाट मालमत्ता मराठ्यांच्या ताब्यात आली. याच युद्धात



सूर्यराव काकडे यांनी प्रचंड पराक्रम गाजवला. मात्र शेवटी ते वीरगतीस प्राप्त झाले. सूर्यराव म्हणजे महान योद्धा, स्वराज्याने अनमोल हिरा या युद्धात गमावला. सूर्यराव काकडे म्हणजे महाराजांच्या बालपणीचे मित्र, ते गेल्यामुळे महाराजांचे मोठे नुकसान झाले. या युद्धानंतर सर्वत्र मराठ्यांच्या युद्धकौशल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली. दिल्लीची पातशाही हादरली, राजांचा दरारा अधिकच वाढला. केवळ दख्खनमध्ये नव्हे, तर संपूर्ण हिंदुस्थानात मराठेशाहीचा दरारा व प्रतिष्ठा वाढली. साल्हेर समोरील मुल्हेर किल्लाही स्वराज्यात सामील झाला. साल्हेरच्या विजयाने खुल्या मैदानातही आपण मोगलांच्या प्रचंड फौजांना पराभूत करू शकतो, असा आत्मविश्वास मराठ्यांच्या मनात निर्माण झाला. बादशाही नेस्तनाबूत करण्याची ताकद मराठी रक्तात होतीच; ही लढाई सत्य व असत्याची होती आणि न्यायाचे पारडे हळूहळू जड होऊ लागले.

सालोटा साल्हेर पाहून झाला की, सालोट्याच्या दिशेने निघावे. थोडं खाली उतरून साल्हेर व सालोट्याच्या मधल्या खिंडीत आपण पोहोचतो. पठारावर पडक्या वाड्याचे व देवळाचे अवशेष दिसतात. एका दगडावर शंकराची पिंड, पादुका, मारुतीचे खोदीव चित्र दिसतं. जवळील कड्यात पाण्याची दोन टाकी आहेत. येथून सावधपणे चालत पायऱ्या गाठायच्या. पायऱ्या जरा अरुंद व कठीण आहेत. त्या पार करून पुढे पहिला दरवाजा लागतो. येथे बऱ्याच गुहा व पाण्याची दोन टाकी आहेत.


सालोट्याच्या गडमाथ्यावर हनुमान मंदिराशिवाय दुसरे काही विशेष नाही. गड फिरून झाला की, परत खिंडीत यावे. येथून वाघांबे गावात उतरायला प्रशस्त वाट आहे. उतरताना दोन पावलांचे ठसे आढळतात. हे पावलांचे ठसे श्री परशुरामांचे आहेत असे म्हणतात. पूर्वी लोकांचे दुर्गम गडकिल्ल्यावर वास्तव्य होते. कारण सुरक्षेच्या दृष्टीने किल्ले अत्यंत उपयोगी होते. स्वराज्य स्थापनेचे अवघड कार्य गडकिल्ल्याच्या आधाराने पूर्णत्वास गेले. म्हणूनच रामचंद्रपंत अमात्य यांनी आज्ञापत्रात लिहिले आहे. 'संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग!'

गडकोट हेच राज्य, गडकोट हेच राज्याचे मूळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे प्राणसंरक्षण! सह्याद्रीतील गडकिल्ले हे आपले तीर्थक्षेत्र आहेत. त्यांचे संरक्षण, संवर्धन करणे आपले आद्य कर्तव्य आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दृढनिश्चयाला सह्याद्रीच्या डोंगररांगा, गडकोट आणि प्रामाणिक सवंगड्यांची साथ मिळाली म्हणून स्वराज्य साकार झाले. राष्ट्रकार्यासाठी तन, मन, धन समर्पित करणाऱ्या **सर्व शूरवीरांना शतशः प्रणाम!**

पान ५ वरून

## देखणा देहान्त तो..

हे दिनकरा, (सूर्यदेवा) आता तूही मला पाहू शकत नाहीस. म्हणजेच माझ्या नेत्रांना तुझा प्रकाश दिसू शकत नाही. आता या तिमिरातच माझा अंत व्हायचा) या ओळी त्यांच्या मनातील एकाकीपणा स्पष्ट करतात. त्यातून त्यांचा अंतिमसत्याचा स्वीकार दिसून येतो.



पु ल देशपांडे आपल्या 'वंगचित्रे' या पुस्तकात लोकमान्य टिळक आणि गुरुदेवांबद्दल बोलताना म्हणतात, या राजकारणाची जबाबदारी घेतली नसती तर मी गणिताच्या अभ्यासात रंगलो असतो असे म्हणणारे टिळक आणि मी अनेक गोष्टीत रस घेतो, अनेक कार्यात भाग घ्यावा ला-गतो पण मी खरा म्हणजे फक्त कवी असे म्हणणारे टागोर, या दोघांनाही जीवनातले श्रेयस आणि श्रेयस कळले होते आणि त्याचा त्यांनी काय सुंदर तोल साधला! गुरुदेवांची कविता आणि त्यांचे जीवन एकरूप झाले होते. देण्याचे अपार सामर्थ्य असलेली त्यांची कविता होती. परमेश्वराचे आपल्याशी असलेले नाते त्यांना उमजले होते आपली भूमिका त्यांना कळली होती आणि तशाच पद्धतीने ते जीवन जगले होते. कुणीतरी त्यांना एकदा विचारलं, मृत्यू तुमचं दार ठोठावेल तेव्हा त्याला काय द्याल?

गुरुदेवांनी त्याला फार सुंदर उत्तर दिले ते म्हणाले माझ्या आयुष्याने भरलेला परिपूर्ण घट त्याच्या समोर ठेवीन. त्या याचकाला मी रिक्त हस्ताने कधीच पाठवणार नाही. हेमंतातील धूसर पहाट, वसंताच्या शांत रात्री, माझ्या गजबजलेल्या जीवनातले सोनेरी दिवस, लाभलेले सारे यश, साऱ्या जीवनातील मधू त्याच्यासमोर ठेवीन. आयुष्याच्या संध्याकाळी येणार्या त्या याचकाला रिक्त हस्ताने कधीच पाठवणार नाही. असे वाटते की तो कोणीतरी याचक म्हणजे आपणच आहोत आणि या सगळ्या गोष्टी गुरुदेव आपल्यासाठीच मागे ठेवून गेले आहेत. आपल्या एका कवितेत ते म्हणाले होते. जाबार आगे एई कथाटी बोलते चायि जा देखेछी जा पेयेछी तार आर तुलना नाई. ...जाण्यापूर्वी एकच गोष्ट सांगून जातो इथे जे मी पाहिले, जे मला लाभले त्याची तुलना नाही.

कविवर्य बा. भ. बोरकर यांच्या 'देखणे ते चेहरे' या कवितेतील ओळी आठवतात.

**देखणी ती जीवने, जी तृप्तीची तीर्थोदके**
**चांदणे ज्यातून फाके, शुभ्र पार्यासारखे**
**देखणा देहान्त तो, जो सागरी सूर्यास्तसा**
**अग्निचा पेरुनि जातो, रात्रगर्भी वारसा.**

गुरुदेव शरीराने जरी आज आपल्यात नसले तरी त्यांचे कार्य आणि साहित्य यांच्या माध्यमातून ते चिरंजीव आहेत आणि राहतील. त्यांचे आपल्यावरील हे ऋण कधीही फिटणारे नाही. मात्र, या हातानी जे घेतले, ते जसे जमेल तसे परतही करायला हवे. आदरणीय गुरुदेवांना मनोमन प्रणाम! (समाप्त)

## तुळशी वृंदावन


माझ्या घरी अंगणी तुळशी वृंदावनी
कशाला मी जाऊ कुंजवनी ।।
हालली तुळस, डोलल्या मंजुळा
त्याचा हार घालू घननिळा ।।
पाणी घालू भक्तीने, पूजा करू प्रेमाने
अखंडही वास हरींचा त्यात ।।
पारड्यात बसले श्री भगवान
रुक्मिणीने दिधले तुळशीची पान ।।
माझ्या घरी अंगणी तुळशी वृंदावनी
कशाला मी जाऊ कुंजवनी ।।
दिले जिने प्रेम आणि
दिले आशीर्वचन
तिच्या पायी माझी
आर्त विनवणी
माझ्या घरी अंगणी तुळशी वृंदावनी
कशाला मी जाऊ कुंजवनी ।।
हळदीचे बोट कुंकवाचे लेपन
जल दिले प्रेमाचे सौभाग्याचा नवस
घरदार व्हावे सुखी
आनंद नांदू दे प्रतिदिनी
माझ्या घरी अंगणी तुळशी वृंदावनी
कशाला मी जाऊ कुंजवनी ।।



सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# देहभानाचे अभिप्राय

## सकारात्मकतेचे तत्वज्ञान २७८



वृक्षाप्रमाणे मानवाची वाढही दोन प्रकारांनी, दोन दिशांना होत असते. जमिनीवरचे दृश्य चिरपरिचित असते- फांद्या, पाने, विस्तार, खोड! पण ही कहाणी निम्मीच असते. बाह्यांगी असल्याने पटकन नजरेस पडते. पण अंतर्गत आवर्तने सहजी दिसत नाहीत कारण ते दडलेलं असतं- झाडाची मुळं खोलवर प्रवास करीत असतात. जितकी खोल जातील तितकी ती बळकट आणि टिकाऊ होत जातात. सगळा पसारा आवरून ठेवतात.

कामात आणि व्यक्तिगत जीवनात बाह्य प्रगतीवर एकाग्र होणं सोपं असतं- जास्त विजय, जास्त दृश्यात्मकता आणि जास्त आवाका! पण अंतर्गत चाललेल्या घडामोडींशिवाय हे काहीही टिकत नाही. तुमची नीतिमूल्ये, तुमची पाळंमुळं, सुस्पष्टता, तुमची शिस्त यामुळेच खरंतर खरी वाढ होत असते. त्यामुळे वरती आणि खालती, दोन्हीकडे मशागत करावी लागते.

मानवी देहाला आपल्याशी बोलण्याची एक शांत सवय असते- फार मोठे सत्य उलगडण्यासारखे नाही पण मृदू, अनपेक्षित क्षणांमधून ते संवाद साधायचा सतत प्रयत्न करीत असते. जाता जाता उच्चारलेले एखादे वाक्य, समर्पक वेळी गाण्याची एक लकेर, जात्या वाटसरूच्या चेहेऱ्यावरील एखादे मंद स्मित- दिसायला (दिसलेच तर) हे अगदी सामान्य असले तरीही त्यात असामान्य अर्थ भरलेला असतो.

हे अभिप्राय येतात- विश्वाच्या कुजबुजीतून: कोपराने हळूच ढोसत, जखमांवर खपली धरत किंवा माहीतही नसलेल्या दिशेने. त्यावेळी आतमध्ये काहीतरी ढवळले जाते- सुस्पष्टता, जाण, हळुवार मार्गदर्शन.

याला योगायोग म्हणा, सुदैवाने लागलेला शोध म्हणा, दैवी क्षण म्हणा- सत्य एवढेच असते, शहाणीव शांत असते, आक्रोश करीत नाही, लक्ष वेधून घेत नाही. फक्त खुल्या दिलाने या सूक्ष्म संदेशांचे स्वागत करता आले पाहिजे. हे सगळं दैनंदिन जीवनातील काव्य असते. अनिश्चिततेने वेढलेले असतानाही आयुष्य काही ना काही दाखवायचा प्रयत्न करीत असते- त्यातून एकच खूणगाठ उजळून निघते, छोटासा काजवाही आपली वाट उजळून टाकण्यास समर्थ असतो.

आपली पारंपरिक उपचार पद्धती, जी शतकानुशतके प्रभावी ठरलीय, देहाकडून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे व्याधींवर उपचार करीत आली आहे. अजूनही वैद्य फक्त रुग्णाच्या हाताच्या नाडीवर बोट ठेवून लक्षणांचा अभ्यास करून उपाययोजना करतात. रुग्णाची चाल बघून शरीरातील व्याधींचे अध्ययन करीत असतात. डोळ्यांचा रंग, मूत्राचा रंग, शौचाचा रंग बघून उपचार सुचवित असतात. अशा इशाऱ्यांच्या, अशा खुणांच्या निरीक्षणांती वैद्यकीय संशोधन पुढे सरसावत असते.

मानवी मन आणि देह एकमेकांत गुंफलेले असतात. विचार आणि भावनांचा दीर्घकालीन परिणाम आपल्या स्वास्थ्यावर होत असतो. आपले आतील जग आपल्या देहाच्या प्रतिसादांच्या माध्यमातून आकाराला येत असते.

बायोफीडबॅक नामक उपचारशास्त्र हळूहळू गती घेत आहे. विविध उपकरणांचा वापर करून दृश्य आणि श्राव्य स्वरूपात शरीरात घडणाऱ्या घटनांचे अभिप्राय गोळा करून सदर व्यक्तीला प्रशिक्षणाद्वारे आपल्या प्रतिक्रियांचे, प्रतिसादांचे नियमन करण्यास प्रेरित करणे या शास्त्रात अभिप्रेत असते.

**बायोफीडबॅकचे दोन प्रकार आहेत:** शारीरिक आणि बायोमेकॅनिकल. तुमचे शरीर ताण आणि इतर संवेदी क्रियाकलापांना कसे प्रतिसाद देते याचे मूल्यांकन करण्यासाठी बायोफीडबॅक पद्धती अनेक मापन साधनांचा वापर करतात.

देहभानाचे खरे अभिप्राय हवे असतील तर नुस्ते देहाच्या सान्निध्यात राहून चालत नाही तर देहाला काय संदेश द्यायचे आहेत, काय सांगायचे आहे याकडेही काळजीपूर्वक लक्ष द्यावे लागते. बरेचदा परिस्थिती हाताबाहेर गेल्यावर पश्चात्ताप होतो, पण त्यावेळी अब पछतानेसे क्या लाभ, जब चिड़ियाँ चुग गई खेत अशी परिस्थिती होते. मानसशास्त्रात देहाकडून प्रतिसाद मिळण्याचे तंत्र म्हणजे शरीराच्या कामकाजाची त्वरित उपलब्ध होणारी माहिती. शरीरात बदल होत असताना किंवा नुक्तेच बदल घडून गेलेले असतील तर त्याची ताबडतोब माहिती मिळणे आवश्यक असते. उदा.- हृदयाची धडधड, स्नायूंमधील तणाव (विशेषतः पायात गोळे येणे) किंवा मेंदूतील तरंगांच्या वारंवारितेमध्ये होणारे बदल. अशा माहितीतून व्यक्ती सजग होते आणि जाणीवपूर्वक अशा प्रक्रियांचे नियमन कसे करता येईल याच्या कारवाईकडे लक्ष देते. त्यामुळे प्रतिबंधात्मक पावले यशस्वी होऊ शकतात आणि वेळेवर वैद्यकीय सेवा, उपचार मिळाले की संभाव्य शारीरिक हानी टळू शकते, किमान तिची तीव्रता घटू शकते आणि उपचारांना थोडा अधिक अवकाश उपलब्ध होतो. असा सकारात्मक अभिप्राय आवश्यक त्या मनोकायिक बदलांना ताकत देतो.

**या प्रक्रियांचे समजून घेणे खालील काही दैनंदिन उदाहरणांवरून अधिक स्पष्ट होईल-**

**(१) निरीक्षण (देखरेख)-** साधारणतः सतत देखभाल करावयाच्या रुग्णाला अतिदक्षता विभागात ठेवले जाते आणि २४ तास त्यांच्यावर आवश्यक ते उपचार करतात. तेथे अद्ययावत वैद्यकीय उपकरणांद्वारे रुग्णांच्या प्रकृतीचे निरीक्षण केले जाते. शरीराला संवेदक (सेंसर- एक बदल जाणण्याची क्षमता असलेले साधन. हे साधन प्रत्यक्षातील गोष्टी मोजते आणि त्याचे वाचन करता येईल अशा संदेशात रूपांतर करते.) जोडून काही विशिष्ट प्रतिसाद मोजले जातात. शरीराचे तापमान, हृदयाच्या दोन ठोक्यांमधील अंतर मोजणे ज्यावरून आरोग्याच्या स्थितीचे निर्देशन होते (याला हार्ट रेट व्हेरिएबिलिटी - एचआरव्ही) असे म्हणतात. हे सामान्यतः इलेक्ट्रोकार्डियोग्राम (इसीजी) वापरून मोजले जाते.

निष्कर्ष असा कि- उच्च एचआरव्ही म्हणजे तुमचे शरीर तणावाखाली चांगले प्रतिसाद देत आहे आणि चांगले कार्य करत आहे, तर कमी एचआरव्ही म्हणजे तणावाखाली किंवा आजारी असताना शरीर योग्य प्रकारे प्रतिक्रिया देत नाही. हृदयविकार, तणाव, झोप, वय, लिंग आणि जीवनशैली यासारख्या गोष्टी एचआरव्ही वर परिणाम करतात.

उदा. तुमची हृदय गती प्रति मिनिट ६० ठोके असेल, तरीही दोन ठोक्यांमधील अंतर नेहमी एक सेकंद असेलच असे नाही. एचआरव्ही मुळे, दोन ठोक्यांमधील अंतर काही मिलीसेकंदने कमी-जास्त होऊ शकते.

प्रतिसाद- नियमित व्यायाम, चांगली झोप, संतुलित आहार आणि तणाव व्यवस्थापन यासारख्या गोष्टी एचआरव्ही सुधारण्यात मदत करतात. ही माहिती जर संगणकाच्या पडद्यावरील एखाद्या आलेखाच्या माध्यमातून किंवा श्रवणप्रणालीद्वारे (बीप असा ध्वनी) देता आली तर उपचारांची दिशा ठरते आणि धोक्याची तीव्रता मापता येते.

मानसशास्त्र या अभिप्रायांकडे विचार व संवेदना यांच्यातील शरीरविज्ञान जाणून घेण्याचा अभ्यास म्हणून बघते. यावरून इतर तंत्रे- दीर्घश्वसन, विश्रांती तंत्रे (यामध्ये ध्यान, प्रगतीशील स्नायू शिथिलता (प्रोग्रेसिव्ह मसल रिलॅक्सेशन- पीएमआर) यांचा प्रयोग म्हणून वापर करून अपेक्षित परिणाम (हृदयगती सामान्य करणे इ ) साधता येतात का असे तपासता येते.

अधिक सरावानंतर आपल्याला जाणीवपूर्वक नियमन साध्य होते आणि मग देहभानाच्या प्रतिसादाची आवश्यकता कमी होत जाते. हे स्व-नियमन अंततोगत्वा सुधारलेल्या निरामयतेकडे नेते.

**हे प्रतिसाद खालील विकारांमध्ये उपचार म्हणून उपयुक्त ठरतात-**

**(अ) तणाव आणि वैफल्य नियोजन** - या तंत्राच्या वापरातून शरीराचे तणावांना दिले जाणारे प्रतिसाद ओळखून त्यांच्या मदतीने निद्रेची गुणवत्ता सुधारता येते आणि स्नायू लवचिक होण्यास सुरुवात होते.

**(ब) वेदनांचे निराकरण-** डोकेदुखी, पाठीचे दुखणे, जबड्याच्या सांध्याचे दुखणे कमी होते.

**(क)** अस्थिरता आणि अतिक्रियाशीलता यांची विकृती सौम्य करणे (अटेंशन डेफिशिट हायपर अक्टिव्हिटी डिसऑर्डर- एडीएचडी). या माध्यमातून लक्ष केंद्रित करण्याची शक्ती वाढते.

**(ड) मूत्रमार्गावरील नियंत्रण ढळणे -** मूत्रमार्गातील स्नायू कमकुवत झाल्याने, संसर्ग होणे, पुरुषांमध्ये प्रोस्टेट ग्रंथीची वाढ किंवा स्त्रियांमध्ये गर्भाशयाचे विकार यामुळे देखील मूत्रमार्गात असंयम होऊ शकतो. इतर आरोग्यविषयक समस्या, उदा.- मधुमेह, मज्जासंस्थेचे विकार किंवा काही विशिष्ट औषधे घेतल्याने देखील मूत्रमार्गात असंयम होऊ शकतो.

देहभानाचे प्रतिसाद पेल्विक फ्लोअर व्यायामास सशक्त करतात ज्यायोगे मूत्राशयाचे स्नायू मजबूत होतात.आणि मूत्रावर नियंत्रण आणता येते.

याव्यतिरिक्त उच्च रक्तदाबाने ग्रस्त, नशा करणाऱ्या व्यसनी लोकांवरील उपचारासाठी, तसेच रेनॉडची घटना ( ही अशी एक वैद्यकीय स्थिती असते ज्यामध्ये लहान धमन्यांच्या उबळामुळे रक्तवाहिन्यांच्या अंतापर्यंत रक्त प्रवाह कमी होण्याचे प्रसंग उद्भवतात) अशा विकारांमध्येही देहभानाच्या प्रतिसादांचा उपयोग होतो.

**(२) नियमन आणि शिक्षण-** सराव आणि मार्गदर्शनानंतर व्यक्तीला विश्रांती आणि तणाव यांचे पॅटर्न्स ओळखता येतात आणि त्यानुरूप रणनीती विकसित करता येते. शिक्षा किंवा बक्षीस या मार्गांनी व्यक्तीला आपले वर्तन सुधारता येते. म्हणजे आवश्यक प्रतिसाद जर आधीच पेरलेले असतील, उदा- विश्रांती मिळाल्यावर आनंददायी संगीत इत्यादी.

**लाभ-**

**(१) स्व- जागरूकतेमध्ये वाढ-** शरीराच्या प्रतिसादांची जाण अधिक प्रगल्भ होते.

**(२) स्व-नियमनात सुधारणा-** देहाच्या कार्यप्रणालीत जाणीवपूर्वक सुधारणा संभवते, विशेषतः औषधोपचारांवरील अवलंबून राहणे कमी होते.

**(३) अस्पर्श आणि सुरक्षा यांचे कवच-** किमान परिणाम साधण्यासाठी कोणतीही वैद्यकीय प्रक्रिया करण्याआधी फक्त नमुन्यावर भागविले जाते, कोणत्याही प्रकारचे शल्यकर्म गरजेचे नसते.

**(४) व्यक्तीला अनुरूप असे उपचार-** बायोफीडबॅक तंत्र व्यक्तीनुसार बदलता येते.

एफ डी ए ( फूड अँड ड्रग ऍडमिनीस्ट्रेशन) ने काही यंत्रांच्या वापरास, उदा रक्तदाब कमी करणे, श्वसन मंद आणि खोलवर करणे परवानगी दिलेली आहे. त्यामुळे बऱ्याच शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याच्या समस्यांना तोंड देता येते.

(१) वैफल्य, निराशा
(२) अस्थमा
(३) कॅन्सरच्या उपचारांसाठी वापरल्या जाणाऱ्या औषधांचे परिणाम कमी करणे
(४) दीर्घकालीन वेदना
(५) बद्धकोष्ठ
(६) स्नायू-वेदना विकार (थकवा, झोप न येणे, मूड बदलणे)
(७) कानात ध्वनी उमटणे
(८) खिन्नमनस्कता

या अपारंपरिक उपचारपद्धतीकडे वैद्यकीय क्षेत्र, विशेषतः रुग्ण अधिक वळताहेत कारण-

(अ) कोणतेही शल्यकर्म केले जात नाही.
(ब) औषधांची गरज कमी होत जाते.
(क) सुरु असलेल्या उपचारांची क्षमता वाढते.
(ड) जिथे औषधी उपचार नसतात, (उदा. गर्भवती स्त्री) तिथे देहभानाचे अभिप्राय हे तंत्र प्रभावी ठरू शकते.
(इ) आपल्या स्वास्थ्यावर नियंत्रण असल्याची भावना रुग्णाला सुखावते.

अर्थात हे उपचार सामान्यतः सुरक्षित असले तरीही त्यांत थोडीफार जोखीम असते. विशेषतः त्वचा किंवा इतर आजारांचा पूर्वेतिहास असणाऱ्या व्यक्तींवर या मार्गाने उपचार करण्यापूर्वी वैद्यकीय सल्ला अत्यावश्यक असतो. हे उपचार साधारण ३० ते ६० मिनिटे चालतात आणि त्याचा कालावधी पूर्णतया व्याधीच्या तीव्रतेवर अवलंबून असतो. अर्थात असे उपचार सुरु करण्यापूर्वी संबंधित उपचारकर्त्याविषयी काही माहिती जाणून घेणे आवश्यक असते. त्यांच्याकडे लायसन्स किंवा कोणत्याही पद्धतीचे सर्टिफिकेट असावयाला हवे. रुग्णाच्या व्याधीवर उपचार करण्याचा पूर्वानुभव गरजेचा असतो. साधारण उपचार किती दिवस चालतील आणि अदमासे किती खर्च येईल याचीही माहिती असावी.

देहभानाचे अभिप्राय जर विचारांमधील बदलांसाठी प्रवृत्त करीत असतील, भावना आणि वर्तनामध्ये सुचारू तसेच परिणामकारक सुधारणा घडवून आणत असतील तर काळाच्या ओघात हे बदल स्थिर असतील आणि कोठल्याही औजाराची, शस्त्राची आवश्यकता उरणार नाही.

# शेतकरी संरक्षणाविना



समाजभान
अशोक ढगे

जगातील अनेक उत्पादक त्यांच्या उत्पादनाची विक्रीची किरकोळ किंमत ठरवतात. शेतकऱ्याला शेतीसाठी लागणारी खते, बियाणे, औषधे, कीटकनाशके आदी खरेदी करावी लागतात. ती किरकोळ विक्री किमतीसह खरेदी करावी लागतात. शेतकऱ्यांना मात्र त्याच्या शेतीमालाची किंमत ठरवता येत नाही. निसर्ग, शेतीमालाची किंमत, उत्पादन खर्च यात शेतकरी पिचून गेला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या वाढत असताना त्याच्या वेदना कमी करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत; परंतु त्याकडे लक्ष द्यायला कुणी तयार नाही. शेतीमालाच्या भावावर आयात-निर्यात धोरण, शेतीमालाचे जागतिक उत्पादन आदींचा परिणाम होत असतो. या सर्वांचा विचार करून सरकारची धोरण असायला हवीत; परंतु धोरणकर्त्यांच्या प्राधान्यक्रमात शेतकरी हा सर्वांत शेवटचा घटक असतो.

स्वातंत्र्यानंतर, जमिनीचे समान वाटप सुनिश्चित करण्यासाठी विविध जमीन सुधारणा लागू करण्यात आल्या. भारतीय संविधानाच्या कलम २३, ३८ आणि ३९ ने राज्यांना जमीनदारी कायदे रद्द करण्यासह बंधपत्रित कामगार पद्धती रद्द करण्याचा अधिकार दिला. राज्ये लोकांच्या हितासाठी तलाव, तलाव इत्यादी जमीन आणि सामुदायिक संसाधनांचे पुनर्वितरण करू शकतात. शेतीमालाच्या भावात कृषी मालावर प्रक्रियेला अतिशय महत्त्व असते. फिनलंड, फ्रान्ससारख्या देशात कृषी मालावर प्रक्रिया करण्याचे प्रमाण ४७ टक्क्यांपर्यंत असते. भारतात हे प्रमाण चार टक्के आहे. त्यामुळे काढणीनंतर पिकांचे नुकसान होते. प्रक्रियेचे प्रमाण वाढवण्यासाठी सरकारी प्रयत्न कमी पडतात. वीज, पाणी आणि भाव या तिहेरी संकटात अडकलेल्या शेतकऱ्यांचे संरक्षण करण्याची आवश्यकता आहे. एका व्यक्तीकडून जमिनीची साठवणूक रोखण्यासाठी आणि जमीन संसाधनांचे अधिक समन्यायी वाटप सुनिश्चित करण्यासाठी विविध राज्यांनी जमीन मर्यादा कायदे लागू केले. अतिरिक्त जमीन भूमिहीन आणि सीमांत शेतकऱ्यांना पुनर्वितरण करायची होती. भूसंपादन कायदा सुरुवातीला १८९४ मध्ये ब्रिटिशांनी लागू केला होता. १८९४ च्या कायद्यानुसार कार्यक्षम अपीलीय यंत्रणेला वाव नव्हता. अधिग्रहणाचा उद्देश सुनावणीद्वारे निश्चित केला गेला होता; परंतु सुनावणी घेणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांचे विचार मांडण्याची आवश्यकता नाही. अधिग्रहणामुळे विस्थापित झालेल्या लोकांच्या पुनर्वसन आणि पुनर्वसनाशी संबंधित १८९४ च्या कायद्यात कोणत्याही तरतुदी नव्हत्या. १८९४ च्या भूसंपादन कायद्याचा प्राथमिक उद्देश जमीन संपादन होता आणि तो एका मोहिमेच्या स्वरूपात करायचा होता. तथापि, २०१३ च्या कायद्याचे शीर्षक जमीन संपादन, पुनर्वसन आणि पुनर्वसनात उचित भरपाई आणि पारदर्शकता कायदा, २०१३ असे आहे. या कायद्यांतर्गत येणाऱ्यांना योग्य भरपाई आणि त्या बाधित लोकांच्या पुनर्वसनाची तरतूद करतो, त्यांच्या कल्याणासाठी आणि भूसंपादन प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकतेसाठी पुरेसे संरक्षण प्रदान करतो.

**भारतात शेतकऱ्यांच्या प्रश्नांना महात्मा फुले यांच्यासह अनेकांनी वाचा फोडली. ब्रिटिशांच्या काळातही शेतकऱ्यांसाठी अनेक कायदे करण्यात आले. दुसरे पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांनी 'जय जवान, जय किसान' घोषणा केली होती. राज्यघटनेतील तरतुदीनुसार, शेती हा सामायिक सूचीत येतो. त्यामुळे केंद्र व राज्य सरकारला शेतकरी आणि शेतीसंबंधी कायदे करण्याचा अधिकार आहे. त्याच्याशी निगडित एकच एक कायदा नाही. जगातला पहिला व्यवसाय शेती आहे, तरी भारतातील शेतीकडे मात्र व्यावसायिक दृष्टीने पाहिले जात नाही.**

जगातील सर्व अन्न आणि कृषी उत्पादनाचा आधार असलेल्या पीक अनुवांशिक विविधतेच्या देखभालीसाठी शेतकऱ्यांचे हक्क ही एक पूर्वअट आहे. मुळात शेतकऱ्यांचे हक्क साकार करणे म्हणजे शेतकऱ्यांना शेतीच्या सुरुवातीपासून पीक अनुवांशिक संसाधने जपण्यास आणि विकसित करण्यास सक्षम करणे आणि जागतिक अनुवांशिक संसाधनांमध्ये या अपरिहार्य योगदानाबद्दल त्यांना ओळखणे आणि बक्षीस देणे. जगभरातील शेतकऱ्यांनी पीक अनुवांशिक संसाधनांचे संवर्धन आणि विकास करण्यात दिलेल्या प्रचंड योगदानाची दखल घेतो आणि या अधिकारांचे संरक्षण आणि प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजनांची तरतूद करतो. यामध्ये पारंपरिक ज्ञानाचे संरक्षण; वनस्पती अनुवांशिक संसाधनांशी संबंधित म द्यांवर निर्णय घेण्यामध्ये शेतकऱ्यांचा सहभागी होण्याचा अधिकार; आणि वनस्पती अनुवांशिक संसाधनांच्या वापरातून उद्‌भवणारे फायदे वाटून घेण्यात समानतेने सहभागी होण्याचा अधिकार यांचा समावेश आहे.

शेतकऱ्यांना वनस्पती अनुवांशिक संसाधनांचे संरक्षक म्हणून कायम राहण्यास सक्षम करण्यासाठी शेतकऱ्यांच्या हक्कांचा एक अविभाज्य भाग म्हणजे शेतीत जतन केलेले बियाणे/प्रजनन साहित्य जतन करणे, वापरणे, देवाणघेवाण करणे आणि विक्री करणे. हे अधिकार बियाणे सुरक्षेसाठीदेखील महत्त्वाचे आहेत. कारण स्वतःच्या किंवा शेजाऱ्यांकडून शेती केलेले जतन केलेले बियाणे हे विकसनशील देशांमधील बहुसंख्य शेतकऱ्यांसाठी बियाण्यांचा मुख्य स्रोत आहे. त्याबाबतच्या कायद्यात स्पष्टता नाही. २०१८ च्या अखेरीस न्यू यॉर्कमधील संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने ग्रामीण भागात काम करणाऱ्या शेतकरी कुटुंबांच्या आणि इतर लोकांच्या हक्कांच्या संरक्षणाबाबत एक अभूतपूर्व घोषणापत्र स्वीकारले. घोषणेच्या कलम १९ मध्ये विशेषतः बियाण्यांच्या अधिकाराचा समावेश आहे. त्यात त्यांच्या शेतीत जतन केलेले बियाणे किंवा प्रसार साहित्य जतन करण्याचा, वापरण्याचा, देवाणघेवाण करण्याचा आणि विकण्याचा अधिकार समाविष्ट आहे.

शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी देशात शेतकरी संरक्षण कायदा आणण्यासाठी व

शेतमालाला चांगला भाव मिळण्यासाठी देशभरात वंदे किसान गुड्स रेल्वे सुरू करण्याच्या मागणीसाठी शेतकरी संघटना, पीपल्स हेल्पलाईन व भारतीय जनसंसदेच्यावतीने नुकतेच आंदोलन करण्यात आले. केवळ आंदोलन करून शेतकरी थांबले नाहीत. पुणतांब्यातील शेतकरी आंदोलनाने राज्याला दिशा दिली. आता शेतकरी संरक्षण कायद्यासाठी अहल्यानगर आणि छत्रपती संभाजीनगरला झालेल्या दोन परिषदा महत्त्वाच्या आहेत.

शेतकऱ्यांना आर्थिक स्वातंत्र्य आणि आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी शेतकरी संरक्षण कायद्याची गरज आहे. ७५ वर्षांच्या स्वातंत्र्यानंतरसुद्धा भारतातील सामान्य शेतकऱ्यांना आर्थिक न्याय मिळू शकलेला नाही. आज शेतकऱ्यांना फक्त पैशाची, कर्जमाफीची लालुच दाखवली जाते; परंतु प्रत्यक्षात शेतीमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळत नाही. अनेक वेळेला नाशवंत मालाचे भाव उत्पादन खर्चाच्या खाली जाते. रस्त्यावर माल फेकून द्यावा लागतो. यासाठी देशातील सर्व बाजारपेठा शेतकऱ्यांना उपलब्ध झाल्या पाहिजेत. त्यासाठी वंदे किसान गुडस् ट्रेन्स् शिवाय पर्याय नसून; मात्र केंद्र सरकार याबाबतीत कोणताही निर्णय घेत नसल्याचे संघटनांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

शेतकरी संरक्षण कायद्यातून पीक विमा योजना, शेतीमाल वाहून नेण्यासाठी कायमची वाहतूक यंत्रणा, विशेषतः मालवाहू रेल्वे, त्याशिवाय जिरायत शेतकऱ्यांसाठी सरकारी अनुदानातून जलतारा योजना राबविण्याची तरतूद, कृषी उद्योजक निर्माण होण्यासाठी कृषी उद्योग वसाहती प्रत्येक तालुक्याम ध्ये झाल्या पाहिजेत. शेतकऱ्यांसाठी शेतकरी न्यायालये या कायद्याने देशभरात स्थापन व्हावीत, ज्यातून शेतरस्ते, जमिनी खालून पाईपलाईन, शेतीसंदर्भातील वाद, शेती वाटप आणि इतर सर्व बाबी फक्त सहा महिन्यांच्या आत निकालात काढण्याची तरतूद असावी.

आज सर्वत्र शेतीमाल भेसळ करून विकला जातो. त्यातून मोठ्या प्रमाणात कॅन्सरसारखे आजार पसरत आहेत. त्यामुळे एकंदरीत शेती व्यवसायाला चांगले दिवस आणण्यासाठी आणि शेतकऱ्यांना आर्थिक न्याय मिळवून देण्यासाठी या कायद्याशिवाय पर्याय नसल्याची भूमिका आंदोलकांनी व्यक्त केली. नाशवंत शेतीमाल वाचविण्यासाठी शीतगृहांची प्रत्येक गावात सोय झाली पाहिजे. प्रत्येक गावासाठी कृषी पंचायतीची स्थापना या कायद्याने झाली पाहिजे, शेतकऱ्यांना सोलर उर्जेवर चालणारे ट्रॅक्टर्स, सोलर पंप, मोठ्या अनुदानातून मिळाले पाहिजे.

शेतकऱ्यांना दुग्ध व्यवसाय, पोल्ट्री व्यवसाय आणि इतर व्यवसायांसाठी कमी व्याजदरात कर्ज मिळण्याची मागणी आंदोलकांनी केली; परंतु बहुजन ६३ टक्के शेतकरी या संरक्षण कायद्यापासून वंचित राहिले आहेत. दुर्दैवाने देशातील शेती व्यवसाय वाचवा असा टाहो फोडण्याची वेळ आली आहे. त्यासाठी घटनेमध्ये दुरुस्ती करून शेतकऱ्यांना विशेष मूलभूत हक्क दिले गेले पाहिजेत. त्यासाठीची वैचारिक तात्त्विक मार्गदर्शन तत्त्वे ठरविणे काळाची गरज आहे.




# नव्या आव्हानांसाठी भारतीय लष्कर सज्ज!

लक्ष्यवेध

**तेजस परब**



> भारतीय लष्कर आपल्या कार्यपद्धतीत एक ऐतिहासिक व निर्णायक बदल घडवून आणण्याच्या दिशेने वाटचाल करत आहे. २०२६-२७ पर्यंत लष्कराच्या बहुतांश कार्यक्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), 'मशीन लर्निंग' आणि 'बिग डेटा ॲनालिटिस' या अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याविषयी...

ड्रोन ऑपरेशन्स, पाळत ठेवणे, लढाईसाठीचे प्रशिक्षण आणि गुप्तचर माहिती गोळा करण्यापासून ते पुरवठा साखळी व्यवस्थापनापर्यंत प्रत्येक गोष्टीत आधुनिक तंत्रज्ञान वापरण्याचा भारतीय लष्कराचा मानस आहे. एका अहवालानुसार, भारतीय लष्कराला सजगता वाढवण्यासाठी अशा क्षमतेची आवश्यकता आहे, जी प्रचंड प्रमाणातील माहिती काही सेकंदांत प्रक्रिया करू शकेल. यासाठी लष्कर अनेक उपकरणे आणत आहे. मोठ्या दस्तऐवजांना पटकन समजून घेण्यासाठी 'टेस्ट समरीझर' जे मोठ्या भाषिक मॉडेल्सच्या मदतीने काम करतात, 'एआय'वर चालणारे चॅटबॉट्स जे प्रत्यक्ष संवाद साधून त्वरित उत्तरे देतात आणि आवाजी आज्ञांना तत्काळ लिहून रूपांतरित करणारी 'व्हॉईस टू टेस्ट' प्रणाली या सर्व गोष्टी लष्करात येऊ घातल्या आहेत.

चेहरा ओळखणारी तंत्रे वापरण्याचीही तयारी झाली आहे, जी शत्रू किंवा संशयित व्यक्ती ओळखतील. तसेच संशयास्पद वर्तन किंवा पॅटर्न्स शोधणाऱ्या प्रणाली वापरण्यात येतील. ड्रोन, उपग्रह, विमाने आणि जमिनीवरच्या सेन्सर्समधून आलेली माहिती एकत्र करून ती थेट मिशनदरम्यान वापरण्यात येईल. यामुळे कमांडर्सना अधिक योग्य आणि वेळेवर निर्णय घेता येतील. या सर्व तांत्रिक पायाभूत सुविधा रणांगणावर माणसांवरचा धोका कमी करतील आणि गती व अचूकता वाढवतील. हा तांत्रिक बदल आणण्यामागे 'ऑपरेशन सिंदूर' या कारवाईची शिकवण खूप महत्त्वाची ठरली. मे महिन्यात पार पडलेल्या या कारवाईत भारतीय लष्कराने पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधील दहशतवादी तळांवर जोरदार हल्ला केला. या कारवाईत दोन्ही बाजूंनी मोठ्या प्रमाणावर ड्रोनचा वापर झाला. 'ऑपरेशन सिंदूर'ने हे ठामपणे दाखवून दिले की, भविष्यातील युद्धं केवळ शस्त्रावर अवलंबून राहणार नाहीत, तर तंत्रज्ञानावरच लढली जातील. कोण किती वेगाने, हुशारीने आणि प्रभावीपणे तंत्रज्ञान वापरतो हेच निर्णायक ठरेल. 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशस्वितेने भारतीय लष्कराला हेही शिकवले की, रणांगणावरील परिस्थिती क्षणाक्षणाला बदलते आणि त्यासाठी त्या क्षणीच डेटा संकलन व विश्लेषण करणे अत्यंत गरजेचे आहे.

या संक्रमणासाठी भारतीय लष्कराने विशेष कार्यदल तयार करण्याचा निर्णय घेतला आहे. यात 'एआय' तज्ज्ञांचा समावेश असेल आणि हे कार्यदल 'डायरेटोरेट जनरल ऑफ इन्फर्मेशन सिस्टम्स'च्या अखत्यारीत काम करेल. यात लष्कराच्या विविध शाखांतील अधिकारी असतील. त्यांच्या जबाबदार्यांमध्ये लष्करी कर्मचार्यांना प्रशिक्षण देणे, तांत्रिक क्षमता वाढवणे, डेटा शेअरिंग व समाकलन सुलभ करणे आणि 'एआय' सिस्टम्सची देखभाल करणे या गोष्टींचा समावेश असेल. हे कार्यदल 'कॉम्बॅट ट्रेनिंग सिम्युलेशन्स', पुरवठा व्यवस्थापन, गुप्तचर पाळत, सोशल मीडिया व बातम्या यांसारखी उघड माहिती पाहणे, ऑपरेशनची आखणी, शत्रूच्या दुर्बल गोष्टी शोधणे, लक्ष्य निश्चिती, जीपीएस न चालणाऱ्या भागात नेव्हिगेशन आणि उपकरणांची पूर्वसंकेत देणारी देखभाल अशा विविध कामांमध्ये 'एआय'चा वापर सुनिश्चित करेल.

लष्कराची खरेदी करताना पाळले जाणारे 'जीएसयूआर' (जनरल स्टाफ क्वालिटेटिव्ह रिक्वायरमेंट्स) हे निकषही आता बदलले जाणार आहेत. नव्या साधनांमध्ये 'एआय' असणे आवश्यक ठरेल. जुन्या उपकरणांमध्येही संशय असल्यास 'एआय'चे घटक बसवले जातील. 'डीजीआयएस'मध्ये एक 'एआय' लॅबोरेटरी उभारण्यात येत आहे. येथे नवनवीन 'एआय' मॉडेल्स तयार होतील आणि चाचणी केली जाईल. हे मॉडेल्स लष्करापुरते मर्यादित न राहता, नौदल व हवाई दलातही वापरले जातील, जेणेकरून तीनही दले समन्वयाने काम करू शकतील. भविष्यातील युद्धाचं स्वरूप पूर्णपणे बदलणार आहे, हे आता स्पष्ट झाले आहे.

'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'मुळे निर्णय घेण्याचा वेग वाढेल आणि सामरिक रणनीती नवी उंची गाठेल. ड्रोन स्वरूपातल्या हल्ल्यांपासून सायबर हल्ल्यांपर्यंत आणि माहितीच्या युद्धापर्यंत सर्व गोष्टीत तंत्रज्ञान निर्णायक ठरेल. 'ऑपरेशन सिंदूर'मुळे हे शिकायला मिळाले की पारंपरिक रणनीती आता पुरेशी राहणार नाही, तर तांत्रिक सजगतेसह अधिक लवचिकता आवश्यक आहे. भविष्यातील युद्ध डेटा, वेग आणि तंत्रज्ञानावर अवलंबून असतील आणि भारतीय लष्कराने त्याची तयारी सुरू केली आहे. यासंदर्भात अमेरिका, चीन आणि रशिया यांचा अभ्यास केल्यास लक्षात येते की, भारतीय लष्करही आता त्यांच्या पंक्तीत उभे राहात आहे.

अमेरिका गेल्या अनेक वर्षांपासून लष्करी 'एआय' संशोधनात अग्रेसर आहे. त्यांच्या 'डिफेन्स ॲडव्हान्स्ड रिसर्च प्रोजेट्स एजन्सी'ने युद्धभूमीसाठी अनेक स्वयंचलित प्रणाली, ड्रोन स्वार्म्स, आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर चालणार्या प्रणाली विकसित केल्या आहेत. अफगाणिस्तान आणि इराकमध्येही त्यांनी 'एआय'चा वापर करून युद्धातील धोके कमी केले व निर्णयक्षमता वाढवली. चीननेदेखील गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर 'एआय'वर आधारित रणनीती राबवायला सुरुवात केली आहे. त्यांचा 'इंटेलिजंटाइजेशन वॉरफेअर' हा दृष्टिकोन भविष्यातील युद्धे केवळ यांत्रिकी नव्हे, तर बुद्धिमान पद्धतीने लढायची असतील, हे दाखवतो.

# गुरु : एक चैतन्यप्रकाश

जीवनातील वास्तवाची जाणीव करून देऊन सात्वीक समाधान व खरा आनंद प्राप्त करून देण्यासाठी दिव्य ज्ञानानुभूतींद्वारे आपल्यातील चैतन्य जागृत करून देणाऱ्या गुरूंचे स्थान आपल्या जीवनात खूप महत्वाचे आहे.

**जैसे बाळका लेववजे लेणे। तया शृंगारा बाळ काइ जाणे।**
**परि ते सुखाचे सोहळे भोगणे। जननीयेची दृष्टी।।**

या संत ज्ञानेश्वरांच्या ओवीतूनही आपल्याला आपल्या जीवनात गुरूंचे स्थान किती महत्वाचे आहे हे लक्षात येते. गुरु नेहमीच आपल्या शिष्याचे अतिशय लडीवाळपणे कौतुक करतात. त्याला अपेक्षित नसणाऱ्या गोष्टीही त्याच्या जीवनात उपलब्ध करून देतात. खरे तर गुरूंची ही कृपा दृष्टी शिष्यालाही समजत नाही. आई आपल्या बाळाला विविध अलंकाराने सजवते, नटवते त्याचा भरभरून आनंद किंवा सुख तीला मिळत असते, पण त्या बाळाला त्याचे काहीच वाटत नसते. ती मात्र आपल्या बाळाचे सौंदर्य डोळे भरून पहाते. एवढेच नव्हे तर डोळ्यात साठवून ठेवते. असे असले तरी आपल्या तान्हूल्याच्या प्रेमाने उचंबळलेले ते मातृ हृदय त्या बाळाविषयी उपकाराची भावना बाळगेल अशी कल्पना सुद्धा करवत नाही आपल्याला!



गुरूंचेही तसेच असते आपल्या शिष्यावरच्या प्रेमाने उचंबळलेल्या मनाने गुरु अगदी निरपेक्ष भावनेने त्याच्या जीवनात सुख मिळेल अशा प्रकारे मार्गदर्शन करतात. निरनिराळ्या अनुभूतीतून त्याला चांगले काय व वाईट काय हे वेळोवेळी समजून सांगतात.

गुरूंचे हे ज्ञानदानाचे कार्य निरपेक्ष भावनेने केलेले असते. गुरु शिष्याचे हे नाते प्रेमाचे असते. प्रेम आणि ज्ञान हेच गुरूंचे भांडवल आणि शिष्याची गुरुवरील श्रद्धा आणि निष्ठा हीच गुरुदक्षिणा! म्हणजेच गुरु आणि शिष्य यांच्या आत्मिक एकरूपतेतून वहाणारा पवित्र आनंदाचा हा निर्झर गुरु आणि शिष्य अशा दोघांनाही आत्मिक समाधान मिळवून देतो. शिष्याच्या मनातील अज्ञान दुर करून ज्ञानाची ज्योत प्रज्वलीत करणे ही मातृहृदयी गुरूंसाठी आनंदाची सुखानुभूतीच असते. म्हणूनच आपले हित कशात आहे हे शिष्यापेक्षा गुरूंनाच अधिक माहीत असते. त्यामूळे तान्हे मूल ज्याप्रमाणे आपल्या आईजवळ निश्चिन्तपणे विसावलेले असते त्याप्रमाणे शिष्यानेही गुरूंनी दाखवलेल्या मार्गांवरून निश्चिन्तपणे वाटचाल करावी. मग ती वाट कितीही खडतर असली तरी गुरुवर ठाम विश्वास, श्रद्धा ठेवून आत्मविश्वासाने मार्गक्रमण चालू ठेवणेच योग्य असते.

खरेतर माणूस ज्या गोष्टींचा शोध घेत आहे ती गोष्ट त्याच्या अंतरंगातच आहे फक्त हे ज्ञान जागृत करून देण्यासाठी जागृत गुरु मिळणे आवश्यक आहे. जेंव्हा आपल्यासमोर आपल्यासारखीच एखादी व्यक्ती स्वतःच्या अनुभवाविषयी बोलत असते, अनुभव संपंन्न विचाराने समृद्ध असे मार्गदर्शन करते तेव्हा आपल्याला सुद्धा त्या व्यक्तीसारखेच जीवन जगण्याची जेव्हा प्रेरणा मिळते तेंव्हा त्या व्यक्तीच्या रूपाने प्रत्यक्ष गुरुच आपल्याला आपल्या परिस्थितीनुसार, प्रसंगानुसार आणि आपल्या आंतरीक तळमळीनुसार मार्गदर्शन करत असतात. म्हणूनच गुरूंना कल्पतरू म्हणतात, कल्पतरू हा काल्पनिक असला तरी गुरूवर अढळ श्रद्धा ठेऊन आपल्या मनाची शक्ती वाढवून कठोर परिश्रमाची तयारी ठेऊन योग्य दिशेने प्रयत्न केल्यास ध्येय कितीही मोठे असो किंवा कठीण असो ते निश्चित साध्य होते. अशी किती तरी उदाहरणे आजही आपल्याला पहायला मिळतात. फक्त ते ध्येय भव्य आणि विश्वात्मक असायला हवे. म्हणूनच गुरूंना वंदन करून आपल्या मनातील शडवीकरांना दूर करून भव्य विश्वकल्यानाची भावना जागृत करू या आणि गुरुकृपेच्या परिसस्पर्शाने अज्ञान अंधःकारापासून मुक्ती मिळवू या. आपल्या सर्वांचे जिवन शुभ विचारांच्या तेजस्वी चैतन्य प्रकाशात उजळून जावे ही सदिच्छा.

**कांचनगंगा मोरे**





# विजय सत्याचा, विजय न्यायाचा, विजय हिंदुत्वाचा!

**मालेगाव बॉम्बस्फोट खटल्याचा तब्बल १७ वर्षांच्या न्यायालयीन लढ्यानंतर लागलेला निकाल म्हणजे, 'भगवा दहशतवादा'चे कुभांड रचणार्यांना लगावलेली जोरदार चपराकच! त्यामुळे हिंदू धर्माविषयी कितीही असत्य पेरले, पसरवले, तरी शेवटी विजय सत्याचा, न्यायाचा आणि हिंदुत्वाचाच होतो! हेच सिध्द झाले. या निकालाने एका साध्वीच्या, काही संन्याशांच्या व काही हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांच्या समर्पित जीवनाला लागलेला बट्टा आज दूर झाला. खरंतर हा बट्टा नव्हताच, तर हे होते एक सुनियोजित षड्यंत्र! जे या निकालाने उघड झाले.**

वेधक

**प्रतिनिधी**

मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरण अत्यंत संवेदनशील आणि तितकेच वादग्रस्तही ठरले. या खटल्यात हिंदुत्ववादी व्यक्ती आणि संघटनांना नाहक गोवून बेछूट आरोप, असहनीय शारीरिक-मानसिक अत्याचार तर झालेच; पण तत्कालीन सत्ताधारी काँग्रेसची मजल 'भगवा दहशतवाद' असा शब्दप्रयोग रुढ करण्यापर्यंत गेली. पण, तब्बल १७ वर्षांच्या प्रदीर्घ न्यायालयीन लढ्यानंतर या खटल्याचा लागलेला निकाल म्हणजे, 'भगवा दहशतवादा'चे कुभांड रचणारयांना लगावलेली जोरदार चपराकच! त्यामुळे हिंदू धर्माविषयी कितीही असत्य पेरले, पसरवले, तरी शेवटी विजय सत्याचा, न्यायाचा आणि हिंदुत्वाचाच होतो!

नाशिक जिल्ह्यातील मालेगावच्या दुसर्या बॉम्बस्फोटाच्या खटल्यातही सर्व आरोपींची निर्दोष सुटका झाली आहे. मुस्लीमबहुल, संवेदनशील मालेगावात हमीदिया मशीद व कब्रस्तान परिसरात ८ सप्टेंबर २००६ रोजी झालेल्या पहिल्या स्फोटात ३७ जणांचा बळी गेला होता. त्यासाठी अटक केलेले सर्व आरोपी अल्पसंख्याक होते. २०१६ मध्ये त्यांची निर्दोष सुटका झाली. तो मामला तिथेच संपला. दुसरा स्फोट २९ सप्टेंबर २००८चा. तो देशभर, जगभर गाजला. कारण त्यात हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी, लष्करी अधिकारी अटक झाले. २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील हुतात्मा अधिकारी हेमंत करकरे यांच्या नेतृत्वातील दहशवादविरोधी पथक, म्हणजे एटीएसने या प्रकरणी साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, कर्नल प्रसाद पुरोहित, निवृत्त मेजर रमेश उपाध्याय, अभिनव भारत संघटनचे कोषाध्यक्ष अजय राहिरकर तसेच समीर कुलकर्णी, सुधाकर चतुर्वेदी, सुधाकर द्विवेदी आदींना अटक केली. नंतर या प्रकरणाचा तपास राष्ट्रीय तपास यंत्रणेकडे (एनआयए) सोपविण्यात आला. आधी न्यायालयाने पाचजणांना खटल्यातून वगळले. गुरुवारी उरलेल्या सातजणांची विशेष एनआयए न्यायालयाने सुटका केली. या निकालातील न्यायालयाचे एक विधान लक्षणीय आहे. दहशतवादाला धर्म नसतो. हे खरेच आहे. या निकालाने एका साध्वीच्या, काही संन्याशांच्या, एका लष्करी अधिकार्याच्या व काही हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांच्या समर्पित जीवनाला लागलेला बट्टा आज दूर झाला. खरंतर हा बट्टा नव्हता, तर हे होते एक सुनियोजित षड्यंत्र! हिंदूंनाही दहशतवादी जमातींच्या रांगेत नेऊन बसवण्याचे आणि त्यामागे दडली होती मतांची भयावह लाचारी! १७ वर्षांपूर्वी साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर, लेफ्टनंट कर्नल श्रीकांत पुरोहित, समीर कुलकर्णी, रमेश उपाध्याय, अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी, रामजी कालसंग्रा, शामजी साहू, संदीप डांगे, प्रविण तकलकी, राकेश धावडे ही १२ नावे एखाद्या खलनायकाप्रमाणे पेश केली गेली.

दि. २९ सप्टेंबर २००८... रमजानचा महिना सुरू असताना मालेगावातल्या भिकू चौक परिसरातील मशिदीजवळ एका दुचाकीचा स्फोट झाला. लोक नमाज अदा करण्यासाठी जात असतानाच हा स्फोट झाला. या स्फोटात सहा निष्पाप नागरिकांचा मृत्यू झाला, तर १०० पेक्षा अधिकजण गंभीर जखमी झाले. ज्या दुचाकीचा स्फोट झाला, ती साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांच्या नावावर असल्याचा दावा तेव्हा करण्यात आला. त्यामुळे या एका संशयाखाली साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांना मुख्य आरोपी ठरवून, संपूर्ण प्रकरणात ११ जणांना अटक करण्यात आली. सुरुवातीला स्थानिक पोलिसांनी या घटनेचा तपास केला, त्यानंतर दहशतवादाविरोधी पथकाने तपास हाती घेतला आणि इथून सुरू झाली ती हिंदुत्ववादी कार्यकर्त्यांच्या बदमानीची कहाणी! यात भलेभले मातब्बरही उतरले. माध्यमे, संसदेचे सभागृह, विधानसभेचे सभागृह या सगळ्यांचा गैरवापर करून 'भगवा दहशतवाद' हा शब्द घोकून घोकून रुजवण्यात आला. १०० वेळा एखादे असत्य बोलल्यानंतर ते सत्य वाटू लागते, असा गोबेल्सचा नियम. या गोबेल्सच्या तंत्राचा पुरेपूर वापर संपुआ सरकार व काँग्रेसी नेत्यांनी केला. आरोपांचे गांभीर्य गडद करण्यासाठी काही निवृत्त सनदी अधिकारीदेखील या उरुसात उर बडवून नाचू लागले. काही उर्दू पत्रकारांनी यावर पुस्तके लिहिली. एस. एम. मुश्रीफ यांचे 'हू किल्ड करकरे?' हे त्यापैकीच एक. ज्यामध्ये २००८ साली मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात ११ ब्राह्मणवादी दहशतवाद्यांना अटक झाल्यानंतर देशात होणारे बॉम्बस्फोट जवळपास पूर्णपणे बंद झाले. बहुजन हिंदूंचे मत मुस्लिमांबद्दल कलुषित करून त्यांचे लक्ष ब्राह्मण्यवाद्यांच्या कुटिल कारस्थानांपासून विचलित करण्यासाठी ब्राह्मण्यवादी संघटनाच 'आयबी'तील ब्राह्मण्यवाद्यांच्या छुप्या सहकार्याने बॉम्बस्फोट घडवून आणले होते व त्यांचे खापर ज्ञात-अज्ञात मुस्लीम दहशतवाद्यांवर फोडले होते, असा कपोलकल्पित उल्लेख केल्याचे आढळेल. परंतु, बहुसंख्य माध्यमांनी दहशतवादी हल्ल्यांच्या बाबतीत सरकारी माहिती ग्राह्य धरून वृत्तांकन केले. त्यामुळे 'भगवा दहशतवादा'मागील खरे सत्य, तथ्ये कधीही जनतेसमोर आली नाहीत. 'भगवा दहशतवाद' या कुभांडाचे म्होरके होते ते काँग्रेसचे काही नेते. त्यांनी आपल्या भाषणातून 'भगवा दहशतवाद' ही थिअरी अगदी पद्धतशीरपणे रेटण्यास सुरुवात केली. २००८-२०११ दरम्यान दिग्विजय सिंह यांनी कित्येक पत्रकार परिषदांमधून, मुलाखतींतून 'भगवा दहशतवादा'चा उल्लेख करत हिंदूंची वारंवार बदनामी केली. चिदंबरम यांच्या कार्यकाळात तर त्यांनी गृहमंत्रिपद सोडेपर्यंत, अफजल गुरूला फाशी दिली नव्हती. मग ते नेमके कोणाला वाचवायला बघत होते? हादखील प्रश्नच आहे. 'भगवा दहशतवाद' या शब्दाचीच मुळी ज्या प्रकरणापासून सुरुवात झाली, त्या नांदेडच्या समीर कुलकर्णी याच्या फॅटरीतील स्फोटांचा दहशतवादाशी संबंध जोडला गेला. का, तर त्याचा दोष हाच की, समीर कुलकर्णी हा 'बजरंग दला'चा कार्यकर्ता होता. हे असे पहिले प्रकरण होते, जिथे 'हिंदू दहशतवाद' शब्दाचा प्रयोग केला गेला. हळूहळू अगदी नियोजनबद्ध, पण छुप्या पद्धतीने विशिष्ट मंत्री आणि अधिकार्यांच्या संगनमताने तपास यंत्रणांच्या तपासाची दिशा मुद्दाम कपोलकल्पित 'भगवा दहशतवादा'कडे वळविण्यात आली. त्यानंतर दि. ८ सप्टेंबर २००६ रोजी झालेल्या मालेगाव स्फोटानंतरही अशीच 'भगवा दहशतवादा'च्या थिअरीची परस्पर मुद्दाम पेरणी करण्यात आली. तत्कालीन महाराष्ट्र सरकारकडून प्राप्त झालेल्या अहवालात या हल्ल्यात एका मुस्लीम दहशतवादी गटाचा संबंध होता. पण, त्यामध्येही लेफ्टनंट कर्नल श्रीकांत पुरोहित, साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांना तपास यंत्रणांकरवी गोवण्यात आले. विशेष बाब म्हणजे, दि. ११ जुलै २००६ रोजी झालेल्या मुंबई बॉम्बस्फोट मालिकेतील संशयितांना ताब्यात घ्यायला 'एटीएस'ला पाच ते सहा महिन्यांचा कालावधी लागला. पण, मालेगाव बॉम्बस्फोटाच्या प्रकरणाची दिशा अवघ्या महिन्याभरात बदलून 'भगवा दहशतवादा'च्या नावाखाली लेफ्टनंट कर्नल पुरोहितांना ताब्यात घेतले गेले. यावरून सरकारची, सरकारच्या हाताखाली बाहुले म्हणून वावरणार्या काही अधिकार्यांची नियत लक्षात येते. मध्यंतरी साध्वी प्रज्ञा सिंह ठाकूर यांचा एक व्हिडिओ समोर आला. ज्यामध्ये कशाप्रकारे तत्कालीन काँग्रेसी गिधाडांकडून अत्याचार झाले, या सर्वांची धक्कादायक आपबिती त्यांनी मांडली आहे. लेफ्टनंट कर्नल श्रीकांत पुरोहित यांनीसुद्धा मधल्या काळात सांगितले की, त्यांना अशी वागणूक देण्यात आली, जी प्राण्यांनाही दिली जात नाही. काही अधिकारी त्यांना संघ, 'विहिंप' आणि उत्तर प्रदेशचे तत्कालीन खासदार योगी आदित्यनाथ यांचे या प्रकरणी नाव घेण्यास जबरदस्ती करीत होते. त्याचबरोबर हा पूर्वनियोजित कट असून तत्कालीन संपुआ सरकार आणि राज्यातील काँग्रेस-राष्ट्रवादी सरकारच्या इशार्यावरून त्यांचे प्यादे नाचत होते, हेदेखील पुरोहितांच्या आरोपातून समोर आले. त्यामुळे न्यायालयाने जो निकाल दिला, त्याने काँग्रेसचा हिंदूद्वेषाचा बुरखा टराटरा फाटला. तब्बल १७ वर्षांनी लागलेला हा खटल्याचा निकाल म्हणजे सत्याचा, न्यायाचा आणि हिंदुत्वाचाच विजय आहे. काँग्रेसकडे जरातरी माणुसकी शिल्लक असेल, तर त्यांनी आता निष्पाप हिंदूंची माफी मागावी, एवढीच अपेक्षा!